# शिवनेरी

२०२३-२४



रयत शिक्षण संस्थेचे,

अण्णासाहेब आवटे आर्टस्, कॉमर्स, हुतात्मा बाबू गेणू सायन्स कॉलेज व
सौ. कुसुमबेन कांतिलाल शहा आर्टस्, कॉमर्स, सायन्स ज्युनियर कॉलेज,
मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे. ४१० ५०३



GOVERNMENT CENTRAL PRESS, MUMBAI

छत्रपती श्री शिवाजी महाराज

जन्म : १९ फेब्रुवारी १६३० / मृत्यू : १६८०

रयत शिक्षण संस्थेचे,

**अण्णासाहेब आवटे आर्टस्, कॉमर्स हुतात्मा बाबू गेनू सायन्स कॉलेज आणि सौ.कुसुमबेन कांतीलाल शाह आर्टस्, कॉमर्स, सायन्स ज्युनियर कॉलेज,** मंचर, ता.आंबेगाव, जि.पुणे, ४१०५०३

(Re-accredited with 'A' Grade by NAAC)

# शिवनेरी

## २०२३-२४







**अध्यक्ष**
प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड

**संपादक**
संतोष पद्माकर पवार

**संपादक मंडळ**
प्रा. डॉ. एस. एस. रुपनर
प्रा. डॉ. जी. सी. वाघ
प्रा. डॉ. एस. एस. उघडे
प्रा. आर. बी. गावडे
प्रा. एस. डी. खताळ
प्रा. जी. डी. मुंढे

**विद्यार्थी प्रतिनिधी**
शब्दाली वाळुंज, एम. ए. २- मराठी

**छायाचित्रण सहकार्य**
प्रणय महाजन, अनुराधा फोटो स्टुडिओ, मंचर
लक्ष्मी फोटो, सावेडी, अहमदनगर

**रेखाचित्रे**
प्रमोदकुमार अणेराव

**संपादन साहाय्य**
प्रा. कैलास एरंडे
प्रा. संजय पवळे
प्रा. एस. ए. पवार

**वितरण व्यवस्था**
प्रा. संजय मेमाणे (ग्रंथपाल)



**शिवनेरी । Shivneri**
दि प्रेस ॲक्ट ॲण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स
नियम ८, फॉर्म ४ प्रमाणे आवश्यक माहिती

**प्रकाशन स्थळ**
अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर
नियतकालिक : वार्षिक

**© स्वामित्व**
**प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड**
राष्ट्रीयत्व : भारतीय
पत्ता : रयत शिक्षण संस्था, सातारा तर्फे
अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे, दुरध्वनी : (०२१३३) २२३१६०

**ISBN : 978-93-84600-13-6**

**मुद्रक । सनय प्रकाशन**
नारायणगाव, शुभम विश्व, मोगरा-बी १४
आनंदवाडी, ता. जुन्नर, जि. पुणे-४१०५०४
मो.९८६०४२९१३४, ९९६०६१७३०६
Email- sanayprakashan@gmail.com

**मुखपृष्ठ व आतील मांडणी ।** 'कलामंदिर' ओंकार खैरे
**अक्षरजुळणी ।** सनय संगणक विभाग
**छायाचित्रे ।** अनुराधा फोटो फ्लॅश, मंचर

मी प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड असे जाहीर करतो की, वर नमूद केलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.

**- प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड**

या महाविद्यालयीन वार्षिकांकातील मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच मजकुराची जबाबदारी त्या त्या लेखकाची आहे.
**(फक्त खासगी वितरणाकरीता) अंकाच्या प्रतिक्रिया कळवा.** Email : annasahebawate2007@yahoo.com

## महाविद्यालयाची वैशिष्ट्ये । उपक्रम

**नॅकची 'A' ग्रेड प्राप्त महाविद्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे बेस्ट कॉलेज ॲवॉर्ड विजेते महाविद्यालय**

१०५ एकराचा निसर्गरम्य परिसर, तज्ञ, संशोधक, व्यासंगी आणि अनुभवी प्राध्यापक वृंद, ज्ञानवृध्दी करणारे समृद्ध व प्रशस्त ग्रंथालय आणि स्वतंत्र अभ्यासिका, अत्याधुनिक संगणक, विज्ञान व भाषा प्रयोगशाळा, उती संवर्धन प्रयोगशाळा (टिश्यु कल्चर लॅब), संगणकीकृत प्रशासकीय भवन.

शिस्त अंगी बाणविणारा एन. सी. सी. (N.C.C.) विभाग. राष्ट्रीय जाणीव जागृती व उद्दिष्टांची पूर्तता करणारा विद्यापीठीय विशेष पुरस्कार प्राप्त एन. एस. एस. (N.S.S.) विभाग. कला सांस्कृतिक विभाग आणि जबाबदार नागरिक घडविणारी विवेकवाहिनी, विद्यार्थी व्यक्तिमत्त्व विकास घडविणारा प्रशस्त व भव्य जिमखाना व प्रशस्त व भव्य क्रीडांगण, स्वावलंबी विद्यार्थी घडविणारी, 'कमवा आणि शिका' योजना.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणारी विविध मंडळे एम. ए. मराठी, एम. ए. इंग्रजी, एम. ए. अर्थशास्त्र, एम. कॉम. चे पदव्युत्तर वर्ग/Msc. Organic Chemistry, Msc.Analytical Chemistry, Physics, Botany तसेच पीएच. डी. संशोधन केंद्र (वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, अर्थशास्त्र, वाणिज्य) बी. सी. ए. संगणकीय विशेष कौशल्य अध्ययनाची सोय. मानसशास्त्रीय समुपदेशन केंद्र, मत्स्यबीज संवर्धन व शेततळे. विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी सॉफ्ट स्किल डेव्हलपमेंट प्रोग्राम, विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र (M.P.S.C., U.P.S.C., NET, SET, CET.)

कर्मवीर विद्याप्रबोधिनी, विद्यार्थी-विद्यार्थिनी लेखन कौशल्य प्रकल्प-अक्षरबन, उन्मेष, आणि विज्ञान भित्तिपत्रिका. जैवतंत्रज्ञान (बायोटेक्नॉलॉजी) शिक्षणाची सुविधा. माजी विद्यार्थी संघ, परिसरातील शिक्षणापासून वंचित असणाऱ्या विद्यार्थी आणि विद्यार्थिनी आणि नागरिकांच्यासाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास केंद्र. भव्य व प्रशस्त विद्यार्थिनी वसतिगृह, पालक मेळाव्यांचे आयोजन. व्यवसायाधारित शिक्षण (बी.व्होक) फूड प्रोसेसिंग, अर्कॉटिंग टॅक्सेशन.

किती शिणलास बापा, रयतेच्या पोरांसाठी ।
तुझा जन्म नवयुग साऱ्या बहुजनांसाठी ।।



जन्म : २२ सप्टेंबर १८८७ मृत्यू : ९ मे १९५९

**मा. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील** (डी. लिट.)

संस्थापक, रयत शिक्षण संस्था, सातारा

# || भावपूर्ण श्रद्धांजली ||

## २०२३-२४

**‘हे जग यांच्यासह अधिक सुंदर होते !’**

माजी कुलगुरू डॉ. राम ताकवले, पँथर कार्यकर्ते मनोज संसारे, निवेदक अमीन सयानी, समीक्षक डॉ. किशोर सानप, अभिनेत्री सुलोचना लाटकर, अभिनेता गुंफी पेंटल, शिक्षणतज्ज्ञ डॉ. मो. स. गोसावी, फ्रेंच लेखक मिलान कुंदेरा, अभिनेता रवीन्द्र महाजनी, शेतकरी संघटनेचे नेते प्रल्हाद पाटील कराड, अभिनेते जयंत सावरकर, ज्येष्ठ स्तंभलेखक शिरीष कणेकर, कला दिग्दर्शक नितीन देसाई, निसर्गकवी पद्मश्री ना. धों. महानोर, सर्वोदयी कार्यकर्त्या करुणा फुटाणे, ज्येष्ठ समाजवादी/गांधीवादी कार्यकर्ते शेखर सोनाळकर, शाहीर गदर, महात्मा फुले यांचे अभ्यासक विचारवंत हरी नरके, साहित्य अकादमी विजेते सिंधी लेखक लछमन हर्दवाणी, लेखिका डॉ. अंजली कीर्तने, लेखक डॉ. शंकर बोऱ्हाडे, लोकसाहित्य अभ्यासक पद्मश्री डॉ. प्रभाकर मांडे, शास्त्रीय गायक राशिद खान, लोकनेते शरद यादव, गझलकार गौरवकुमार आठवले, शास्त्रीय संगीतगायक प्रभा अत्रे, शायर मुन्नवर राणा, मराठी भाषातज्ज्ञ डॉ. सुषमा करोगल, अजिंठा चित्रशैलीचे चित्रकार विजय कुलकर्णी, ज्येष्ठ कथा, कादंबरीकार मनोहर शहाणे, चित्रपटनिर्माते कुमार शहानी, गायिका किरण पाटणकर, प्रसिद्ध स्वयंपाकी पद्मश्री इम्तियाज कुरेशी, माजी मंत्री आणि महिला आयोग अध्यक्ष रजनी सातव, सुप्रसिद्ध रेडिओ निवेदक अमीन सयानी, ज्येष्ठ विधिज्ञ फली नरिमन, अभिनेत्री कविता चौधरी, माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी, लोकप्रिय गझल गायक पंकज उधास, पत्रकार सतीश नांदगावकर, पत्रकार सुजाता आनंदन, पत्रकार हेमंत जोगदेव, लेखिका व समीक्षक डॉ. श्रद्धा पराते, ज्येष्ठ कवी भगवानराव देशमुख, कॉम्रेड रणजीत परदेशी, दृश्यकलावंत रिचर्ड सेरा, पत्रकार मिलिंद बेल्हे, शेकाप नेत्या मीनाक्षी ताई पाटील, नोबेल पारितोषिक विजेते अर्थतज्ज्ञ डॅनियल काहनेमन, हिंदी कथाकार हृदय लानी, ज्येष्ठ कामगार नेते, अंनिस कार्यकर्ते ॲड. के. डी. शिंदे, नोबेल विजेते भौतिकशास्त्रज्ञ पीटर हिग्ज, शिक्षणतज्ज्ञ मीना चंदावरकर, ध्वनी संयोजक दादा पारसनाईक, पुण्याचे माजी महापौर मोहनसिंग राजपाल, दलित पँथरचे नेते गंगाधर गाडे, पंजाबी भाषक कवी सुरजित पातर, माजी उपकुलगुरू डॉ. मोहनराव हापसे तसेच विविध नैसर्गिक आपत्ती, अपघातात ठार झालेले ज्ञात-अज्ञात मृत्यू पावलेले, विविध हल्ल्यात गतप्राण झालेले भारतीय जवान, विविध रोग साथीच्या आजाराने जगभरात मृत्यू झालेल्या सर्व नागरिकांना भावपूर्ण श्रध्दांजली...





**मा. शरदचंद्रजी पवार**

अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा



**मा. ना. आमदार दिलीपराव वळसे पाटील,** सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य.
सदस्य, मॅनेजिंग कॉन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा.



**मा. चंद्रकांत नारायण दळवी I.A.S. (Retd)**

चेअरमन, रयत शिक्षण संस्था, सातारा.

स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद
॥ कर्मवीर ॥

# रयत शिक्षण संस्था पदाधिकारी

## २०२३ ते २०२६



**मा. चंद्रकांत नारायण दळवी**
**I.A.S. (Retd)** चेअरमन



**ॲड. भगीरथ शिंदे**
व्हा. चेअरमन



**मा. सौ. जयश्रीताई चौगुले**
उपाध्यक्ष



**मा. अरूण कडू पाटील**
उपाध्यक्ष



**मा. पी. जी. पाटील**
उपाध्यक्ष



**मा. ॲड. रामभाऊ कांडगे**
उपाध्यक्ष



**मा. चेतनदादा तुपे**
विभागीय अध्यक्ष



**मा. विकास देशमुख**
**I.A.S. (Retd)** सचिव



**प्रा. ज्ञानदेव म्हस्के**
सहसचिव



**डॉ. शिवलिंग मेनकुदळे**
ऑडिटर

# महाविद्यालय विकास समिती
## २०२३-२४

चेअरमन



**मा. ना. दिलीपराव वळसे पाटील**
सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य.



**मा. बाळासाहेब बेंडे**
स्थानिक प्रतिनिधी



**मा. बाळासाहेब बाणखेले**
स्थानिक प्रतिनिधी



**मा. उदय पाटील**
स्थानिक प्रतिनिधी



**प्रा. डॉ. ए. ए. काळे**
प्राध्यापक प्रतिनिधी



**प्रा. एस. सी. महाकाळ**
प्राध्यापक प्रतिनिधी



**प्रा. एस. एम. मेमाणे**
प्राध्यापक प्रतिनिधी



**प्रा. जी. सी. वाघ**
आय. क्यू. ए. सी. समन्वयक



**श्री. एस. बी. शेटे**
शिक्षकेतर सेवक प्रतिनिधी



**प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड**
सभासद/सचिव, महाविद्यालय विकास समिती

# वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ



कर्मवीरांच्या प्रतिमेला पाहुण्यांचे अभिवादन



प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते आदर्श शिक्षकेतर कर्मचारी श्री. चंद्रकांत कोकाटे यांचा सत्कार



राष्ट्रीय छात्र सेनेच्या छात्रास पारितोषिक प्रदान



प्रमुख पाहुणे मा. संजय मालपाणी यांचे प्राचार्यांच्या हस्ते स्वागत



निवडक पारितोषिक विजेते प्रमुख पाहुण्यांसोबत




माजी विद्यार्थी संघटनेचे माजी प्र. प्राचार्य मा. मधुकर वाघ सरांचे स्वागत

## "भीमाशंकर करंडक"




भीमाशंकर करंडक प्राचार्यांच्या हस्ते स्वीकारताना विद्यार्थी




भीमाशंकर करंडक स्पर्धेत सहभागी विद्यार्थी

## राष्ट्रीय क्रीडा दिन उपक्रम



प्रास्ताविक करताना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. पानसरे



दोरी उडयांचे प्रात्याक्षिक दाखवतांना खेळाडू




विविध स्पर्धेत पारितोषिक विजेते खेळाडू मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेजवळ

# कार्यक्रम विविधा




किसान कनेक्ट प्रोजेक्टला क्षेत्रभेट देताना विद्यार्थी




भारतीय संविधान रॅलीनिमित्त विद्यार्थी आणि शिक्षक




मतदान जागृती अभियान निमित्त राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी व विद्यार्थी




मोफत आरोग्य तपासणी शिबिर



स्पर्धा परीक्षा व्याख्यान आयोजित



मुख्य विद्यापीठ कार्यक्रमात आंतरविद्यापीठ कबड्डी पारितोषिक स्वीकारताना विजेता संघा



# मनोगत

## प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड

'शिवनेरी' हे महाविद्यालयाच्या कार्यवृत्ताचा आरसा असून सन २०२३-२४ च्या 'शिवनेरी' नियतकालिकाला अध्यक्षीय मनोगत लिहिताना मला आंनद होत आहे. या निमित्ताने महाविद्यालयाचे सर्व ठळक वैशिष्टे असलेले कामकाज आपल्यासमोर ठेवतो. सन १९६६ साली रयत शिक्षण संस्थेचे, अण्णासाहेब आवटे महाविद्यालय ९९ विद्यार्थी संख्येवर सुरू झाले. आज या महाविद्यालयाची विद्यार्थी संख्या १५३८ इतकी आहे. २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात पार पडलेल्या नॅकच्या मूल्यांकनात तिसऱ्या सायकलमध्ये 'A' ग्रेड प्राप्त केली. त्याबाबत तत्कालीन प्रभारी प्राचार्य डॉ. बी. पी. गार्डी आणि 'नॅक' समन्वयक डॉ. जी. सी. वाघ तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर वर्गाचे मी अभिनंदन करतो. महाविद्यालयात १६ विषय हे पदवी स्तरावर व ८ विषय पदव्युत्तर स्तरावर शिकवले जातात. तसेच केमिस्ट्री, बॉटनी व कॉमर्स या विषयांचे पीएच.डी. संशोधन केंद्र असून या केंद्रातून एकूण ३० विद्यार्थी संशोधन करत आहेत. महाविद्यालयातील सर्व वर्गांचे विद्यापीठाचे निकाल हे बोर्ड व विद्यापीठापेक्षाही अधिक आहेत याचा सर्व शिक्षकांसह मला आनंद आहे.

वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांनी चालू शैक्षणिक वर्षात एकूण २३ संशोधन पेपर हे विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल मध्ये प्रकाशित केले आहेत तसेच ३८ बुक चॅप्टर प्रकाशित केले आहेत. डॉ. एस. टी. शिंदे, डॉ. आर. बी. गावडे व प्रा. अफरोज डांगे यांना त्यांच्या संशोधनासाठीचे पेटंट नुकतेच मिळाले आहे. महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक विकासाबरोबरच सर्वांगीण विकासासाठी कला, क्रीडा, सांस्कृतिक विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना, विद्यार्थी विकास विभाग यांच्या माध्यमातून विविध उपक्रम राबवले जातात. आर्थिक दृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना चालू शैक्षणिक वर्षांमध्ये आर्थिक मदत दिली आहे.

महाविद्यालयात अण्णासाहेब आवटे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत एकूण ७४ स्पर्धकांनी सहभाग घेतला संस्थेचे अध्यक्ष मा. शरदरावजी

पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त शरद रयत चषक ही राज्यस्तरीय ऑनलाईन 'वक्तृत्व स्पर्धा' याही वर्षी महाविद्यालयाने रयत शिक्षण संस्थेच्या पश्चिम विभागामार्फत शरद रयत चषक स्पर्धेचे यशस्वीपणे आयोजन करण्यात आले होते. त्यात ८६ स्पर्धकांनी सहभाग घेतला. कर्मवीर जयंती सप्ताह अंतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्वरतरंग विद्यापीठस्तरीय युवा महोत्सवात समूह गायनामध्ये महाविद्यालयास द्वितीय क्रमांक मिळाला. डी. जी. फाऊंडेशन यांच्या वतीने आयोजित भीमाशंकर करंडक स्पर्धेमध्ये एकूण ४ कला पारितोषिके मिळाली.

महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासामध्ये ग्रंथालयाचे काम अत्यंत महत्त्वाचे आहे. ग्रंथालयाच्या सुसज्ज इमारतीमध्ये ७७ हजार ५८८ ग्रंथ व क्रमिक पुस्तके आहेत चालू शैक्षणिक वर्षात २ लाख २५ हजार ३०० किमतीची १८४० पुस्तके खरेदी केली असून विविध शाखांची ६५ मासिके व ११ वृत्तपत्र विद्यार्थ्यांना उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांसाठी बुक बँक सुविधा सुरू आहे. जिमखाना विभागाच्या वतीने वर्षभरात विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. त्यात खेळाडूंनी उत्तम सहभाग नोंदवून अव्वल पारितोषिके पटकावली. त्यांचा गुणगौरव वार्षिक परितोषिक वितरणात केला गेला. प्लेसमेंट सेलच्या वतीने ५ एप्रिल २०२४ रोजी ICICI BANK यांच्या वतीने कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये ४६ विद्यार्थी मुलाखतीसाठी उपस्थित होते.१२ सप्टेंबर २०२३ रोजी बार्कलेज बँकेच्या ७२ विद्यार्थ्यांनी मुलाखत दिली. B. Voc. (Accounting and taxation) विभागाचा मयूर कडूसकर हा विद्यार्थी IAMA CAT परीक्षेत उत्तीर्ण झाला. रसायनशास्त्र विभागामार्फत १ राष्ट्रीय व ३ राज्यस्तरीय सेमिनार आयोजित करण्यात आले. डॉ. आर. बी. गावडे यांना पुणे विद्यापीठाने पीएच. डी. पदवी प्रदान केली.

महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागामार्फत रानभाजांचे प्रदर्शन, देशी बियाणांचे प्रदर्शन व कॅक्टस अँड सक्युलंट्स प्रदर्शन भरवण्यात आले. मशरूम लागवड व प्रक्रिया कार्यशाळा, जैविक खत निर्मिती कार्यशाळा, रिसायकलिंग ऑफ ऑरगॅनिक मटेरियल कार्यशाळा घेण्यात आल्या. फळभाज्यांची लागवड व त्यामध्ये यशस्वीपणे पोलिप्लॉयडी अँड म्युटेशन्स इंड्युस करण्यात आले. वनस्पतीशास्त्र व प्राणीशास्त्र विभागाच्या वतीने व एक यशस्वी इंटरनॅशनल कॉन्फरन्स (सेल्फ फंडेड) आयोजित केली त्यामध्ये ३२७ पेक्षा जास्त विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी व प्राध्यापकांनी उस्फूर्त सहभाग नोंदविला. विभागामार्फत वन्यजीव सप्ताह, प्लास्टिक फ्री कॅम्पस, एड्स अवेरनेस साठी पथनाट्य कार्यक्रम, सर्प संवर्धन कार्यक्रमाचे आयोजन व गांडूळ खत प्रकल्प हे उपक्रम घेण्यात आले.

उत्कृष्ट शिक्षकेतर सेवक पुरस्कार म्हणून चंद्रकांत पिंगळे व संतोष शेटे यांचा सन्मान करण्यात आला. महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे ३५० विद्यार्थी संस्थेचे युनिट असून या मार्फत नियोजित कार्यक्रमांतर्गत वृक्षारोपण स्वच्छता अभियान रक्तदान हिमोग्लोबिन तपासणी प्लास्टिक निर्मूलन मतदार जागृती रॅली हेड्स अवेअरनेस साठी पथनाट्य इत्यादी उपक्रम राबविले. हिवाळी शिबीर भराडी, ता.आंबेगाव येथे संपन्न झाले. त्यामध्ये १५० स्वयंसेवक सहभागी झाले. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये एन.सी. सी. मध्ये १०० विद्यार्थी सहभागी असून त्यात ३३% मुलींचा सहभाग आहे. CATC कॅम्प पुणे ५७ कॅडेट्स चा सहभाग, इंडियन आर्मीत ६ विद्यार्थ्यांची निवड झाली. एका विद्यार्थिनीची वनरक्षक म्हणून निवड झाली. वाराणसी येथे राष्ट्रीय कॅम्प केला. चालू शैक्षणिक वर्षात महाविद्यालयाच्या परिसरामध्ये २०० कागदी लिंबू, १०० केशर आंबा व इतर विविध प्रकारची १००० रोपांची लागवड करण्यात आली. तसेच शेती विभागास चिंच, गहू, केळी, सिताफळ, आवळा इत्यादीपासून महाविद्यालयाला उत्पन्न मिळाले. मंचर नगरपंचायत यांना ६ एकर जागा माझी वसुंधरा ४.० अंतर्गत घनवन प्रकल्प उभारणेसाठी उपलब्ध करून देण्यात आली. या 'शिवनेरी' हे महाविद्यालयाचे आठ वर्षे सलग विविध पारितोषिक मिळविलेले नियतकालिक असून त्याची वाटचाल यापुढेही उत्तम सुरू राहील याची ग्वाही या अंकाच्या निमित्ताने देतो.



**संतोष पद्माकर पवार**

संपादकीय

शिवनेरी २०२३-२४ हे नियतकालिक महाविद्यालयाच्या आणि माझ्या स्वतःच्या संपादकीय कारकीर्दीची कहाणी आहे. २० जून १९६६ साली 'अण्णासाहेब आवटे' याच्या नावाने सुरू झालेल्या या महाविद्यालयाला मंचरमधील अत्यंत तळागाळातल्या खेडुतांनी अगदी पै-पावाना देऊन उभारल्याचा इतिहास आहे. त्या निमित्ताने 'शिवनेरी' नियतकालिक आरंभ झाले तेव्हापासून आजपावेतो शिवनेरीची ही सर्व परंपरा मला न्याहाळून पाहता आली आहे. ग्रंथालयात हे सर्व अंक जतन केले आहेत.

सुरूवातीच्या काही काळातील शिवनेरीमधील साहित्याचा दर्जा हा अत्युच्च अशा प्रकारचा राहिला आहे. जाणकारीने साहित्यप्रकार हाताळणारे विद्यार्थी/विद्यार्थिनी साहित्यिक त्या सर्व अंकातून आवर्जून भेटले. समाजात विविध माध्यमे जशी प्रसार पावत गेली तसा विद्यार्थ्यांनी साहित्यप्रकारात आवर्जून रस घेण्याचा प्रकार अस्तंगत होत चालल्याचे वेदनादायी चित्रदेखील नंतरच्या काळात निर्माण झाले. आजची अवस्था मोठी शोचनीय आहे. केवळ बघे म्हणून अंक हाताळणारे वाचक-लेखक असा मजकूर देणारेच पुढे येताहेत. साहित्य लेखनासाठी प्रत्यक्ष अनुभवाला भिडण्याची क्षमता आपण गमावली आहे काय? असंवेदनशीलता टोकाची वाढत चालली आहे काय? नवतंत्रज्ञानात मानवी मेंदूमधील साहित्य जाणिवेचा कप्पा नष्ट होतो आहे की काय? असे वाटण्याइतपत आता परिस्थिती निर्माण झाली आहे.

अशा काळात नियतकालिकासाठी मजकूराची जमवाजमव हा एक मोठाच मामला होऊन बसला आहे. त्यातल्या त्यात त्याला कसे बरे करता येईल, आकार देता येईल एवढेच काय ते आपल्या हाती आहे. इथून पुढच्या दिवसात या अस्तंगत होणाऱ्या कौशल्याला उभारी देण्यासाठी काय करता येईल याच्या उपाययोजनाची आखणी करावी लागेल. विद्यार्थ्यांना विविध साहित्यप्रकार माहिती करून देणे, त्यांच्या लेखनाची कौशल्ये त्यांना अवगत करून आत्मसात करण्यासाठी विशिष्ट अर्जित कौशल्याची शिकवणूक देणे

गरजेचे झाले आहे. विद्यार्थ्यांमधील चतुरस्त्र ज्ञानाची कक्षा कशी वाढविता येईल याचा विचार व्हायला हवा. एखाद्या विषयाची विशेष शाखा ही विशिष्ट कधीच नसते तर ती आंतरशाखियत्वाने इतर ज्ञानशाखांशी आपोआप जोडलेली असते. असे दुवे शोधणे त्यांची संगती लावणे हे, प्रत्येक प्रज्ञावंताचे काम असते. मात्र विशेषी करणाच्या नावाखाली लोक आपापली खोकी तयार करून त्यातच रमणे पसंत करतात आणि एकांगी बनत जातात.

कला, साहित्य, संस्कृती यांची प्रत्येक व्यक्तीला चाह असलीच पाहिजे. त्याच्यावाचून समाजात 'जंगलराज' निर्माण होईल आणिक सर्वत्र हिंस्त्रताच भरून राहीलच. तोंडी लावण्यापुरते साहित्य, संस्कृती कलेचे विषय समाजात हाताळले जात आहे, त्यासाठीची स्वस्त मनोरंजने, अतिसुलभ पण अतिशय किळसवाण्या बीभत्स गोष्टी समाजाच्या माथी थापल्या जात आहेत. नुसतीच मनोरंजनाची 'हवा येऊ द्या' वृत्ती वाढीस लागली आहे. अशा हिडीस आणि कुप्रथांच्या विरोधात साहित्यिक आवाज एकवटून समाजाला त्याच्या उच्च विचारसरणीशी नेऊन ठेवणे, त्याला अभिजाततेची उंची प्राप्त करून देणे हे साहित्यिकाचे कर्तव्य आहे. साहित्य निर्मितीविषयी भल्या सुशिक्षितांच्या भावना देखील अशा असतात की ते केवळ काल्पनिक असते, त्यात तथ्यांश कमी असतो. असा गैरसमज बाळगला तर त्या विषयी आसपासच्या जगातही अनास्था वाढीस लागण्याची शक्यता आहे. साहित्य हे वास्तवाच्या विस्तवावर पोळून अनुभूतीचा प्रत्यय देणारे असते. जगातील कोणत्याही गोष्ट सांगण्याचा अंश साहित्याच्या संस्कारातून उगम पावतो.

विद्यार्थी दशेत जेवढे आडवेतिडवे वाचन विद्यार्थी करतील तेवढी त्यांची बहुश्रुतता वाढती राहिल. अनेक ज्ञान-अज्ञात विश्वात कल्पनेच्या पंखाने जाता येते. कित्येक विज्ञानकथा आधी जन्मल्या आणि मग त्याचे प्रत्यक्ष रोप लागल्याची उदाहरणे आहेत. मानवाच्या मानसजीवनात आधी जन्म पावलेल्या कल्पना याच पुढे वास्तवाचा भाग होऊन जातात हे येथे ध्यानी घेतले पाहिजे. स्वप्न पाहणे हे मानवाचे आवडते रंजन असले तरी त्या दृष्टीने तो दोन पावले पुढे टाकून चालू लागला की त्याला हव्या त्या विश्वाची उभारणी करता येते. मानवी मनाच्या मेंदूच्या रचनेत या भावी विचारांची कल्पनांची निर्मिती होते आणि त्या दृष्टीने मनुष्य कृती करून नवोन्मेषाची उभारणी करतो. जगातील विज्ञान साहित्य या दृष्टीने अभ्यासण्याजोगे आहे. मेंदूतील लेखणीतून झरतात ते 'साहित्य' खरे असते. परंतू ज्या देशात साहित्यिक/कलावंत हे सुस्त होतात, कोणत्याही अनिष्टांना ते विरोध करेनासे होतात ही तो देशच मरू घातल्याची खूण असते. सळसळते चैतन्य ही साहित्याची खरी ओळख असून जगातील अनेक क्रांती या साहित्यामुळे घडून आल्या. ललितकलांच्या उत्तेजनांसाठी सर्वांनीच पुढाकार घेण्याची गरज असून बनचुके, अप्पलपोटे आणि स्वार्थी लोकांच्या कचाट्यातून साहित्य प्रांताची सोडवणूक केली पाहिजे. म्हणूनच तिथे होणाऱ्या वेगवेगळ्या नियुक्तींकडे देखील तेवढ्याच सजगतेने पाहिले जायला हवे. आज देशात विद्यार्थी, शेतकरी, कामगार असा सर्व वर्ग हा अत्यंत निराश असून साहित्याची ठिणगी त्यांच्यात जगण्याची नवी आशा निर्माण करून संघर्षासाठी प्रेरणा देईल असे वाटते.

साहित्य लेखनाचे कौशल्य विकसित होण्यासाठी कायम वाचन चिंतन, मनन आणि विविध साहित्यिक उपक्रम आणि त्या जोडीने आपणास आवडत्या विषयावर लिहिण्याची चाह असली की व्यक्ती आपोआप लेखनात गती मिळविते. आजूबाजूस पुस्तक चर्चा होणे, पुस्तके विनासायास उपलब्ध होणे, विविध प्रसंगी भेट म्हणून पुस्तके देणे. पुस्तकांच्या प्रदर्शनास चालना मिळणे, स्व-मालकीची पुस्तके घेण्याकडे कल वाढविणे, प्रत्येक घर ग्रंथालयात रूपांतरित करणे. पारंपरिक वाचनासोबत नव्याने दाखल झालेली पुस्तके संग्रही ठेवून त्याचा प्रसार आणि प्रचार करणे हेच यासाठी आवश्यक आहे. 'शिवनेरी'ची सतत आठवर्षांची नियतकालिक स्पर्धेतील चढती कमान ही अभिमानास्पद असून त्यासाठी अधिक सहकार्य आणि उपक्रमशीलता यांची जोड मिळायला हवी.

मंचरच्या मातीत ज्येष्ठ कवयित्री, लेखिका शांताबाई शेळके, श्रेष्ठ कवी ग. ह. पाटील, आणि अलीकडच्या काळात भीमसेन देठे यांच्यासारखे परिवर्तनवादी कवी, लेखक निर्माण झाल्याची प्रेरणा पुन्हा जागी करावी लागेल. त्यांच्या नावाने महाविद्यालय साहित्याचे 'मंचर स्कूल' निर्माण व्हायला हवे, त्यांचे सर्व साहित्य तसेच आंबेगाव परिसराचे सर्व साहित्य-लेखक, कवी यांच्या योगदानाची दखल घेणारे दालन उभारण्याची गरज आहे. जुन्या पिढीतील अनेक कवी, लेखक या भूमीत आजही कार्यरत आहेत त्यांच्या साहाय्याने या चळवळीला पुन्हा उभे करता येईल ही अपेक्षा 'शिवनेरी'चे संपादन करताना वाटते.

●●





**अण्णासाहेब आवटे कॉलेज गीत**

माळरानी स्वप्न फुलले उच्चशिक्षणाचे
धन्य धन्य छात्र सारे आवटे कॉलेजचे ।।धृ।।

कर्मवीरांची रेघ पुढे गावकरी वाढवती
पदरात घालितसे ज्ञानमंदिरे चालती
असीम या त्यागाची नोंद ठेवा तुम्ही आजचे ।।१।।

देत होते गावकरी रुपरूपाया साठवून
मायमावल्याही त्यात देत होत्या योगदान
ज्ञानचिरे घडवता पडे पाऊल प्रगतीचे ।।२।।

मावळाची ज्ञानभूक भागविण्या मंचरी
लाभली रयतेस ही संधी एक साजरी
आले आकारास रूप ज्ञान-पाणपोईचे ।।३।।

करमुली लाभली या पर्वतास किसनाची
रचना झाली या इथे एक नवी संतोषाची
सिंचे रोप हो वनश्री कुणी इथल्या मातीचे ।।४।।

आज लाख झाले आहे त्या नव्व्यान्नवांचे
घेतला ज्यांनी वसा ते नानारूपी गौरवांचे
धनी तेच तेच कर्ते या बहरलेल्या वास्तूचे ।।५।।

– संतोष पद्माकर

●●





# मराठी विभाग

**प्रा. आर. पी. मुठे**

''बुद्ध- तुकाराम- फुले 'बुतुफु' अर्थात प्रतिवादाचा सिध्दांत हा मराठी साहित्याचे मूल्यमापन करण्याचे कालातीत एकक होऊ शकतो.

देशीवादाचे बहुमत काठावरचे आहे. त्याला सनातनी होण्यापासून वाचवायचे असेल तर, श्रमसंस्कृतीच्या जवळच त्याला कायम ठेवणे गरजेचे आहे. म्हणजे त्याचा समन्वय मार्क्सवाद- आंबेडकरवादाबरोबर शक्य होईल. त्यामुळे त्याला सरंजामी म्हणून हिणवणेही आपोआप बंद होईल.''

**- जी. के. ऐनापुरे**

ज्येष्ठ कथा व कादंबरीकार

# अनुक्रमणिका


- **चला आनंद वाटू या** । पोखरकर पायल । २१
- **दुष्काळ** । पौळ सलोनी । २२
- **पर्यावरण संवर्धन काळाची गरज...**। गायकवाड अर्चिता । २३
- **माझा राजा : छत्रपती शिवाजी महाराज** । लांडे कशिश । २४
- **विज्ञान साक्षरतेच्या स्तरांचे महत्त्व** । गव्हाणे आशिष । २५
- **दुष्काळ** । पौळ सलोनी । २६
- **आर्टिफिशिअल इंटेलिजन्स : नोकरीच्या संधी आणि भविष्य** । प्रा. गटे एस. जे. । २७
- **सुंदर हे पर्यावरण** । गायकवाड अर्चिता । ३०
- **मिशन चांद्रयान** । काळे दिव्या । ३१
- **आयुष्य** । पौळ सलोनी । ३४
- **इर्शाळवाडीत : दुःख असे कोसळले...**। ढोबळे वैष्णवी । ३५
- **पर्यावरणाचा ऱ्हास** । पिंगळे नेहा । ३६
- **पसायदान : एक विश्व प्रार्थना** । गागडे प्रिया । ३७
- **राष्ट्रीय सेवा योजना : एक कुटुंब** । मोरे उर्मिला । ३८
- **महाराष्ट्र** । कासार सायली । ३८
- **नन्ही सी कली** । नायकोडी खुशी । ३९
- **माणसाला शेपूट येईल का?** । लोखंडे दिशा । ३९
- **पाणी हेच जीवन** । पिंगळे श्रद्धा । ४१
- **पाठीवरती हात ठेऊन नुसते लढ म्हणा!** । भांड प्रतीक्षा । ४३
- **पर्यावरण संवर्धन : काळाची गरज** । गवारी अनिशा । ४४
- **आयुष्य कसं जगायचं...** । ढेरंगे भावना । ४७
- **बाप मरायला नव्हता पायजे!** । सोमवंशी चंदना । ४८
- **भारताची महत्त्वाकांक्षी मोहीम : चांद्रयान** । मेमाणे आशा । ५०
- **गाडा** । चिखले प्रतीक्षा । ५१
- **हालात का प्याला** । हुळे अमित । ५२
- **पसायदान विश्वकल्याणाचे मागणे** । भांबुरे वैष्णवी । ५३
- **जीएसटी : वस्तू व सेवा कर** । पोखरकर सिद्धी । ५५
- **जिव्हाळा** । गेंगजे पूजा । ५६
- **मोबाईलच्या विळख्यात सापडलेली तरुणाई** । भांड प्रतिक्षा । ५७
- **जीवनावरील कविता** । इंदोरे आदिती । ५८
- **मराठी भाषेची वैशिष्ट्ये** । वळसे सानिका । ५९
- **माझा आवडता महिना श्रावण** । वळसे सानिका । ६०
- **बाबा** । गवारी अनिशा । ६१
- **मराठी भाषा काल, आज आणि उद्या** । ढोबळे वैष्णवी । ६२
- **थोडं तरी जग बाई!** । केंद्रे पद्मजा । ६३
- **पर्यावरण संतुलन : काळाची गरज** । पोखरकर सिद्धी । ६४
- **मराठीच्या बोली व प्रदेश** । चिखले प्रतिक्षा । ६६
- **स्वत:शीच बोलायचे राहून गेले** । केदारी मिरा । ६८
- **मला समजलेले माझे बाबा** । पोखरकर सिद्धी । ६८
- **वाणिज्य विभागातील करिअर संधी** । गोडे संस्कृती । ६९
- **छ. शिवाजी महाराज की जय...**। केदारी मिरा । ७०
- **अस्तित्व हाच सुंदर दागिना** । भांड प्रतिक्षा । ७१
- **तू प्यार है** । संकलन : पोखरकर स्वप्निल । ७२
- **स्त्री अबला नव्हे तर सबला** । भांड प्रतिक्षा । ७३
- **कर्तृत्व शिखराचे विलोभनीय दर्शन : डॉ. ए. पी. जे. अब्दूल कलाम** । माळी चैताली । ७५
- **बाप** । भालेराव ऋतुजा । ७७
- **मुलगी** । दिघे अर्पिता । ७७
- **भावनिक बुद्धिमत्ता** । हुलावळे साक्षी । ७८
- **आयुष्य गंभीर होऊन जगू नका** । पोखरकर प्रिया । ८२
- **पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील : शैक्षणिक कार्य** । सरोदे मनिषा । ८३
- **पाखरू** । ढोबळे संतोष । ८६
- **पिंजरा** । खिराड निकिता । ८६
- **अल्बर्ट आइन्स्टाइन : सापेक्षतावाद** । निघोट शुभम । ८७
- **विज्ञानाची गाथा** । ठोसर प्रांजल । ८९
- **जीवशास्त्रातील नवीन संशोधन: माणसाचे जीनोम प्रकल्प** । बैरागी रोहित । ९०



# चला आनंद वाटू या

**पोखरकर पायल**
प्रथम वर्ष, विज्ञान

चला आनंद वाटुया, आनंद वाटायचं म्हणजे नेमक काय करायचं? आनंदची व्याख्या प्रत्येकजण वेगवेगळी सांगू शकतो. तशीच मीही तुम्हाला आनंदाची व्याख्या सांगते, तसाच आनंद हवा असेल तर झोप घ्या, दिवसभरासाठी हवा असेल तर आवडती गोष्ट करा, वर्षभरासाठी हवा असेल तर कामाकडे व्यवस्थित लक्ष दया आणि जीवनभरासाठी हवा असेल तर दुसऱ्यांनाही मदत करा. लहान-सहान गोष्टीमधुन जो आनंद निर्माण होतो तोच आनंद आपल्या आयुष्यभराचा ठेवा असू शकतो असं मला वाटतं. जेव्हा एखाद्या गरीब व्यक्तीला तुम्ही जेव्हा मदत करता तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर जे समाधान दिसून येते, तो खरा आनंद. जेव्हा एखादा भुकेला व्यक्ती रस्त्यावर दिसतो तेव्हा त्याला काहीतरी खायला देणे हे पाहून त्याच्या चेहऱ्यावर जे समाधान दिसून येत तो खरा आनंद. जेव्हा एखादया अंध-अपंग व्यक्तीला रस्त्यावरून जात असताना रस्ता क्रॉस करायला मदत केल्यावर त्यांच्या चेहऱ्यावर जे हसू दिसून येते, तो खरा आनंद. जेव्हा आपण एखादया चांगली गोष्ट करतो तेव्हा आपल्या आईवडिलांना जो अभिमान वाटतो तो खरा आनंद. जे आहे त्यात समाधानी राहायला शिकणं, तो खरा आनंद.

त्या लोकांबरोबर मैत्री नका करू ज्यांचा स्टेटस तुमच्यापेक्षा वरचढ अथवा खाली आहे. कारण अशी मैत्री तुम्हाला कधीच आनंद देणार नाही. मैत्री आपल्या विचारांशी बरोबरी असलेल्यांशी करा आपल्या बरोबर दुसऱ्याचेही चांगले घड़ावे असे जेव्हा वाटते ना तो आनंद. आनंदी राहण्यासाठी खूप छोट्या - मोठ्या गोष्टी असतात फक्त त्यात आनंद शोधला पाहिजे आणि तो शोधण्यापेक्षा अगोदर तो आपल्या मनाला वाटला पाहिजे. पैशाने कधी आनंद मिळत नाही अन् आनंद कधी विकतही घेता येत नाही, तो स्वत:मध्ये निर्माण करावा लागतो. तुम्ही कोण आहात? यावर तुमचा आनंद अवलंबून नाही तर तुम्ही काय विचार करता? कसे वागता? यावर तुमचा आनंद अवलंबून आहे, असे मला वाटते. तुम्ही एखादी गोष्ट दुसऱ्याला नीट समजावून सांगू शकत नसाल तर ती गोष्ट तुम्हालाच नीट समजलेली नाही. त्यामुळे दुसऱ्याकडून आपल्याला आनंद मिळत नाही हे

खापर फोडू नका. आनंद निर्माण करायला शिका. दुसऱ्यांना दोष देत जगलात तर आनंद हा तुम्हाला मिळणारच नाही. 'आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहिकडे.' जिकडे जाल तिकडे आनंद आहे पण तो शोधायला आम्हाला वेळ नाही. म्हणूनच हा आनंदाची संकल्पना आपल्याला सांगावीशी वाटते. पाच मिनिट फोटो काढण्यासाठी जो चेहऱ्यावर आनंद दाखवता त्याने जर तुमचा फोटो चांगला येत असेल तर विचार करा तुम्ही आयुष्यभर आनंदी राहिले तर तुमचं जीवन किती आनंदी होईल. एखाद्या फुलपाखराप्रमाणे असते सुख, पाठलाग केल्यावर दूर उडून जाते. जबरदस्ती केल्यावर मरण पावते, फळाची अपेक्षा न करता काम करत राहिलात तर अलगद आयुष्यात येऊन बसते, तसाच आहे हा आनंद. प्रत्येक गोष्टीचा आनंद घ्यायला शिका. तुम्ही जे सुख गमवता त्यावर नाराज होण्यापेक्षा छोट्या छोट्या गोष्टीमध्ये आनंद शोधायला शिका. जेवढा आनंद तुम्ही दुसऱ्यांना देता त्यापेक्षा दुप्पट आनंद हा तुम्हाला मिळत असतो हे नेहमी लक्षात ठेवा. काही व्यक्ती असे असतात की, त्यांच्या अस्तित्वाने आनंद मिळतो तर काही व्यक्ती असे असतात की, ते निघून गेल्यावर आनंद मिळतो. तुम्ही ठरवा तुम्ही कोण आहात? आयुष्यात संकटे ही येतातच पण त्या संकटांचा सामना केल्यावर चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद निर्माण होतो. चला तर मग आनंद वाटुया!

●●






## दुष्काळ

दुष्काळ काय संपायचा नाय
तरी
शेतकरी राजा उभाच हाय...
पिक काय उगायचं नाय
तरी
शेतकरी राजा उभाच हाय...
कमी त्याची कमाई हाय
तरी
शेतकरी राजा उभाच हाय...
दुष्काळाने वैतागला
तरी
शेतकरी राजा उभाच हाय...
कर्जामुळे तो कंटाळलाय
तरी
शेतकरी राजा उभाच हाय...
दुःखाने तो ग्रासला हाय
तरी
शेतकरी राजा उभाच हाय...
खरंच तो खूप थकला हाय
तरी
शेतकरी राजा उभायच हाय...

**पौळ सलोनी**
अकरावी, विज्ञान

●●



## पर्यावरण संवर्धन काळाची गरज...

**गायकवाड अर्चिता**
अकरावी, कला

पर्यावरणाचे संतुलन हे मानवाला आरोग्यदायी जीवन जगण्यासाठी आवश्यक आहे. त्यादृष्टीने पर्यावरणाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. म्हणून पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धनाच्या जाणिवजागृतीसाठी संयुक्त राष्ट्र संघाने सन १९७२ ला पर्यावरण दिवस साजरा करण्याची घोषणा केली होती. त्यानंतर दोन वर्षांनी ५ जून, १९७४ ला पहिला जागतिक पर्यावरणा दिन साजरा करण्यात आला. जगातील १०० पेक्षा अधिक देश यात सहभागी आहेत. आताच्या काळात पर्यावरणाची हानी ही जागतिक समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे ही प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी बनली आहे. पर्यावरणातील विविध जैविक व अजैविक घटक हे मानवासाठी निसर्गाने दिलेली अनमोल देणगी आहे. मानवाचा भूतकाळ पाहता असे लक्षात येते की, जेव्हा मानवाचे जीवन निसर्गाच्या सान्निध्यात होते. तेव्हा मानवाला आरोग्यदायी वातावरण लाभत होते व पर्यावरण विषयक समस्या नव्हत्या. परंतु आता प्रगतीच्या नावावर आधुनिकीकरण व शहरीकरणामुळे माणूस निसर्गाच्या सान्निध्यापासून दूर झाला. विविध क्षेत्रातील प्रगती करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करून मानवाने पर्यावरणाला घातक अशा अनेक समस्या निर्माण केल्या आहे.

आता तर चक्क गंगेत मृत शरीरेच विसर्जित केल्याचे दिसून येते. हेही किती विदारक आणि पर्यावरणाला घातक आहे. शहरीकरणासाठी अमाप वृक्षतोड केल्याने निसर्गाचा समतोल ढासळलेला पहायला मिळतो. परंतु वृक्षतोड करताना वृक्ष हे निसर्गाने मानवाला या धरत्रीवर दिलेले वरदान आहे हे मात्र मानव विसरला. खरे तर वृक्षांशिवाय धरतीची कल्पनाही करता येणार नाही. वृक्षांमुळे पृथ्वीचे अस्तित्त्व टिकून आहे म्हणूनच मला सर्वांना सांगावेसे वाटते की, ''वाचतील झाडे तरच जगतील माणसे.'' कारण एक झाड म्हटले की त्यावर मानव, पशु-पक्षी, कीटक यांचा निर्वाह होतो. त्यांना निवारा मिळतो. त्यातूनच पर्यावणाचे जीवनचक्र संतुलित राहते. म्हणून मुंगीपासून ते हत्तीपर्यंत प्रत्येक पशुपक्ष्यांचे गवतापासून ते मोठ्या वृक्षांपर्यंत

सर्व वनस्पतींचे व जलवनस्पतींचे, जलचर-भूचर सर्व प्राणिमात्रांचे पर्यावरण संतुलनात फार मोठे योगदान आहे. त्यामुळे त्यांचे संरक्षण व संवर्धन होणे फार गरजेचे आहे. यातील एकाही घटकाला हानी झाली तर संपूर्ण जीवनचक्र कोलमडते व अनेक समस्या व संकटे उभी राहतात. म्हणून या घटकांचे अस्तित्व टिकवून ठेवणे आणि संवर्धन करणे आपले आद्य कर्तव्य आहे. मात्र यासाठी पर्यावरण संवर्धनात प्रत्येकाची जबाबदारी फार महत्त्वाची आहे. आपण ज्या परिसरात राहतो त्या परिसरातील पर्यावरणाची जबाबदारी त्या व्यक्तीने पार पाडली तरच पर्यावरणाची रक्षण व संवर्धन होईल. नाहीतर एकीकडे वृक्षारोपण करायचे आणि दुसरीकडे अमाप वृक्षतोड करायची हा पर्यावरणाचा संहारच ठरेल.

भारतात मात्र अगदी प्राचीन काळापासून पर्यावरणाचा विचार केलेला आढळतो. भारतीय संस्कृती ही पर्यावरणपुरकच आहे. निसर्गातील झाडे, नद्या, पर्वत, भूमी, सूर्य, चंद्र इत्यादी घटकांना देवतास्वरुप मानून त्यांचे पूजन, रक्षण करणे ही भारतीय संस्कृतीची विशेषता.

●●





## माझा राजा : छत्रपती शिवाजी महाराज

माझ्याही, शिवबांचं एक राज्य होतं, जगाहून सुंदर  
असं ते स्वराज्य होतं ।।  
सुख, शांती, समाधान नांदतं जिथे,  
असे से एक बहुजन स्वराज्य होतं ।।  
जाती-धम- पंथाचा भेदभाव नव्हता,  
न्याय हा सर्वांसाठी एकसमान होता ।।  
न्यायासाठी प्राण गेला तरी चालेल,  
पण अन्याय कुणावर झाला नव्हता,  
राजांचा राज्य कारभार असा होता, गवताची  
कडीसुद्धा गहाण नव्हती।।  
स्वतःसाठी सारेच जगतात या जगी,  
रयतेसाठी जगणारे शिवराय होते ।।  
स्वराज्यासाठी अर्पिले प्राण ज्यांनी,  
अवघा महाराष्ट्र घडविलाहो त्यांनी ।।  
कितीही गुणगान केले तरी कमीच,  
असे अमुचे छत्रपती शिवराय होते ।।

**लांडे कशिश**  
अकरावी, विज्ञान

●●



# विज्ञान साक्षरतेच्या स्तरांचे महत्त्व

**गव्हाणे आशिष**
द्वितीय वर्ष, विज्ञान

विज्ञान ही नवनव्या अनुभव क्षेत्रांना कवेत घेणारी व सतत विस्तारत जाणारी गतिशिल ज्ञानशाखा आहे. निरीक्षण, नियमितता, साधर्म्य शोधणे, उपपत्ती मांडणे, गुणात्मक व गणिती प्रारूपे तयार करणे, गरज व त्यातून निष्कर्ष काढणे यांचा समावेश विज्ञानात होतो. यासाठी विज्ञान साक्षर होणे गरजेचे आहे. आज विज्ञान साक्षरतेची गरज पूर्वी कधीही नव्हती एवढी निर्माण झाली आहे.

विसाव्या शतकात विज्ञान संशोधन आणि तंत्रज्ञानात झालेली प्रगती याला कारणीभूत आहे. ज्याबद्दल सर्वसामान्य माणसालाही त्याविषयी माहिती असणे गरजेचे आहे. विज्ञान साक्षरतेचे स्वरूप व्यापक आहे. त्याचा विस्तार फक्त शालेय कालापुरता सिमित न होता आयुष्यभर झाला पाहिजे. यासाठी पॉलडी हार्ड यांनी १९५८ मध्ये विज्ञान साक्षरता ही संकल्पना पहिल्यांदा वापरली त्यानंतर विज्ञान साक्षरतेच्या आवश्यक घटकांच्या मूल्यमापनाकरीता शेन (१९७५), पीला (१९७६), स्क्रायब्नेर (१९८६) आणि बायली (१९९७) या तज्ज्ञांनी विज्ञान साक्षरतेचे विविध स्तर प्रस्थापीत केले आहेत. त्यातील बायबी (१९९७) यांनी शालेय विद्यार्थ्यांची विज्ञान साक्षरता तपासण्यासाठी सर्व समावेशक सैद्धांतिक विज्ञान साक्षरतेच्या नाममात्र, कार्यात्मक, संकल्पनात्मक आणि बहुआयामी स्तरनिहाय प्रमाण सुचविले आहे ते शाळा/कॉलेजमधली विज्ञान अभ्यासक्रमाच्या दरम्यान विज्ञान साक्षरतेच्या परिक्षणासाठी (मूल्यमापनासाठी) जास्त सोयिस्कर आहे. कारण त्यांच्यामध्ये स्तरनिहाय श्रेणी सुचनात्मक हेतुसाठी बदलता येऊ शकतात. त्यानुसार, बायबी या तज्ज्ञांने सुचविलेल्या विज्ञान साक्षरतेच्या स्तरांची मनोऱ्याची (Pyramid) संरचना पुढीलप्रमाणे–

- **बहुआयामी स्तर**
- **संकल्पात्मक स्तर**
- **कार्यात्मक स्तर**
- **नाममात्र स्तर**

**१. नाममात्र साक्षरता स्तर :** विद्यार्थी या स्तरामध्ये विज्ञान संकल्पनांचे आकलन करतो. परंतु त्यास त्याबाबत पूर्ण

माहिती (जाणीव) नसते.

**२. कार्यात्मक साक्षरता स्तर :** या स्तरामध्ये विद्यार्थी विज्ञानातील संकल्पनांचे वर्गीकरण करतो. परंतु त्यास विज्ञानातील संकल्पनांच्या पूर्णपणे आकलनास काही मर्यादा येतात.

**३. संकल्पनात्मक साक्षरता स्तर :** या स्तरामध्ये विद्यार्थी विज्ञानातील संकल्पनांच्या सामान्य ज्ञानाचा संबंध दैनंदिन जीवनात घडत असलेल्या वैज्ञानिक घटनेशी लावतो. तसेच या स्तरामध्ये विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक क्षमता, वैज्ञानिक पृच्छेची प्रक्रिया आणि तंत्रज्ञानात्मक आरेखन यांचा अंतर्भाव केला जातो.

**४. बहुआयमी साक्षरता स्तर :** या स्तरामध्ये विद्यार्थ्यांच्या विज्ञान साक्षरतेचे दृढिकरण होते. ज्यामध्ये विद्यार्थी विज्ञानातील संकल्पनांचा विविधांगी विचार करून तसेच संकल्पनांचा बारकाईने तपास करुन तो स्वतःचा एक अवबोध तयार करून, विविध वैज्ञानिक संकल्पनांची व घटनांची तो सुकर कारणमीमांसा करतो. वरील विज्ञान साक्षरतेच्या स्तरांचा सद्यस्थितीस संशोधनात्मक आढावा घेतला असता असे लक्षात येते की, इयत्तानिहाय विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान साक्षरतेच्या स्तरांमधील संकल्पनात्मक व बहुआयामी साक्षरता ही निष्कर्षान्वये कमी असल्याचे आढळून आले आहे. त्याच्या वृद्धीकरिता शिक्षकांनी व विद्यार्थ्यांनी समान प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांनी विज्ञान विषय शिकताना दैनंदिन जीवनातील उदाहरणांचा समावेश करावा, सहकार्यात्मक अध्ययन-अध्यापन कार्यनितींचा वापर विज्ञान घटक शिकवताना शिक्षकांनी करावा. तसेच विद्यार्थ्यांनी विज्ञानाचे विविध शोध व त्याचे समाजातील योगदान याबाबत सहकार्यान्वये चर्चा करावी. विद्यार्थ्यांनी शालेय विज्ञान पाठ्यपुस्तकांबरोबर इतर वैज्ञानिक लेख, मासिके यांचे वाचन करावे. अशा प्रकारे शिक्षक व विद्यार्थी दोघांनीही समन्वयाने विज्ञान साक्षरतेच्या चारही स्तरांबाबत क्षमता विकसित करावयाच्या आहे.

●●



## दुष्काळ

होते छप्पर छप्पर
त्याला नव्हते तुटके दार
पडला होता तो दुष्काळ
त्याला नव्हता कोणता काळ
आला दुष्काळ दुष्काळ
पाऊस येई धारा-धारा
माय मने लावा कौलार
बाप मने लावुदे पहिले दार
पडला होता तो दुष्काळ
त्याला नव्हता कोणता काळ
आला दुष्काळ दुष्काळ
घरात नव्हता अन्नाचा कन
माय करे तन - तन
बाप दाबुन बसे कान
पडला होता तो दुष्काळ
त्याला नव्हता कोणता काळ
आला दुष्काळ दुष्काळ

**पौळ सलोनी**
अकरावी, विज्ञान

●●




## आर्टिफिशिअल इंटेलिजन्स : नोकरीच्या संधी आणि भविष्य

**प्रा. गटे एस. जे.**

आर्टिफिशिअल इंटेलिजन्स हा शब्द नसून हा अत्यंत वेगाने बदलणाऱ्या जगातील एक अत्यंत बलवान असा बदल आहे. म्हणजेच सुरवातीच्या आणि अलीकडच्या काळामध्ये जी म्हणून काही प्रगती आपल्याला दिसून येते, तो ठोस बदल आर्टिफिशल इंटेलिजन्स होय. वर्तमानकाळाला तंत्रज्ञानाचे युग म्हटले जाते. या तंत्रज्ञानाच्या काळामध्ये सर्वात परवलीची संकल्पना कुठली असेल तर ती म्हणजे आर्टिफिशल इंटेलिजन्स.

आता आगामी काळात तर आर्टिफिशिअल इंटेलिजन्स हा प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील महत्वाचा भाग व्यापणार आहे. सध्याच्या काळात रोबोसारख्या मशिनरीची निर्मिती झाली आहे. हे रोबो मानवाप्रमाणे बोलतात. मानवाप्रमाणे कार्य करतात. तसेच ज्याप्रमाणे मनुष्य स्वतःच्या बुद्धीने कार्य करतो तसेच ह्या मशीनरी देखील स्वतःच्या बुद्धीने कार्य करतात. त्यालाच आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा अविष्कार म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स म्हणजे शब्दशः मराठीत रूपांतर केले तर कृत्रिम बुद्धिमता होय, हे आपला सर्वांना माहिती आहेच. या पृथ्वीतलावर केवळ मनुष्यच असा प्राणी आहे. जो बुद्धिमान समजला जातो. ज्या प्राण्यांत किंवा मनुष्यामध्ये विचार करण्याची क्षमता असते, अशा व्यक्तीला बुद्धिमान म्हटले जाते. तशी बुद्धी अनेक प्राण्यांमध्येही दिसून येत असली तरी बुद्धीतील विवेक केवळ मनुष्याकडे आहे. त्यामुळे मनुष्य बुद्धिमान प्राणी समजला जातो. परंतु आजच्या काळामध्ये तंत्रज्ञानाने केलेल्या अतोनात प्रगतीमुळे कृत्रिम बुद्धिमतेसारखी देखील टेक्नॉलॉजी अस्तित्वात आली. आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा वापर करून मशिनरीमध्ये कृत्रिम बुद्धिमता बसवण्यात आली. ज्यामुळे मशिन्सला देखील मानवाप्रमाणे स्वतःचे निर्णय घेण्याची, विचार करण्याची शक्ती प्राप्त झाली. आपण जेव्हा लॅपटॉप किंवा संगणकाच्या सहाय्याने काम करत असतो तेव्हा आपण ज्या काही कमांड संगणकाला देतो त्यानुसार आपले संगणक काम करते. परंतु कृत्रिम बुद्धिमतेद्वारे मशिन स्वतःहून निर्णय घेते. आपल्या बुद्धिमतेनुसार कमांड तयार करते की पुढे

काम काय व कसे करायचे आहे. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स ही टेक्नॉलॉजी मानवनिर्मित आहे. मानवाने तयार केलेल्या कृत्रिम बुद्धिमतेचा वापर करून आपण एखाद्या मशिनरीला विचार करण्याची क्षमता देऊ शकतो, असा याचा थोडक्यात अर्थ मानायला हरकत नाही. जॉन मॅककार्थी यांनी १९५६ साली आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा शोध लावला होता. तसेच कालांतराने ह्या तंत्रज्ञानाला खूप मागणी वाढू लागली. वर्तमान काळामध्ये देखील सर्व क्षेत्रामध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर केला जात आहे. भविष्यामध्ये तर आर्टिफिशिअल इंटेलिजन्स प्रत्येक मनुष्याच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनणार आहे. आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा वापर रिटेल, शॉपिंग, फॅशन, सिक्युरिटी, सर्वेलंस, स्पोर्ट्स एनालिसिस, मॅन्युफॅक्चरिंग व प्रोडक्शन अशा जवळपास सर्वच क्षेत्रात होऊ लागला आहे. वर्तमान काळात बरीचशी अशी क्षेत्रे आहेत ज्यामध्ये आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा वापर केला जातो. गुगल मॅपमध्ये एआय वापरले. ज्यामुळे प्रवास करणे आता सगळ्यांसाठी कमालीचे सोयीचे झाले आहे.

उदा.

१. क्रूझ ही देखील एआय वापरून मोठ्या शहरातील लोकांना रोबोटॅक्सी सेवा देणारी पहिली कंपनी आहे.

२. चॅट GPT हे ओपन एआयने विकसित केलेले नैसर्गिक भाषा प्रक्रिया मॉडेल आहे, जे पहिल्यांदा २०१८ मध्ये एका संशोधनात प्रकाशित झाले होते. हे प्रश्नोत्तरे, भाषा भाषांतर आणि परिच्छेद निर्मिती इत्यादीसाठी तयार करण्यात आले होते. चॅट जिपीटीच्या संस्थापकांबद्दल सांगायचे झाल्यास सॅम ऑल्टमन आणि एलन मस्क यांनी २०१५ मध्ये याची सुरुवात केली. मस्कने सुरुवातीच्या काळातच यातून माघार घेतली. त्यानंतर मायक्रोसॉफ्टने यात गुंतवणूक केली आणि ३० नोव्हेंबर २०२२ रोजी प्रोटोटाइप म्हणून लाँच केले.

अनेक उदाहरणे आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्याबाबतीत देता येतील. सध्या अनेक मोठ्या आणि लोकप्रिय कंपन्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा उपयोग करत आहेत. या तंत्रज्ञानाचा उपयोग त्यांच्या फायद्यासाठी करून ते त्यांची कंपनी मजबूत बनवत आहेत. जगभरात आर्टिफिशियल इंटेलिजन्स रिसर्च सेंटर उपलब्ध आहेत. तिथे यावर नवनवीन प्रयोग होत असतात. तसेच अनेक संस्थासुद्धा आहेत, जिथे आर्टिफिशियल इंटेलिजन्सविषयी शिक्षण दिले जाते. अनेक शैक्षणिक संस्थांना आता परिणाम आधारित शैक्षणिक साधनांचे महत्व पटू लागले आहे. त्यामुळे उच्चशिक्षण पद्धती हळूहळू पारंपरिक शिक्षणाच्या कोषातून बाहेर येण्यास सुरुवात झाली आहे. ऑनलाईन कंपन्या आर्टिफिशियल इंटेलिजन्समार्फत ग्राहकांना अनेक चांगल्या सेवा देऊ शकतात. त्यासोबत डेटा चोरी होणे, ऑनलाइन लिंक्स, फ्रॉड्स इत्यादी गोष्टीवर नियंत्रण या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आणता येणे शक्य आहे. डिजिटल गोष्टींमध्ये एआयचा खूप फायदा होऊ शकतो. जसे की स्मार्टफोन्स, ऑनलाईन बँकिंग व्यवहार, ऑनलाईन डेटा, फाईल्स सुरक्षित राहू शकतात.

एआय आधारीत नोकऱ्यांमध्ये वाढ होत आहे. त्याचप्रमाणे कृत्रिम बुद्धिमतेच्या पायाभूत सुविधांमध्ये क्षमता आणि विकास होत आहेत. आतापासून, एआय शक्यतो प्रतिमा प्रक्रिया मिनिटांत किंवा काही सेकंदात प्रशिक्षित करू शकते. कामांना पूर्वी काही तास लागायचे ते आता काही सेकंदांवर आले आहे. एका अहवालानुसार, एआय नोकऱ्यांच्या मागणीत वाढ झाली आहे. भविष्यात देखील राहणार आहे. अधिकाधिक कंपन्या जगातील सर्वांत प्रगत तंत्रज्ञानाचा लाभ घेण्यासाठी आणि सर्वोतम संभाव्य परिणाम मिळविण्यासाठी कुशल कृत्रिम बुद्धिमता व्यावसायिकांच्या शोधात आहेत.

एआय तंत्रज्ञान पोझिशन्सपैकी, कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये अधिक नोकऱ्या देणाऱ्या अग्रगण्य श्रेणी म्हणजे मशीन लर्निंग, डीप लर्निंग, गेल्या काही वर्षांत कृत्रिम बुद्धिमता पाच पटीने वाढली आहे. नवीन विकसित होत असलेल्या तंत्रज्ञानाच्या उदयामुळे अधिक तंत्रज्ञान

व्यावसायिक एआय करिअरकडे आकर्षित होत आहेत. उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांनी उद्योगकेंद्रित वास्तविक प्रकल्पांचा अनुभव असलेले आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय) पदवीधर पुरवणे काळाची गरज आहे. भारताने अलीकडेच अर्थकारणातील अनेक क्षेत्रांमध्ये एआय पुरवण्यास वेगाने वाटचालीस सुरुवात केली आहे. आपल्या देशाची लोकसंख्या पाहता आधुनिक तंत्रज्ञाचा अर्थकारणावर होणारा परिणाम लक्षात घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. एआय संरक्षण आणि सुरक्षेबाबतच्या नवकल्पनांमध्येही महत्त्वाची भूमिका बजावतात. तसेच त्याचा देशाच्या भविष्यावरही परिणाम होऊ शकतो. येणाऱ्या काही वर्षांमध्ये अब्जावधी तरुण नोकऱ्या शोधण्यासाठी सज्ज होणार आहेत. या तरुणांना त्यांच्या शिक्षणाच्या योग्यतेच्या नोकऱ्या पुरवणे हे जगभरातील नेत्यांसमोरील मोठे आव्हान असेल. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमतेच्या क्षेत्रात करिअरच्या असंख्य संधी उपलब्ध होतील. त्यामुळेच शालेय जीवनातच आर्टिफिशियल इंटेलिजन्सबद्दल विद्यार्थ्यांना माहिती होणे, ही मुले या विषयात पारंगत होणे गरजेचे आहे. सध्याच्या अभ्यासक्रमात तरी या विषयावर दुसरा काही पर्याय नाही. कोरोनामुळे देशात आणि परदेशात करिअरच्या नवीन संधी निर्माण होत आहेत. आता बऱ्याच गोष्टी आर्टिफिशियल इंटेलिजन्सशी संबंधित नोकऱ्यांवर अवलंबून आहेत. जर तुम्ही आयटी क्षेत्रातील नवीन क्षेत्रात करिअरचा मार्ग शोधत असाल तर तुम्ही आर्टिफिशियल इंटेलिजन्सकडे वळून भविष्य उज्ज्वल करु शकता भविष्यात या क्षेत्रात प्रचंड क्षमता आहे. तसेच या क्षेत्रात अनेक रोजगाराच्या उत्तम संधी आहेत. जर तुम्हीही भरघोस पगाराची नोकरी करु इच्छित असाल तर आर्टिफिशियल इंटेलिजन्स या क्षेत्रात पारंगत व्हायलाच हवे.

शालेय अभ्यासक्रमात आर्टिफिशल इंटेलिजन्स हा मुख्य विषय आहे. हा विषय मुलांना केवळ सर्जनशील बनवतो, ही तर मुलांची कल्पनाशक्ती, तार्किक विचार, समस्या सोडवणे आणि निर्णय घेण्याची क्षमता वाढते. झपाट्याने बदलणाऱ्या जगाची आपल्या मुलांना लहानपणापासूनच ओळख करून देणे महत्त्वाचे आहे. इंटरनॅशनल स्कूलमध्ये हा विषय सुरुवातीपासूनच समाविष्ट केलेला आहे किंबहुना आगामी काळातील प्रमुख संस्थांमधील शिक्षण याच दिशेने जाणारे असेल, यात तीळमात्रही शंका नाही.

**आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) ची काही महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये**

**१. स्वयंचलित शिक्षण (Machine Learning) :** AI स्वतःहून अनुभवातून शिकू शकते, मोठ्या प्रमाणात डेटाचे विश्लेषण करून त्यातून निष्कर्ष काढू शकते.

**२. नेचरल लँग्वेज प्रोसेसिंग (NLP) :** भाषेची समज असलेली AI, जसे की भाषण ओळखणे, अनुवाद, भाषांतर, इत्यादी.

**३. प्रॉब्लेम सॉल्विंग (Problem Solving):** AI जटिल समस्यांचे विश्लेषण करून त्यावर उपाय शोधू शकते, त्यासाठी लॉजिक आणि नियम लागू करते.

**४. मानवी इंटरफेसची समज (Human-Computer Interaction):** AI मानवांसोबत संवाद साधून त्यांच्या क्रियाकलापांची समज प्राप्त करू शकते, जसे की व्हॉइस असिस्टंट, चॅटबॉट्स इत्यादी.

**५. माहिती आणि डाटा विश्लेषण (Data Analytics):** AI मोठ्या प्रमाणात माहितीचे विश्लेषण करून त्यात नवे पॅटर्न आणि ट्रेंड्स शोधू शकते.

**६. स्वायत्त निर्णयक्षमता (Autonomous Decision-Making):** AI स्वतः निर्णय घेऊ शकते, जसे की सेल्फ-ड्रायव्हिंग कार्समध्ये मार्ग निवडणे.

**७. दृष्टि प्रणाली (Computer Vision):** AI ला प्रतिमा आणि व्हिडिओ यांचे विश्लेषण करून त्यातली वस्तू, माणसे, किंवा स्थिती ओळखता येते.

**८. रोबोटिक्ससाठी वापर (Robotics Integration):** AI चा वापर रोबोट्सना स्वायत्तपणे काम करण्यासाठी शिकवण्यासाठी केला जातो.

●●

# सुंदर हे पर्यावरण

परमेश्वराची सुंदर करणी,
नांदता या पर्यावरणी ।
हिरवी झाडे, उंच डोंगरे,
आणिक खळखळ पाणी ।।

चहुदिशांनी वनसंपत्ती,
पर्यावरणा घेरती ।
सुंदर स्थळे अन सुंदर दृश्ये,
चित्तास मोहुनी टाकती ।।

देवाचा हा वर सुंदर
आम्हा जीवांसाठी ।
पृथ्वीवरी उतरला स्वर्ग,
निसर्ग सोबत देण्यासाठी ।।

पर्यावरणाच्या सान्निध्यात,
प्रसन्न होते चित्तवृत्ती ।
झाडे-झुडपे, डोंगर, नद्या,
हीच आपुली खरी संपत्ती ।।

न कंटाळता नद्या वाहती,
न विसरता ऋतु येती ।
फळ-फुले झाडांवर बहरती,
नित्य-नेमे सेवा करती ।।

पण काळानुसार सगळं बदललं
माणसानेच पर्यावरणाला फसवलं ।
तोल ढळतोय वातावरणाचा ।।

जंगलतोड, प्रदुषण आणिक
निष्काळजीपणा ।
शिकवित आहेत धडे?
पुन्हा पुन्हा आपणा ।।

नकोत तोडू राने,
पुन्हा फुलवा वने ।
प्रदुषणाला घालून आळा,
व्हा आता शहाणे ।।

पर्यावरणाला ढासळून,
काय मिळणार?
आपुला अंत, आपणच करणार ।।

झाडे लावा, पर्यावरण जगवा,
वसुधेला बनवा हरितश्यामल ।
यातच आहे हित आपुले,
पर्यावरणाला पुन्हा बनवुया निर्मल ।।

**गायकवाड अर्चिता**
अकरावी, कला





# मिशन चांद्रयान

**काळे दिव्या**

तृतीय वर्ष, वाणिज्य

भारताने पहिल्या चंद्र मोहिमेअंतर्गत चंद्र १ चे २२ ऑक्टोबर, २००८ रोजी यशस्वी प्रक्षेपण केले. या मोहिमेमुळे भारताला पृथ्वीचा एकमेव नैसर्गिक उपग्रह असलेल्या चंद्राची रहस्ये जाणून घेण्यास मदत झाली, शिवाय जगातील वैज्ञानिकांच्या ज्ञानाचा विस्तारही झाला. चांद्रयान १ मोहिमेच्या प्रक्षेपणानंतर अवघ्या आठ महिन्यात चांद्रयान १ ने मोहिमेतून सर्व उद्दिष्टे साध्य केली. आजही जगभरातील शास्त्रज्ञ या मोहिमेतून गोळा केलेल्या माहितीचा अभ्यास करत या मिशनमुळे जगभरात भारताची विश्वासार्हता वाढली होतीच. सोबतच भारतीय शास्त्रज्ञांचे मनोबलही वाढले आहे. याचा परिणाम म्हणून अता भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्त्रोने चांद्रयान २ आणि चांद्रयान ३ यशस्वीपणे पार पाडली आहे.

चांद्रयान१ हे भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या चंद्रावरील मोहिमेचा पहिला टप्पा घेऊन जाणारे अंतराळ यान आहे. चांद्रयान १ हे मानवरहीत अंतरिक्षयान असून त्यामध्ये चंद्राला प्रदक्षिणा मारणारा तसेच चंद्रावर आदळणारा एक असे दोन भाग आहेत. ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपण यानाची प्रगत पिढी (पी. एस. एल. सी. ११ या प्रक्षेपकाद्वारे चांद्रयानाचे प्रक्षेपण २००८ श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रावरुन झाले. नोव्हेंबर ८ रोजी यानास यशस्वीरीत्या चंद्राच्या कक्षात टाकण्यात आले. १४ नोव्हेंबर २००८ रोजी रात्री ८ वाजून ६ मिनिटांनी यानाला जोडलेला मून इम्पॅक्ट प्रोब यशस्वीरित्या वेगळा करण्यात आला. जवळपास २५ मिनिटांच्या प्रवासानंतर हा प्रोब चंद्राच्या दक्षिण ध्रुवाजवळील 'शॅकलटन क्रेटर' येथे आदळला. या घनाकृतीला प्रोबच्या चारही बाजूला भारताचा ध्वज चितारला असल्यामुळे प्रतिकात्मकरीत्या भारतीय ध्वज चंद्रावर पोहचला आहे व हे साकारणारा भारत हा जगातील चौथा देश बनला आहे.

या दूरसंवेदनशील (रिमोट सेन्सिंग) आंतराळाचे वस्तुमान प्रक्षेपणाच्या वेळी ११३० किलोग्रॅम होते व ते चंद्राच्या कक्षेत पोहचल्यावर ६७५ किलोग्रॅम असेल. या अंतराळावर उच्च अचुकतेची (रिझोल्यूशनची) दृश्य व अवरक्त प्रकाश तसेच क्ष-किरणांसाठीची दूरसंवेदन उपकरणे आहेत. या यानाचा कार्यकाळ दोन वर्षांचा असून

काळात त्याच्याकडून चंद्राच्या पृष्ठभागाचे सर्वेक्षण करुन त्याचा संपूर्ण रासायनिक नकाशा तयार करणे तसेच चंद्राच्या संरचनेन त्रिमितीय नकाशा तयार करणे अपेक्षित आहे. चंद्राच्या ध्रुवीय प्रदेशांना अधिक महत्त्व दिले आहे कारण तिथे बर्फ असण्याची शक्यता आहे या मोहिमेचा खर्च अंदाजे ३८६ कोटी रुपये इतका आहे. या मोहिमेमध्ये इस्त्रोचे पाच भार (Payload) व इतर अंतराळसंस्थाचे सहा भार आहेत यामध्ये नासा, इसा व बल्गेरियाची अंतराळ संस्था यांचा समावेश आहे या अंतराळ संस्थांची उपकरणे विना वाहून नेली जात आहे. भारताची अंतराळ संशोधन संस्था इस्त्रोने ऑक्टोबर २००८ मध्ये चांद्रयान १ लाँच केल होत. हे चांद्रयान २००९ च्या ऑगस्ट महिन्यापर्यंत चंद्राची माहिती पुरवत होते. यामध्ये एक ऑर्बिटर चंद्रांच निरी आणि अभ्यास करण्यासाठी पाठवण्यात आलं होत. सोबतच एक इम्पँक्टर देखील लाँच करण्यात आले होते.

**चांद्रयान मिशन १ (उद्दिष्टे)**

चंद्राभोवतीच्या कक्षेत मानवरहीत अंतराळात ठेवणे. चांद्रयान१ हे अंतराळायान चंद्राच्या रासायनिक, खनिज फोटो, जिओलॉजिकल मॅपींग करणे.

१. चंद्राच्या पृष्ठभागाचा तपशीलावर नकाशा आणि पाणी, हेलियमची उपस्थिती तसेच मॅग्नेशियम, ॲल्युमिनियम, सिलिकॉन, कॅल्शियम, लोह आणि हायटॅनियम यांसारख्या खनिजे आणि रासायनिक घटकांचे वितरण आणि चंद्राच्या पृष्ठभागावरील उच्च पातळीचा तपशीलावर नकाशा मिळवणे हे त्याची उद्दिष्टे आहेत.
२. युरेनियम आणि थोरियमसारख्या अनुक्रमांक घटाकांचा शोध घेणे व देशातील तांत्रिक पाया अपग्रेड करणे.

**चांद्रयान मिशन : मोहिमेने काय साध्य केले?**

चांद्रयान १ च्या माध्यमातून चंद्राच्या पृष्ठभागावर पाणी आणि बर्फाचा शोध घेण्यासोबतच खनिज आणि रासायनिक घटक शोधून चंद्राच्या दोन्ही बाजूंचे ३ डी चित्र तयार करायचे होते. चांद्रयान १ ची कक्षा १८ मे २००९ रोजी १०० ते २०० किमीपर्यंत वाढवण्यात आली आणि सर्व प्रमुख उद्दिष्टे यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली चंद्राच्या पृष्ठभागावर क्षैतिज गुहेसारखी रचना आढळून आली. ज्यास लावा घन म्हणतात. त्याची लांबी १.७ किलोमीटर आणि रुंदी १२० मीटर असल्याचे आढळून आले हे मिशन २ वर्षांसाठी पाठवले होते. पण २९ ऑगस्ट २००९ रोजी अचानक त्याचा रेडिओ संपर्क तुटला. काही दिवसानंतर इस्त्रोने या मोहिमेच्या समाप्तीची अधिकृत घोषणा केली. तोपर्यंत यानाने चंद्राच्या ३४०० हून अधिक प्रदक्षिणा पूर्ण केल्या होत्या. याने अत्याधुनिक सेन्सर्सकडून विस्तृत डेटा प्रसारीत करुन ३१२ दिवस चंद्राभोवती प्रदक्षिणा घालत या वेळेपर्यंत वाहनाने बहुतेक वैज्ञानिक उद्दिष्टे पूर्ण केली होती.

**चांद्रयान २**

चांद्रयान २ ही मोहिम चांद्रयान नंतरची भारताची दूसरी चंद्रमोहिम आहे. हे यान इस्त्रोने बनवले असून ते २२ जुलै, २०१९ रोजी श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अवकाश केंद्रातून भूस्थिर उपग्रह प्रक्षेपण यान मार्क ३ द्वारे प्रक्षेपित करण्यात आले. या यानात कक्षाभ्रमर (Orbiter), लँडर व रोव्हर यांचा समावेश असून हे सगळे भारतात विकसित करण्यात आले आहेत. चांद्रयान २ या भारतीय अवकाश मोहिमेअंतर्गत चंद्राच्या दक्षिण गोलार्धात प्रथमच कोणत्याही देशाकडून प्रत्यक्ष यान उतरवण्यात येणार आहे. या मोहिमेत फक्त भारतच नाही तर चंद्राविषयी संपूर्ण मानवजातीला असणारे ज्ञान वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

चांद्रयान २ मोहिम ही एक अत्यंत गुंतागुंतीची मोहिम आहे. जी इस्त्रोच्या मागील मोहिमांच्या तुलनेत महत्त्वपूर्ण तांत्रिक झेप दर्शवते. चंद्राच्या अनपेक्षित दक्षिण ध्रुवाचा शोध घेण्यासाठी त्यात आक्टोबर, लँडर आणि रोव्हरचा समावेश होता. स्थलाकृती, भूकंपशास्त्र, खनिज ओळख आणि वितरण, पृष्ठभागाची रासायनिक, रचना, मातीची थर्मी-भौतिक वैशिष्ट्ये आणि कमी चंद्राच्या वातावरणाची रचना यांचा तपशीलावर अभ्यास करून चांद्रयान १ वैज्ञानिक ज्ञानाचा विस्तारक करण्यासाठी या मोहिमेची रचना करण्यात आली होती. या मोहिमेचा एकूण खर्च सुमारे ८०० कोटी रुपये होता. यामध्ये प्रक्षेपणासाठी २०० कोटी रुपये आणि उपग्रहाच्या ६०० कोटी रुपयांच्या खर्चाचा समावेश होता परदेशी भूमीवरुन ही मोहिम सुरु

करण्याच्या तुलनेत हा खर्च जवळपास भारतासाठी निम्मा आहे. 'चांद्रयान २' या मिशनला पूर्ण होण्यासाठी तब्बल ४८ दिवसांसाठीचा कालावधी लागेल. हे चांद्रयान २' चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरणार आहे. चंद्राच्या या भागाबाबत फार माहीती उपलब्ध आहे.

**श्रीहरीकोटा**

भारतीयांसाठी आजचा दिवस अत्यंत आनंदाचा आणि अभिमानाचा आहे. त्या क्षणाची सर्व भारतीय वाट पाहत होते. ते 'चांद्रयान २' अखेर यशस्वीरीत्या चंद्राच्या दिशेने झेपावले आहे. भारतीय अवकाश संशोधन संस्थेच्या Indian Space Research Organisation, ISRO) महत्त्वाकांक्षी मिशन चांद्रयान २ चं चेन्नईच्या श्रीहरीकोटा येथून यशस्वी प्रक्षेपण झाले. सोमवारी (२२ जुलै) दुपारी २ वाजून ४३ मिनिटांनी 'चांद्रयान २' ने आकाशात झेप घेतली. हा क्षण भारतीयांसाठी ऐतिहासिक क्षण ठरला. हे मिशन यशस्वी होताच भारत चंद्रावर जाणारा जगातील चौथा देश ठरेल. चंद्राच्या या भागाबाबत फार कमी माषसती उपलब्ध आहे. इस्त्रोच्या मते, चांद्रयान २ हे चंद्राचे भौगोलिक वातावरण, खनिज तत्त्व, वायुमंडळाच्या बाहेरील आवरण आणि चंद्रावरील पाण्याची उपलब्धता याबाबतची माहिती मिळवणार आहे.

**मिशन 'चांद्रयान २' ची वैशिष्ट्ये**

१. चांद्रयान २ पूर्णपणे भारतीय बनावटीचं, बाहुबली रॉकेट यशस्वी उड्डाण.
२. मिशन 'चांद्रयान २' मोहीम दोन महीला शास्त्रज्ञांच्या नेतृत्वात यशस्वी, दक्षिण ध्रुवापर्यंत पोहचण्यासाठी ४८ दिवस लागणार.
३. ३,८४४ लाख किमीचं अंतर कापून भारताचे 'चांद्रयान २ चंद्रावर पोहचणार.
४. चंद्राच्या दक्षिण ध्रुवाच्या पृष्ठभागावर उतरणारा भारत एकमेव देश ठरणार.
५. दक्षिण ध्रुवावरील रहस्य उलगडणार, चंद्रावरील पाणी, खनिजांचा शोध घेणार.

**चांद्रयान : २ मोहिमेमुळे भारताला होणार हे फायदे**

पृथ्वीचा एकमात्र नैसर्गिक उपगृह, चंद्रावर भारताची दूसरी सर्वात महत्वकांक्षी मोहीम चांद्रयान २ सोमवारी आंध्र प्रदेशातील श्रीहरीकोटावरून सर्वात शक्तीशाली रॉकेट लॉन्चर जीएसएलवी मार्क-तीनच्या माध्यमातून प्रस्थापित केले. ही मोहीम चंद्रावरील पाण्याचे अस्तित्व आहे व भविष्यात चंद्रावर माणसाच्या राहण्याच्या संभवतेची चाचणी करेल. जवळपास ९७८ करोड रुपये खर्च आलेले चांद्रयान २ ला चंद्रावर पोहचण्यासाठी ३,८४,४०० किलोमीटर अंतर पार करावे लागेल. हे प्रक्षेपण १५ जुलै रोजीच होणार होते. मात्र तांत्रिक अडचणींमुळे याची तारीख बदलण्यात आली. चांद्रयान २ हे चंद्राच्या दक्षिणीध्रुव क्षेत्रात उतरेल. या क्षेत्रात आजपर्यंत कोणताही देश गेलेला नाटी इस्त्रोचे प्रमुख के. सिवन यांच्यामतानुसार, मिशनांतर्गतचा शोध घेईल तसेच सौरमंडळातील जिवाश्मांचा देखील शोध घेईल असे यान पाठवणारा भारत जगातील चौथा देश ठरला आहे. इस्त्रोचे माजी अध्यक्ष म्हणाले, ''भारताचे लक्ष हे अंतराळाचे नेतृत्व करणारा देश म्हणून पुढे येणे हे आहे.''

**चांद्रयान ३ ची माहिती : चांद्रयान ३ ने रचला इतिहास !**

भारताचे चंद्रावर पहिले पाऊल! २३ ऑगस्ट, २०२३ दिवशी सगळ्याच न्यूज चॅनेलवर होत्या. भारतात वैज्ञानिक निरीक्षणांची, वैज्ञानिक अभ्यासाची प्राचीन परंपरा आहे. शल्व, कणाद, वराहमिहीर, आर्यभट्ट, भास्कराचार्य, चरक, सुश्रुत, बौधायन, पाणिनी अशी कितीतरी नावे सांगता येतील या सर्वांनी विविध विषयांतील मुलभूत संशोधन जगाच्या अगोदर मांडले, ही वस्तुस्थिती आहे. त्याचबरोबर आपल्याला बऱ्याच गोष्टी रामायण, महाभारत यांसारख्या ग्रंथातून मिळाल्या. पण त्याचबरोबर विज्ञान आणि गणिती या दोन विषयात भारतीय आणि भारतीयांनी मोलाची कामगिरी केली आहे. यात शंकाच नाही. एकोणिसाव्या शतकातील आजच्या भारतात आपल्याकडे दोन गोष्टी मुबलक आहेत. एक म्हणजे माहिती व दूसरी तंत्रज्ञान. या दोन्ही गोष्टीत भारताच्या विज्ञानाला शिखरापर्यंत नेण्याची ताकद आहे. चांद्रयान ३ मोहिमेच्या यशस्वितेचे मानकरी भारतीय वैज्ञानिक आहेत. त्यांच्या अथक परिश्रमांमुळे ऐन श्रावणात यशाचे टिपूर, यशाचे चांदणे अवघ्या भारताला तसेच जगाला अनुभवता आले.

**चांद्रयानाची सुरुवात**

इस्त्रोने १४ जुलै २०२३ रोजी हे श्रीहरीकोटा येथून लाँच केलेल चांद्रयान ३ हे अवकाशयान २३ ऑगस्ट २०२३ रोजी यशस्वीरित्या चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरवणारा भारत हा पहिलाच देश ठरला. त्यानंतर तब्बल १४ दिवस हे चांद्रयान ३ चंद्रावर संशोधन करत होते.

**चांद्रयान ३ मोहिमेची उद्दिष्टे**

चांद्रयान ३ मोहिम भारताच्या चंद्र संशोधन कार्यक्रमातील एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. हे चंद्र आणि त्यांच्या संभाव्य संसाधनांबद्दलची आपलीच वाढवण्यास मदत करेल. हे मिशन अंतराळ संशोधनात भारताच्या क्षमतांचे प्रदर्शन करेल आणि देशाला या क्षेत्रात आघाडीवर ठेवण्यास मदत करेल. चांद्रयान ३ मिशन १४ जुलै २०२३ रोजी प्रक्षेपित झाले. लँडर आणि रोव्हर चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर उतरतील हा प्रदेश पाण्याच्या बर्फाने समृद्ध असल्याचे मानले जाते. हे अभियान एक वर्ष चालेल अशी अपेक्षा आहे. चांद्रयान ३ मोहिम हे मोठे उपक्रम आहे आणि हे भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्त्रो (ISRO) च्या कठोर परिश्रम आणि समर्पणाचा पुरावा आहे या मोहिमेमुळे चंद्राविषयीच्या आपल्या समजूतदारपणास पूर्ण योगदान मिळेल आणि भविष्यातील चंद्र शोध मोहिमांचा मार्ग मोकळा करण्यास मदत होईल.

**चांद्रयान ३ चे उद्देश**

चंद्राच्या पृष्ठभागावर सुरक्षितपणे लँडीग करणे, प्रगत अवकाशयान तंत्रज्ञान, चांद्रयान उतरविण्याचे तंत्रज्ञान, स्वदेश उपकरणे यांच्या चाचण्या करणे, रोव्हरच्या फिरण्याच्या आणि क्षमतेच्या निरीक्षण आणि प्रात्यक्षित. ही भारतीय अंतराळ संशोधन संस्थेची (ISRO) तिसरी चंद्र शोध मोहीम आहे. यात चांद्रयान २ प्रमाणेच लँडर आणि रोव्हर आहे, परंतू आर्बीटर नाही. हयाचे प्रोपल्शन मॉड्युल हे कम्युनिकेशन रिले उपग्रहासारखे वागेल. अंतराळ यान १०० किमी चंद्राच्या कक्षेत येईपर्यंत प्रोपल्शन हे लँडर भाणि रोव्हर होऊन गेले.

●●



## आयुष्य

गोड माझी सोनपरी
गोड माझी सोनपरी
टपोरे डोळे गोरी - गोरी
रुपानी देखनी काजुकतली
बडबडी माझी बोलकी बाहुली
भावाची लाडकी दिदूबाई
पप्पांची राजकुमारी
गोड माझी सोनपरी

**पौळ सलोनी**
अकरावी, विज्ञान

●●



## इर्शाळवाडीत : दुःख असे कोसळले....

**ढोबळे वैष्णवी**
तृतीय वर्ष, कला

रायगड जिल्हयातील खालापूर तालुक्यात इर्शाळगडाच्या खाली असलेल्या इर्शाळवाडी येथे बुधवार १९ जुलै रोजी डोंगराचा काही भाग कोसळून मोठी दुर्घटना घडली. आतापर्यंत २६ जणांचा मृत्यू झालेला आहे. इर्शाळवाडी येथील दरडग्रस्तांच्या सेवेसाठी जेसेबी यंत्र घेऊन जाण्यासाठी हेलिकॉप्टर मुंबईच्या सांताक्रुझ हवाईतळावर सज्ज आहेत. अशी माहिती संरक्षण विभागाच्या सुत्रांनी दिली. 'मुंबईत तैनात असलेल्या एमआय १७ व्ही ५ या हेलिकॉप्टरची जेसीबी वाहून नेण्याची क्षमता नाही. जेसीबीचे भाग सुट्टे करून ते वाहून नेता येतील पण त्यामध्ये हवामानाचा अडथळा आहे. संबंधित अपघात क्षेत्र हे दुर्गम भागात आहे. त्यातून सध्या ढगांनी वेढलेले आहे.

या स्थितीत हेलिकॉप्टरवर उंचीवर नेणे हे धोकादायक ठरते. तरीही हवामानात सुधारणा होताच हेलिकॉप्टर उड्डाण करण्यास वैमानिक सज्ज आहेत. संबंधित जेसीबीचे भाग डोंगरभागात उतरवून पुन्हा जोडणी करणारे कारागिरही येथे पोहोचणे आवश्यक आहे. रात्री साडेअकराच्या सुमारास दरड कोसळली त्यावेळी पाऊस कोसळत होता. या वाडीकडे जाणाऱ्या पायवाटेवरील पहिल्या वाडीमध्ये काही जण झोपी गेले साडेबाराच्या सुमारास पोलिस आणि रुग्णवाहिका आल्या, तेव्हाच अनेकांच्या मनात शंका आली चौकशीनंतर वरच्या वाडीत दरड कोसळल्याचे त्यांना समजले आणि खालच्या वाडीत घबराहट पसरली. वरून पाऊस कोसळतोय भाणि मिट्ट काळोख अशा परिस्थितीत नातेवाईकांची शोधाशोध सुरू झाली होती. वाड़ीवरील काही तरूण पायथ्याशी असलेल्या शाळेत रात्री झोपायला आले होते. त्यांनाही आवाज आल्याने ते वाडीकडे पळाले मासेमारी व शेतीच्या कामासाठी गेलेली कमावती काही मंडळी रात्रीची बाहेरच थांबल्याने त्यांचे प्राण वाचले.

या इथंच काल होतं एक गाव.
या छोट्याश्या गावाचं ईर्शाळवाडी नाव.
वर गावाच्या बाजूला उभ्या डोंगराचा कडा
खाली पायथ्याशी त्याच्या खाली वाहणारा ओढा

ज्या डोंगराकुशीत त्यांनी उंबरा थाटला
आज त्याच्याच घावान सारा संसार फाटला
पावसाच्या सरीसंग उभा कडा कोसळला
दगडा मातीच्या ढिगा संग सारा गाव निखळला,

पोटाखाली ढिगाऱ्याच्या उरलं फक्त नाव.
या इथंच काल होत एक गाव
हाडामांसाची माणसं इथं मातीत गाडली,
गाडलेल्या जीवापायी बाळवासर रडली

कुणा हरपली माय. कुणा दिसेना वासरु,
वेड्यापिस्या नजरेनं शोधतंय लेकरु,
बेभानलेल्या नजरेनं सारं काहुर माजलं
लेकराच्या शोधापाई बाचं काळीज भाजलं,

हरपलं सारं गाव, मोडला डाव
या इथचं होत काल एक गाव

यानुसार इर्शाळवाडी दुर्घटनेत आतापर्यंत २७ जणांच्या मृत्यूची नोंद करण्यात आली होती. तर अनेक जण अजूनही बेपत्ता असल्याचे समजते, असे यामध्ये सांगण्यात आले आहे. या घटनेत एकूण २२ जण जखमी झाले असून जवळच्या रुणालयात उपचार घेत आहेत. इर्शाळवाडीच्या इतिहासाचा फार कुठे उल्लेख येत नाही पण आसपासचे गडकिल्ले आणि या परिसरातून बोरघाटाकडे म्हणजे आजच्या खंडाळा घाटाकडे जाणारे गट पाहता ३१ विद्यार्थी विविध आश्रमशाळांमध्ये शिक्षण घेत असल्याने ते या दुर्घटनेतून बचावले तसेच नातेवाईकांकडे काही कारणानिमित्त गेलेल्या १६ जणांचेही या दुर्घटनेतून प्राण वाचले आहेत. येथील नागरिकांसोबतच इर्शाळवाडीत काही प्रमाणात पाळीव जनावरांनाही आपले प्राण गमवावे लागले.

●●



## पर्यावरणाचा ऱ्हास

पर्यावरणाचा ऱ्हास हा एक महत्त्वाचा विषय बनला आहे. पर्यावरणाचा ऱ्हास म्हणजेच झाडांची, वनस्पतींची लोप पावण्याची प्रक्रिया होय. झाडांच्या कापणीमुळे अनेक जीवांचा नाश होत आहे. माणूस स्वतःच्या सोयीसाठी अनेक झाडांची कापणी करून त्यावर त्याच्या सोयीसाठी मोठ मोठ्या इमारतींमुळे पर्यावरणाचा ऱ्हास होऊन माणुस वायु प्रदुषण, जलप्रदुषण अशा विविध समस्यांना तोंड देत आहे. एकिकडे स्वतःच्या सोयीसाठी तो स्वतःचेच आरोग्य धोक्यात घालत आहे, हे मात्र त्याला कळत नाही. माणूस हा स्वार्थीवृत्तीने स्वतःच्या सोयीसाठी झाडांचा जीव घेतो. मात्र झाडे ही निःस्वार्थ वृत्तीने आपणास फळे, फुले, विविध औषधी वनस्पतींकडून औषधे, मानवास लागणारे जवळपास ८०% वस्तु निसर्ग देतो आणि आपण पर्यावरणाचा ऱ्हास करून स्वत:चा पण ऱ्हास करुन घेतोय. निसर्गाच्या सान्निध्यात वावरताना मन अगदी प्रसन्न होते. जीवन जगण्यासाठी निसर्ग एक वेगळीच प्रेरणा देत असतो. माणसाचे आणि निसर्गाचे नाते फार अतुट आहे पण सध्याचा मानव हे कुठतरी विसरत चालला आहे. म्हणूनच माणसाने निसर्गाचे महत्त्व जाणून घेऊन विविध प्रकारच्या झाडांची लागवड करून आपला आणि पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची काळजी घेऊन पर्यावरण जपले पाहिजे.

**पिंगळे नेहा**
प्रथम वर्ष, कला.

●●



# पसायदान : एक विश्व प्रार्थना

**गागडे प्रिया**
प्रथम वर्ष, वाणिज्य

ज्ञानेश्वरीच्या सुरूवातीला वेदांनी सांगितलेल्या आणि आत्मरुपात वसलेल्या ज्या रुपाचे वर्णन करता करता शेवटच्या आध्यायात ज्ञानेश्वर त्याच विश्वात्मक (विश्वव्यापक असूनही विश्वाहून निराळ्या) देवाला आपण केलेल्या ज्ञानेश्वरीरुपी वाग् यज्ञाचे फल स्वरूप म्हणून पसायदान (प्रसाद) मागताना म्हणतात....

**जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।।**
**भूतां परस्परे जडो । मैत्र जीवांचे ।।**

ज्या व्यक्ती खळ (वाईट प्रवृत्तीच्या) आहेत. त्यांच्यातील खलत्व (वाईट प्रवृत्ती) नुसतीच जावो (नष्ट होवो) नव्हे तर त्यांचे सत्प्रवृत्तीत परावर्तित व्हावी आणि ह्याची फलश्रुती म्हणजे सर्वच व्यक्ती सर्वांचे मित्र होवोत! (जेथे भगवंताने 'विनाशायच दृष्कृताम्' (दृष्टाचा नाश करण्यासाठी) मी जन्म घेतो असे म्हटले. त्याच भगवंताकडे ज्ञानेश्वरांनी प्रेमबुद्धीने असा 'प्रसाद' मागितला) पसायदानमध्ये सर्व प्राणिमात्रांमध्ये प्रेमाची भावना निर्माण व्हावी व मनातील दृष्ट भावनांचा नाश व्हावा अशी विनंती ज्ञानेश्वर महाराज करतात.

**दुरितांचे तिमीर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।।**
**जो जे वांछिल तो ते लाहो । प्राणिजात ।।३।।**

वेदांनी गायलेल्या 'तमसो मा सदमय।' ज्याप्रमाणे आगीचा धर्म जाळणे, नदीचा प्रवाहित राहणे, त्याचप्रमाणे मानवाच्या माणुसकीचा धर्म आपण मानला आणि त्याचा प्रत्यय प्रत्येकाच्या जीवनात आला तर त्या धर्मरुपी सूर्याच्या प्रकाशाने विश्वातील प्रत्येकाच्या जीवनात आला तर त्या धर्मरुपी सूर्याच्या प्रकाशाने विश्वातील प्रत्येकाचे जीवन उजळून निघेल. ह्याचा परिणाम असा होईल की, ज्याला ज्याला जे जे हवे ते ते मिळेल. कारण जर एका व्यक्तीची कर्तव्य असेल आणि येथे तर माऊलींनी 'प्राणिजात' असे बोलून जगातील यच्चयावत प्राणिमात्रांच्या धर्माची ग्वाही दिली आहे. निर्मळ मनाने अखिल विश्वाच्या कल्याणासाठी एका भक्ताने हात जोडून प्रत्यक्ष जगन्नियंत्याकडे केलेली विश्वप्रार्थना म्हणजे पसायदान. मनात व्यक्तीचा याही आपपरभाव न ठेवता शुद्ध आणि निरागसतेने परमेश्वराकडे विश्वकल्याणासाठी केलेले आर्त मागणे म्हणजे पसायदान. आपले इवलेसे हात पसरून त्या ओंजळीत परमेश्वराकडे

असं देणं मागणं की ज्यामुळे अखिल विश्वात शांती, समृद्धी, ज्ञान आणि समाधान कायमस्वरूपी नांदावे, यासाठी केलेली प्रार्थना म्हणजे पसायदान. संत ज्ञानेश्वर विरचित *ज्ञानेश्वरी* या ग्रंथातील शेवटच्या (ओवी १७९४ ते १७०२) १८ व्या अध्यायाचे समापन पसायदान या प्रार्थनेने होते.

## पसायदान

आतां विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावे । पसायदान हे ।।
जे खळांची व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मी रती वाढो ।
भूता परस्परे जडो । मैत्र जीवांचे ।।
दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो ।
जो जे वांछील तो ते लाहो । प्राणिजात ।।
वर्षत सकळमंगळी । ईश्वरनिष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंगळी । भेटतू या भूतां ।।
चला कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणीचे गाव ।
बोलते जे अर्णव । पीयूषांचे ।।
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड ते तापहीन ।
ते सर्वाही सदा सज्जन । सोयरे होतु ।।
किंबहुना सर्वसुखी । पूर्ण होऊनि तिही लोकी।
भजिजो आदिपुरूखी । अखंडित ।।
आणि ग्रंथोपयोविये । विशेषी लोकी इये ।
दृष्टादृष्टविजयें । होआवें जी ।।
येथ म्हणे विश्वेश्वरावो । हा होईल दानपसावो ।
येणे वरे ज्ञानदेवो । सुखिया जाहला ।।

या मृत्यूलोकामध्ये जो मनुष्यदेह लाभलेला आहे तो अत्यंत क्षणभंगूर आहे पण तो आत्मोन्नतीसाठी दिला आहे याची जाणीव ठेवून जो ग्रंथाचे अध्ययन करतो तो दृष्ट व अदृष्ट दोन्हींवर विजयी होतो. दृष्ट म्हणजे जे प्राप्त झाले ते अदृष्ट म्हणजे जे प्राप्त व्हायचे ते. आपल्या वाटेला आलेले भोग किंबा सुख दु:ख त्याला म्हणतात. द्रष्ट-अदृष्ट, म्हणजे आपले संचित, म्हणजे पूर्वकर्म साठलेले आहे ते प्रारब्ध होऊन उभे राहणार आहे.

●●

### राष्ट्रीय सेवा योजना : एक कुटुंब

सात दिवसाच्या जोरावर इथे आठवीत मिळवल्या जातात.
अनोळखी चेहरे सारे क्षणात आपलेसे होतात.
शिक्षण आयुष्य घडवते, पण इथे माणसं घडवली जातात.
वर्षानुवर्षांची नाती प्रत्येक वर्षी वृद्धिंगत होतात.
सात दिवस समाजकार्याचा वसा हाती असतो.
अन् मातीला हातही न लावणारा या मातीचा होऊन जातो.
मजा, मस्ती, राग, रुसवा प्रसंगी भांडणे करतात,
पण जेवणाच्यावेळी मात्र सारे एकत्र मिळून जेवतात.
सात दिवसाच्या सहवासात अतुट आपुलकी जडते.
माणूस तर आपण असतोच हो पण इथे माणुसकी घडते.
ह्या वेगळ्या कुटुंबाचे महत्त्व आम्ही जाणतो,
ग्रुप, गँग वगैरे नाही तर हक्काने भावकी म्हणतो.

**मोरे उर्मिला**
प्रथम वर्ष, वाणिज्य

●●

## महाराष्ट्र

जिजाऊ माँसाहेबांच्या गळ्यातील माळ म्हणजे महाराष्ट्र,
सईचं कुंकवाने भरलेलं कपाळ म्हणजे महाराष्ट्र,
जगद्गुरू तुकोबांच्या भजनातला टाळ म्हणजे महाराष्ट्र,
कायम गनिमांचा झंझार होता तो महाराष्ट्र,
छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ म्हणजे महाराष्ट्र,
कायम आठवणीतले आभाळ म्हणजे महाराष्ट्र,
कर्तृत्वाच्या सरीनं हिरवं झालेलं रानमाळ म्हणजे महाराष्ट्र,
आणि तुमचा आमचा प्राण म्हणजे महाराष्ट्र.

**कासार सायली**
प्रथम वर्ष, वाणिज्य

●●



## नन्ही सी कली

माँ, मैं हुं तेरी नन्ही सी परी
बस एक बार आने दो तेरी गली
माँ, मैं हुं तेरी नन्ही सी परी
बनकर तेरे आँखो का तारा
विश्व जीत लुंगी सारा
मैं बनुंगी तेरा सहारा
तेरे सभी दुःखों को बना लुंगी अपना
मत मारो मुझको, मुझे जीना है,
माँ, मैं हुं तेरी नन्ही सी कली
इस दुनिया को अपनी आँखो से देखना है
सब सुख देना राही सपना,
माँ, मुझे इस दुनिया के रिती-रिवाज सिखना है
पढकर मुझे कल्पना चावला जैसा बनना है
माँ, मैं तेरी नन्ही सी कली
मुझे जिंदगी जीना है।
माँ, अगर तुम मुझे मार डालेंगी,
माँ तो मेरी जिंदगी खत्म हो जाएगी वही
मगर माँ, मुझे फुल बनकर खिलना हैं।
मैं हुं तेरी नन्ही सी कली
मुझे जीना है, माँ.
माँ मुझे जीना हैं।

**नायकोडी खुशी**
तृतीय वर्ष, कला

●●

## माणसाला शेपूट येईल का ?

माणसाने माणसाशी, संवाद तोडला आहे
म्हणून तो घरा घरात, एकटा पडला आहे.

येत्या काळात ही समस्या, अक्राळविक्राळ होईल,
तेव्हा आपल्या हातातून, वेळ निघून जाईल.

कदाचित माणूस विसरेल, संवाद साधण्याची कला,
याच्यामुळे येऊ शकते, मूक होण्याची बला.

पूर्वी माणसं एकमेकांना, भरभरून बोलायचे,
पत्र सुद्धा लांबलचक, दोन चार पानं लिहायचे.

त्यामुळे माणसाचं मन, मोकळं व्हायचं,
हसणं काय? रडणं काय? खळखळून यायचं!

म्हणून तेव्हा हार्टमध्ये ब्लॉकेज फारसे नव्हते,
राग असो लोभ असो, मोकळं ढाकळंऽ होतं.

पाहुणे-रावळे गाठी भेटी सतत चालू असायचं,
त्याच्यामुळे प्रत्येक माणूस टवटवीत दिसायचं.

आता मात्र माणसाच्या, भेटीच झाल्या कमी,
चुकून भेट झालीच तर आधी बोलायचं कुणी?

ओळख असते नातं असतंऽ पण बोलत नाही कुणी,
काय झालयं कुणास ठाऊक, त्यांचं त्यांनाच माहीत नाही

घुम्यावाणी बसून राहतो, करून पुंगट तोंड
दिसतो असा जसा काही निवडुंगाचं बोंड

व्हॉट्सॲपवर प्रत्येकाचेच, भरपूर ग्रुप्स असतात
बहुतांश सदस्य तर तुसते येड्यावाणी बघतात

त्यांनी मेसेज वाचल्याच्या, दिसतात निळ्या खुणा,
पण रिप्लायसाठी सुटत नाही, शब्दांचा पान्हा.

नवीन नवीन व्हॉट्सॲपवर चांगलं बोलत होते,
दोन-चार शब्द तरी टाईप करत होते.

आता मात्र बऱ्याच गोष्टी, इमोजेसवरच भागवतात,
कधी-कधी तर्करी करून, इमोजीनेच रागवतात.

म्हणून इतर प्राण्यांसारखी, माणसं मुकी होतील का?
भावना दाबून धरल्या म्हणून माणसाला शिंग येतील का?

काय सांगावं नियती म्हणेल लावा याला शेपटी,
वाचा देऊन बोलत नाही, फारच दिसतो कपटी.

हसण्यावर नेऊ नका, खरंच शेपूट येईल,
पाठीत बुक्का मारून मग कुणीही पळून जाईल.

म्हणून म्हणतो बोलत चला, काय सोबत नेणार?
उगाच तुमची वाचा जाऊन, फुकट शेपूट येणार.

**लोखंडे दिशा**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

●●





# पाणी हेच जीवन

**पिंगळे श्रद्धा**
तृतीय वर्ष, कला

**''पाणी नाही द्रव्य, आहे ते अमृततुल्य''**

पाणी म्हणजे जल व जल म्हणजेच जीवन. हे वाक्य अत्यंत समर्पक आहे. पाण्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. पाणी अस्तित्त्वात असेल तर ही जीवसृष्टी अस्तित्वात राहणार आहे. अन्यथा नाही परंतु या जगात असे काही घटक अस्तित्त्वात आहेत की ज्यांच्यामुळे जल संकट ओढावण्याची शक्यता नाकारता येत नाही आणि तो घटक म्हणजे .... मनुष्य, हो मनुष्य!

मनुष्याने हे वेळोवेळी सिद्ध करून दाखवलं आहे. त्याची अशी धारणाच झाली आहे की, या पृथ्वीचा कसाही वापर केला तरी तिला कुठे काय होणार आहे? मानवाने केवळ आपल्याच स्वार्थासाठी हे सर्व केले आहे आणि म्हणूनच ''नेमेचि येतो पावसाळा'' असे म्हणण्याऐवजी ''नेमेचि येतो दुष्काळ'' असे म्हणायची वेळ आली आहे. शेती म्हटलं की पाण्याचा वापर तर होणारच. पण पाण्याअभावी असे कितीतरी शेतकरी या महाराष्ट्रामध्ये आहेत की, ज्यांनी पाण्याअभावी निर्माण झालेल्या समस्यांमुळे मृत्यूला कवटाळलं! आणि त्यामुळे कित्येकांची कुटुंब निराधार झाली व यासाठीच जर मानवाने पाण्याचा वापर योग्य पद्धतीने केला असता त्याचे योग्य नियोजन केले असते तर कदाचित ही वेळ आलीच नसती. पाणी हा विषय जरी कितीही चावून चोथा झालेला असला त्याबद्दलच अजूनही अज्ञान दिसून येतं. जसे की, आपण जितके जास्त पाणी अडविण्याचा प्रयत्न करू तितक्याच प्रमाणात ते जमिनीत मुरेल आणि म्हणूनच नदी, नाले यांची खोली जितकी जास्त तितके उत्तम. परंतु आडात नाही तर पोऱ्ह्यात कुठून येणार. हे लक्षात न घेता पाणलोट क्षेत्रात करण्यात येणारी विविध कामे आणि समस्या समोर घेऊन येतात व अशा चुकीच्या पद्धतींचा अवलंब केल्यामुळेच गावे व त्यांमधील समस्या वाढत राहतात आणि म्हणूनच अशा परिस्थितीवर मात केली. आता तुम्ही म्हणाल की असे गाव अस्तित्त्वात आहे का? आणि जरी असेल तर कोणते?

**कडवंची (जालना)** : मराठवाडा - महाराष्ट्रातील ८ जिल्हे मराठवाड्यात समाविष्ट होतात. या आठ जिल्ह्यांपैकीच एक

जिल्हा म्हणजे जालना आणि या जिल्ह्यातीलच एक गाव व ते म्हणजे कडवंची. इतर गावांप्रमाणेच असलेलं हे गाव. या गावात १९९५ सालापर्यंत स्त्रियांना पाण्यासाठी मैलोनमैल पायपीट करावी लागायची. ओसाड रान आणि पाण्याची फारशी चांगली परिस्थिती नसलेलं असं हे गाव. पण आज या गावातील एक नव्हे दहा नव्हे तब्बल ७५०-८०० शेतकरी आहेत की ज्यांच्याकडे शेतीसाठी मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध आहे आणि हे सर्व शक्य झाले ते कशामुळे? हे शक्य झाले ते या गावातील लोकांनी उपलब्ध केलेल्या शेततळ्यांमुळे! आज या गावात ४०० हून अधिक शेततळे अस्तित्त्वात आहेत व आज या गावात शेततळे आणि भुजल यांच्या वापरामुळे वर्षभर पाण्याची कमतरता जाणवत नाही. काही वर्षांपूर्वी याच गावातील लोक कामासाठी स्थलांतर करत होते. पण आज परिस्थिती अशी आहे की शेकडो लोक संपूर्ण भारतातून या ठिकाणी येतात.

**शेततळे ठरली वरदान :**

१. क्षेत्रफळ - ८१० हेक्टर
२. लोकसंख्या - ५०००
३. शेततळ्यांची संख्या - ५६४
४. द्राक्ष उत्पादनात अग्रेसर (२५००० एकरपेक्षा अधिक क्षेत्रांत द्राक्षाचे उत्पादन)
५. आज या गावात तुतीच्या झाडाची देखील लागवड केली जाते.
६. या गावातील शेतकऱ्यांना त्यांचा माल बाहेर घेऊन जाण्याची गरज पडत नाही. याऊलट व्यापारी स्वत:हून येतात माल विकत घेण्यासाठी.

**अशक्य ते सहज शक्य :**

१. २००० सालापर्यंत या गावाचे उत्पन्न एकूण ७७ लाख रुपये. पण आज या गावाचे उत्पन्न आहे. तब्बल ७५ कोटी रुपयांहून अधिक.
२. शेततळ्यांची संकल्पना अंमलात आणल्यामुळेच हे शक्य झाले आहे, असे येथील स्थानिक लोक सांगतात.
३. आज जे काही सुखाचे दिवस येथील शेतकऱ्यांच्या जीवनात आले ते केवळ या संकल्पनेचा अवलंब केल्यामुळेच आणि म्हणूनच ''शेततळे हीच आमची पुंजी आहे कारण त्यामुळेच आज आम्ही कमावू शकतो व आमची घरे चालवण्यास सक्षम आहोत,'' असं देखील ते अभिमानाने सांगतात. आणि म्हणूनच पावसाळी शेतीसाठी कडवंची हे गाव अत्यंत उत्तम उदाहरण आहे, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

**इतरांसाठीही प्रेरणास्त्रोत :**

कडवंची या गावाने इतर गावांनाही या संकल्पनेची अंमलबजावणी करण्यास प्रवृत्त केले आहे. जर अशा पद्धतींचा अवलंब प्रत्येक गावाने केला तर नक्कीच पाण्याचे संकट ओढावणार नाही व जर प्रत्येकाने पाण्याचा योग्य वापर केला व त्याबाबत जागरुकता पसरवण्याचा प्रयत्न केला तर आपण या मानवजाती जल संकटापासून नक्कीच वाचवू आणि म्हणूनच....

**''जाणा महत्त्व पाण्याचे,**
**होईल कल्याण जीवनाचे!''**

**जनसेवा हीच ईश्वरसेवा :** शेकडो श्रोते गाडगेबाबांची आतुरतेने वाट पाहत होते. आज त्यांना बाबांच दर्शन घडणार होतं. त्यांची अमृतवाणी ऐकायला मिळणार होती ! पण बाबा अजून किर्तनाच्या जागी पोहचलेले नव्हते. तेवढ्यात कोणाला तरी कळले की, बाबा नदी किनाऱ्यापर्यंत आले आहेत. तत्क्षणी कित्येकांनी नदीकडे धाव घेतली. बाबा तिथे होतेच. सगळ्यांनी हात जोडून लीनपणे बाबांना विनवणी केली. ''बाबा भजनाची वेळ झाली येताय ना?'' ''अरे बाबांनो, मग हे काय चाललंय? मी भजनच करतोय! ही देवाचीच पूजा चाललीय!'' सारे विस्मयाने बघतच राहिले. कारण तेव्हा बाबा एका कुष्ठरोग्याला अंघोळ घालत होते!

त्या दिवशीच्या किर्तनात बाबांनी निरुपणासाठी हाच विषय घेतला. त्यांच्या मते, सर्व माणसे ईश्वराचीच लेकरे आहेत. ती ईश्वराचीच विविध रुपे आहेत. या माणसांची सेवा हीच प्रत्यक्ष ईश्वराची सेवा होय. देवाची भक्ती करायची असेल, त्याची सेवा करायची असेल तर देवळात जायची गरज नाही, तीर्थक्षेत्रांना भेटी देण्याची गरज नाही. प्रत्येक माणसाचा आत्मा हाच परमेश्वर आहे. आपण

माणसातच ईश्वर शोधला पाहिजे. माणसाचीच सेवा केली पाहिजे.

दुर्दैवाने काही जणांना धडधाकट निरोगी शरीर लाभत नाही. काही जण जन्मत:च अपंग असतात. काहीजणांना वेगवेगळ्या रोगांनी ग्रासलेले असते. जेष्ठ नागरिकांना त्यांचे शरीर साथ देत नसते. या सगळ्यांना साधे माणसासारखे जीवन जगणे कठीण बनते. शरीर दुबळे असल्याचे दु:ख असतेच पण समाजात लोक उपेक्षा व अवहेलनाही करतात. याचेही दु:ख असतेच. यामुळेच या सर्वांचे जीवन दु:खाने व्यापलेले असते. यात खेद तर या दुर्दैवी माणसांचा काहीही दोष नसतो. त्यांनी कोणताही गुन्हा केलेला नसतो. निसर्गानेच हे दु:ख त्यांच्यावर लादलेले असते. अशा लोकांना आधार देणे, त्यांचे जीवन सुसह्य करणे आवश्यक असते. म्हणून इतरांनी या अशा लोकांची सेवा केली पाहिजे. त्यांना मदत केली पाहिजे. ते आनंदी बनेल तर देवालाच आनंदी केल्यासारखे होईल. ती ईश्वरसेवाच ठरेल. समाजात काही जणांना जातिपातीच्या कारणाने कमी दर्जाचे मानले जाते. त्यांना साध्या साध्या गोष्टींसाठी सुद्धा खूप झगडावे लागते. त्यांना समाजात मानाने वागवले जात नाही. गरीब व अनाथ यांचीही अशीच स्थिती असते. त्यांनाही आधाराची गरज असते. त्यांना आधार दिला, त्यांची सेवा केली तर तीही ईश्वर सेवाच ठरेल. दीनदुबळ्यांना आधार देणे, त्यांना सुखी करणे ही ईश्वराची पूजा करण्याइतकीच श्रेष्ठ गोष्ट आहे.

**जे का रंजले गांजले । त्यांसी म्हणे जो आपुले ।**
**तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा ।।**

हे संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचे तत्त्वज्ञान मनात बाळगून जे यथायोग्य आचरण करतात, तेच खरे देवभक्त होत. म्हणून कुष्ठरोग्यांची सेवा करणारे बाबा आमटे हे खरे देवभक्त! हरिजनांना मंदिर प्रवेश मिळावा म्हणून प्रायोपवेशन करणारे पूज्य साने गुरूजी हे सुद्धा खरे देवभक्त !

●●



## पाठीवरती हात ठेऊन नुसते लढ म्हणा.!

कळलंच नाही सर मी काय लिहावं तुमच्यावरती,
कार्य तुमचे महान आहे, महान आहे तुमची कीर्ती,
तुम्ही नाही केली एल. एल. बी. कायद्याच्या जगातली कधी,
पण जीवनाच्या कायद्यातील पद्धत मात्र तुमची होती साधी,
आयुष्यभर तुम्ही प्रयत्न केले आदर्श विद्यार्थी घडवायचे,
त्यात नाव यावे म्हणून माझेही प्रयत्न असायचे,
सर तुमच्या शब्दाचे काळजावर वार होत होते,
पण तेच शब्द जीवनाच्या युद्धात लढण्याचे बळ देत होते.
सर तुमच्या प्रत्येक गोष्टीत मी माझा आदर्श मानते,
तुमच्यासारखे जगले तर जीवनात यशस्वी होईल हे जाणते,
तुमच्याविषयी खूप लिहायचं होतं,
माझ्या आयुष्याच्या डायरीत,
पण अक्षर सापडेना मला तुम्ही शिकविलेल्या बाराखडीत,
कितीही काळोख दाटला तरी सूर्याचे तेज मिटत नाही,
कितीही आभार मानले तरी शिक्षकांचे उपकार फिटत नाही,
आयुष्याच्या वादळातून पार होत शिडे सगळ्यांचीच किनाऱ्यावर लागतात, फक्त 'पाठीवरती हात ठेवून ''लढ'' म्हणणारे' शिक्षक सोबत असावे लागतात, (आतापर्यंत लाभलेल्या सर्व शिक्षकांना समर्पित कविता)

**भांड प्रतीक्षा**
प्रथम वर्ष, वाणिज्य

●●



# पर्यावरण संवर्धन : काळाची गरज

**गवारी अनिशा**
प्रथम वर्ष, वाणिज्य

आज मानवप्रगतीमुळे पर्यावरण प्रदुषित होत आहे. प्राचीन काळात ऋषीमुनी आपल्या आश्रमाबाहेर अनेक झाडे लावत असत. यामुळेच त्यांचे आयुष्य निरोगी व अनेक वर्षे राहत असे. आपल्या चारही बाजूंना असलेल्या सुंदर निसर्गात परमेश्वराने एकाहून एक अद्भुत गोष्टी बनवल्या आहेत. सुंदर फुले, हिरवी झाडे, वेगवेगळे रंग आणि रूप असलेले पशु-पक्षी इत्यादी गोष्टी आपले मन मोहून घेतात. मानवी जीवनात झाडांचे महत्त्व विशेष आहे. झाडे मनुष्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत, ती मनुष्य जीवनाचा आधार आहेत. याशिवाय पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षाचे महत्त्व भरपूर आहे. परंतु आज मानवाने आपल्या नवनवीन शोधांच्या अभिलाषामुळे पर्यावरणाला नुकसान पोहचवणे सुरू केले आहे. अशा काळात पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज झाली आहे. पृथ्वीवरील अनेक प्राणी आपल्या अन्नासाठी वृक्षांवर अवलंबून आहेत. मनुष्य हवेत असलेला ऑक्सिजन हा प्राणवायु श्वासाद्वारे ग्रहण करतो. अशा पद्धतीने वृक्ष मनुष्यासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. मागील काही वर्षांमध्ये देशातील कारखान्यांची संख्या वाढली आहे. या कारखान्यात लागणारा कच्चा माल तसेच देशातील वाढती लोकसंख्या अशा अनेक गोष्टी वृक्षतोडीसाठी कारणीभुत आहेत. देशात होत असलेला पर्यावरणाचा ऱ्हास वेळीच रोखण्यात आला नाही तर येत्या काळात ही खूप मोठी समस्या बनून जाईल. पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व समजून जगभरातील देश वृक्ष लागवड व जास्तीत जास्त सी. एन. जी. गॅसचा उपयोग करू लागले आहेत. पर्यावरण आपले भविष्य आहे म्हणून याच्या संरक्षणासाठी आपल्याला वेळीच लक्ष द्यावे लागेल. पर्यावरणाला प्रदुषण मुक्त करण्यासाठी सर्वात आधी जल प्रदुषणाला रोखावे लागेल. कारखान्यांचे खराब पाणी, घरातील दूषित पाणी, नाल्यांमधून वाहणारा मल इत्यादी समुद्रात जाण्यापासून रोखले गेले पाहिजे. कारखान्यातून निघणारे विषयुक्त पाणी पिऊन जलचर व उभयचर प्राण्यांचा मृत्यू होतो. दुसरीकडे त्याच प्रदुषित पाण्याला शेतात वापरले जाते व दुषित पाण्यात उगवलेला भाजीपाला खाऊन आपले आरोग्य बिघडण्याचा धोका असतो. सांगण्याचे तात्पर्य एवढेच आहे की, जर आपल्या हृदयाला आरोग्यदायी बनवायचे आहे तर आजपासून प्रयत्न

करायला हवे. जलप्रदुषणानंतर वायुप्रदुषणाने पर्यावरणाला खूप हानी होते. जैवविविधतेचे जतन व संवर्धन करणे मानवी अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत गरजेचे आहे. यास्तव वसुंधरेचं देणं फेडण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी तुमची आमची सर्वांची आहे, हे आजच्या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त लक्षात घेणे गरजेचे आहे.

'निसर्ग' हे मानव, वन्य जीव, जलचर प्राणी, पक्षी अन् वनस्पती यांना लाभलेलं मोठं वरदान आहे. या पार्श्वभूमीवर निसर्गाचे संवर्धन करण्यासाठी आधी आपल्याला पर्यावरणाचे रक्षण करणे गरजेचे आहे. कारण पर्यावरणाचा समतोल बिघडणे म्हणजे मानवाच्या अस्तित्वाला धोका निर्माण होणे होय. सध्याच्या काळात जल, वायू व ध्वनी प्रदुषणामुळे वसुंधरेचं स्वास्थ्य बिघडत चाललं आहे. कारण प्रदुषणामुळे पर्यावरणाचं नुकसान होत असल्याची जाणीव नसणं हे बौद्धिक मागासलेपणाचे लक्षण आहे. पर्यावरणाच्या संवर्धनातून वसुंधरेचा बचाव करण्यासाठी जागतिक पातळीसह देश स्तरावर पर्यावरणवादी चळवळीची व्याप्ती वाढीस लागणे ही दिलासा देणारी गोष्ट आहे. पुढे जाऊन ती लोक चळवळ झाली तर ते सर्व घटकांच्या दृष्टीने अधिक लाभदायक ठरेल हे निश्चित. पृथ्वीवरील मानवजातीचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन व्हावे तसेच जल आणि वायू प्रदुषण थांबावे या उद्देशाने ५ जून, १९७२ रोजी स्वीडनमधील स्टॉकहोम येथे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत १३० देशांनी हजेरी लावली होती. त्यातून 'पर्यावरण' हा विषय सर्वदूर शालेय जीवनापासून अभ्यासक्रमात सामील करण्यात आला. हे पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी टाकलेलं पहिलं पाऊल आहे.

वैश्विक स्तरावर ५ जून हा दिवस १९७४ सालापासून 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा होऊ लागला आहे. 'ओन्ली वन अर्थ' या घोषवाक्याने पहिला जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जातो. तेव्हापासून पर्यावरण समस्यांवर जागतिक पातळीवर ठोस उपाय शोधले जात आहेत. तथापि, बदलती जीवनशैली, वाढणारे शहरीकरण, त्यातून होणारी प्रचंड वृक्षतोड, पाण्याचा अमर्याद वापर, बांधकामांसाठी टेकड्या-पर्वतांचे खोदकाम, नद्या-खाड्यांमधून होणारे रेती उत्खनन, जल व वायु प्रदुषण, अणु चाचण्या, वाढत्या वाहनांमुळे होणारे वायु-ध्वनी प्रदुषण या सर्व गोष्टीमुळे पर्यावरणाचे आणि त्या परीने वसुंधरेचे बेसुमार नुकसान होत आहे. जीवसृष्टीच्या दृष्टीने जीवनरक्षक कवच असलेला 'ओझोन वायु'चा थर कमजोर होत चालला आहे. त्यामुळे मानवाच्या अस्तित्वाला धोका निर्माण होत आहे. पर्यावरणाचा असमतोल झाल्याने अवकाळी पाऊस, चक्रीवादळ, अतिवृष्टी, अति उष्ण तापमान, ऋतुमानात होणारे बदल, भुकंपाचे हादरे येणे, या समस्यांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. हे सर्व थांबविण्यासाठी प्रत्येक सुजाण नागरिकाने सरकारला जल-वायु प्रदुषण रोखण्यासाठी स्वयंस्फुर्तीने हातभार लावल पाहिजे.

वृक्षारोपण मोहिमेत राष्ट्रीय कर्तव्य म्हणून तन-मन-धनाने भाग घ्यावा. 'एक मूल, एक झाड' लावून त्याची निगा राखण्यासाठीची जबाबदारी घेतली पाहिजे. पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने कडक कायदे करून जंगलांमधील वृक्षतोड कुठल्याही परिस्थितीत रोखली पाहिजे. इतकेच नव्हे, तर जंगलांच्या संवर्धनासाठी वन्यप्राण्यांचे रक्षण करणे अत्यावश्यक आहे. वाघ हा खरा जंगलचा राजा असल्याने त्याची संख्या कशी वाढेल यादृष्टीने वनविभागाने ठोस उपाययोजना कराव्यात. जल प्रदूषण थांबविण्यासाठी औद्योगिक आस्थापनांद्वारे सोडले जाणारे केमिकल्सयुक्त पाणी नद्या, खाड्या, समुद्राच्या पाण्यात मिसळणार नाही, यासाठी राज्याचा उद्योग विभाग आणि राज्यप्रदूषण नियंत्रण मंडळाने कठोर निर्बंध लादावेत. जेणेकरून जलप्रदुषणास आळा बसू शकेल. 'आपणही जगा आणि इतरांनाही जगू द्या' हे ध्येय उराशी बाळगून नागरिकांनी आपले जीवन मार्गक्रमित करावे म्हणजे पर्यावरणाचे संवर्धन होऊन 'वसुंधरा बचाव' लोकचळवळ यशस्वी होऊ शकेल.

पर्यावरण रक्षण व संवर्धनाच्या कामात राज्यातील युवा-युवतींसह शालेय विद्यार्थी, जेष्ठ नागरिक आणि महिला मंडळे सर्व शक्तीनिशी सामील झाल्यास त्याला लोकचळवळीचे स्वरूप प्राप्त होईल. प्राथमिक व माध्यमिक

शाळांमधील मुलं-मुली आणि शिक्षक, कॉलेजचे विद्यार्थी, प्राध्यापक हे सर्व मोठ्या आवडीने या मोहिमेत भाग घेताना दिसत आहेत, ही आनंदाची गोष्ट असून त्याचे आपण स्वागतच केले पाहिजे. 'मी कचरा करणार नाही आणि इतरांना करू देणार नाही' ही भावना प्रत्येकार रूजावी, हेच प्रयत्न शासकीय पातळीवर झाले पाहिजेत. पर्यावरण रक्षण करतेवेळी निसर्गासह त्यातली हवा, पाणी, माती, झाडे, प्राणी, पक्षी, फुले या प्रत्येकाला आपल्याला जपावं लागेल. त्याला पर्याय नाही. याशिवाय हवेतील प्रदूषण कमी व्हावे, यासाठी भविष्यात इलेक्ट्रिक वाहनांवर अधिक भर द्यावा लागेल. तीर्थस्थळांवरील नद्यांचे संवर्धन करणे हेही पर्यावरणाच्या दृष्टीने गरजेचे आहे. याशिवाय पिण्याच्या पाण्याचे सर्व स्त्रोत स्वच्छ राखणे अगत्याचे आहे. हे सर्व साध्य करण्यासाठी लोकांच्या सहभागाची खूप आवश्यकता आहे.

'जैवविविधता' ही पृथ्वीवरील मानव, वृक्षवल्ली, वन्य पशु-पक्षी, जलचर प्राणी यांच्या जीवनाचा मूळ आधार आहे. या पार्श्व भूमीवर जैवविविधतेचे जतन व संवर्धन करणे मानवी अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी अत्यंत गरजेचे आहे. यास्तव वसुंधरेचं देणं फेडण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी तुमची-आमची सर्वांची आहे, हे विसरायला नको. प्रदुषणाला आळा घालून पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करण्यासाठी 'एंड प्लॅस्टिक पोल्युशन' हे घोषवाक्य घोषित करून त्या अनुषंगाने शासकीय यंत्रणेमार्फत प्लॅस्टिक उत्पादन आणि वापरावर स्थायी स्वरूपाचे निर्बंध घालण्यात यावे. पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन करून 'वसुंधरा बचाव' ही आता लोकचळवळ उभी राहिली आहे. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे....' हा संदेश संतांनी रयतेला दिला आहे. 'वृक्ष' ही वसुंधरेची हिरवी फुफ्फुसे असून याच फुफ्फुसांच्या माध्यमातून तुम्हा-आम्हास जगण्यासाठी आजीवन प्राणवायू मिळत असतो. यास्तव वसुंधरेच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी कर्तव्य बुद्धीतून 'झाडे लावा, झाडे जगवा' ही मोहिम तन-मन- धनाने राबविली जाणे ही काळाची गरज आहे. पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश ही पंचमहाभुते असून त्यात 'वायु' हा सर्वात महत्त्वाचा घटक आहे. कारण वायुविना मानवी जीवनाची कल्पना करणेच अशक्य आहे. शुद्ध हवा, अर्थातच प्राणवायू आपल्याला झाडांपासून मिळतो. ही झाडं पृथ्वीवरील समस्त जीवसृष्टीची संजीवनी आहे. वृक्षांमध्ये प्राणवायू पुरविण्याची तसेच वातावरणातील अशुद्ध व विषारी वायु शोषून घेण्याची क्षमता असते. तात्पर्य, वृक्ष हे जीवसृष्टीचे खऱ्या अर्थाने जीवनदाते असल्याने जुन्या वृक्षांची काळजी घेत, जास्तीत जास्त नवीन वृक्ष सातत्याने लावले पाहिजेत, त्यामुळे पाण्याचा भुगर्भात निचरा होऊन शेतकऱ्यांच्या शेतातील विहिरींना भरपूर प्रमाणात पाणी उपलब्ध होऊ शकेल. शहरांमधील हाऊसिंग सोसायट्यांनी 'रेनवॉटर हार्वेस्टिंग' प्रकल्प राबवत पावसाचे पाणी अडवून पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाले पाहिजे. त्यामुळे उन्हाळ्यात नागरिकांना पाण्याची टंचाई भासणार नाही. पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी 'जल' हा फॅक्टर अतिशय महत्त्वाचा असल्याने 'पाणी अडवा, पाणी जिरवा' हे अभिधान राबवून पृथ्वीवरील जल साठ्याचा वापर सुयोग्य पद्धतीने केल्यास मानवाला पाण्याची कमतरता कधीच भासणार नाही.

अभयारण्ये व तेथील वृक्षवल्ली आणि नद्या, नाले, पर्वत, सागर ही वसुंधरेची कवच कुंडले आहेत. त्यांचे जतन व संरक्षण केल्यास पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन हमखास होईल. इतकेच नव्हे तर त्यातून पृथ्वी म्हणजेच वसुंधरेच्या सौंदर्यात अधिकाधिक भर पडून ती मानवाला व अन्य जीवसृष्टीला आपल्या कुशीत सामावून मायेची ऊब देते. कोरोना महामारीत देशभरात रुग्णांचे जीव वाचविण्यासाठी प्राणवायुची कमतरता भासत होती. त्यामुळे लाखो लोकांना आपले प्राण गमवावे लागले. त्याचे कारण होते पर्यावरणाचा होत चाललेला ऱ्हास. नैसर्गिकरित्या प्राणवायुनिर्मिती होऊन आपणास व आपल्या भावी पिढ्यांना सुरक्षित व आरोग्यदायी जीवन लाभेल, हे सूर्यकिरणांएवढे सत्य आहे.''**निसर्ग माझा मित्र, निसर्ग माझा गुरू, निसर्ग माझी माय, मी त्याचे लेकरू**'' आपण जर निसर्गाला मित्र मानले, गुरू मानले तर आपण निसर्गाचे संरक्षण करू शकतो. आपण निसर्गातला वाचवू शकतो.

●●

## आयुष्य कसं जगायचं...

आयुष्य जगणं ही एक कला आहे,
कसं जगायचं हे ज्याचं त्यानं ठरवायचं असतं.
दु:खं सगळ्यांनाच असतात,
मग दु:खात दु:खाला सामोरं जायचं की,
दु:खात पिचत जगायचं,
हे ज्याचं त्यानं ठरवायचं असतं.
उद्याच्या चिंता ह्या सगळ्यांनाच असतात,
पण उद्याची शाश्वती मात्र कोणालाच नसते,
मग उद्यासाठी मरायचं की,
आजच्या दिवसामध्ये संपूर्ण आयुष्य जगायचं,
हे ज्याचं त्यानं ठरवायचं असतं.
समाजात जर आपलं अस्तित्त्व टिकवायचं असेल तर
स्पर्धा ही अटळ आहे
पण ही स्पर्धा दुसऱ्याशी आहे
की स्वत:ची स्वत:शीच
हे ज्याचं त्यानं ठरवायचं असतं.
समाज हा दुसऱ्यांची निंदा करण्यासाठीच असतो,
मग कोणासाठी जगायचं ?
समाजासाठी जगायचं की, स्वत:साठी जगायचं,
हे ज्याचं त्यानं ठरवायचं असतं.
आयुष्यात सुखाचे चार क्षण येतात,
टिचभर सुखात सुख मानायचं ?
की ते सुख वाटून वाढवायचं,
हे ज्याचं त्यानं ठरवायचं असतं.
कोणाच्या तरी आदर्शावरती जगायचं,
की स्वत:चा आदर्श सोडून जायचं,
हे ज्याचं त्यानं ठरवायचं असतं.
प्रत्येक सामान्य माणसामध्ये ।।२।।
काहीतरी असामान्य असतंच,
की सामान्य म्हणून जगायचं,
की असामान्य म्हणून जगायचं,
हे ज्याचं त्यानं ठरवायचं असतं.

**ढेरंगे भावना**
तृतीय वर्ष, वाणिज्य






## बाप मरायला नव्हता पायजे !

**सोमवंशी चंदना**
प्रथम वर्ष, कला

जेव्हा कमवायला लागलो तेव्हा
समजले वडिलांच्या पैशांवर चैन करता यायची
स्वत:च्या पैशांमध्ये तर गरजही
नीट पूर्ण होत नाही.

आयुष्यात लयं चुका केल्या त्यात सगळ्यात मोठी चुक म्हणजे बापाची माफी मागायची राहून गेली. बाप लयं भोळा आहे, असं समजून मी बापाला लयं फसवलं त्यावेळी ह्यांचं काहीच वाईट वाटलं नाही. पण आता मी बाप झालोय. बापाचं काळीज काय असंतय याची जाणीव व्हायला लागली. बाप मेला नसता तर बरं झालं असतं, असं राहून राहून वाटतं अन् स्वत:ची लाज वाटते. चांगलं आठवतंय, हो चांगलं आठवतंय म्हणून स्वत:ची लाजही वाटतेय. तेव्हा मी कॉलेजला होतो. अभ्यास करायचो. पण अभ्यासापेक्षा उनाडक्या जास्त करायचो उनाडक्या करायला पैसा तर लागायचा अन् पैसा कमवायची तर काही अक्कल नव्हती. म्हणून मग वडिलांबरोबर खोटं बोलायचो अन् त्यांच्याकडून पैसे उकळायचो. बाप आमचा अडाणी. म्हणजे तसा शिकलेला. एसटीत कंडक्टर. पण नाकाच्या सरळ रेषेत चालण्याची सवय असल्यानं बाकी भानगडीत पडत नव्हता. पोरगा मोठ्या कॉलेजला शिकतोय याच्यातच त्यांना मोठं समाधान वाटायचं. मग उसणं-पासणं कर, उपाशी राहून डबल ड्युटी कर, असलं काय काय करून ते मला पैसे द्यायचे अन् मग मी पोरांसोबत पिक्चरला जायचो, फिरायला जायचो, पोरी फिरवायचो. एकदा तर एक पोरगी म्हणाली, ''तुझे वडील काय काम करतात?'' तर ते कंडक्टर आहेत, हे मला सांगायला लाज वाटली. म्हणून मी तिला ''ते एसटी डेपोचे मॅनेजर आहेत'', असं सांगितलं होतं. तसं सांगितल्यावर ती मला पटली होती. अन् तिला ते कंडक्टर आहेत कळल्यावर ती सोडूनही गेली होती. ती तेव्हा गेली तेव्हा लय वाईट वाटलं होतं, पण आता ती गेल्याचं बरं वाटलं अन् आपला बाप काय चीज होता हे आठवलं की आपण याला किती फसवलं हे आठवून वाईट वाटतं. बाप जीवापाड प्रेम करायचा पण त्या वयात मला त्यांच प्रेम कळतचं नव्हतं. माझा जन्म झाल्यानंतर वर्षभरात

आई आजारपणानं अपंग झाली. त्यावेळी आईचं वय होतं एकवीस आणि वडिलांच वय होतं फक्त चोवीस. तेव्हापासून वयाच्या साठीपर्यंत त्या माणसानं आपल्या अपंग बायकोला सांभाळलं, मनापासून जपलं कारण फक्त एकच होत मी. दुसरं लग्न करेल पण काय गॅरंटी की दुसरी बायको माझ्या मुलांना खऱ्या आईचे प्रेम देईल?

बाप प्रत्येक वेळी माझा विचार करायचा त्यांनी मला पुण्यात कॉलेजला शिकायला पाठवलं, हॉस्टेलला ॲडमिशन घेऊन दिलं. कॉलेजची, क्लासची फी भरली. त्यांचा पगार जेमतेम होता. त्यामुळे माझ्यासाठी ते डबल ड्युट्या करून पैसा कमवू लागले. आज आणलेला जेवणाचा डबा दुसऱ्या दिवशी रात्री खाऊ लागले. कधी कधी तर फक्त वडापाववर दिवस ढकलू लागले. फाटके कपडे नेसूनच कामावर येऊ लागले. अन् मी फक्त त्यांच्या कष्टाचा पैसा उधळत राहिलो. वडिलांना डबल ड्युटी करण्यासाठी १२० किमी एसटी न्यावी लागायची. त्यावेळचे रस्ते असे होते की एसटीतल्या माणसाची हाडं खिळखिळी व्हायची, हाडं खिळखिळी करत, आठ-दहा तासांचा प्रवास करत आणि दोन वडापावांवर दिवस ढकलल्यावर वडिलांना सातशे रुपये मिळायचे अन् मी कॉलेजमध्ये शायनिंग मारण्यासाठी हजार रुपयांची जीन्स घालायचो. आपण बापाला फसवतोय याची कधीमधी जाणीव व्हायची, पण कॉलेजच्या वयात बापाला फसवणं स्वाभाविक असतं, असं वाटून मीच माझी समजूत घालायचो. ती समजूत नसून फसवणूक होती ते लय उशिरा कळलं. हळूहळू बाप थकू लागला आणि घराचे सगळे दोर माझ्या हातात येऊ लागले. आधी भारी वाटलं आपण घराचे प्रमुख आहोत असं वाटू लागलं आता आपण म्हणणार तोच निर्णय अशा अविर्भावात वावरू लागलो. बाप रिटायर झाला. निवांत घरात पेपर वाचू लागला. घराची, ऑफिसची, आईबापाची जबाबदारी माझ्यावर पडू लागली. हळूहळू चिडचिड होऊ लागली. चार पैसे हाती आले आणि डोक्यावर अक्षता पडल्या. आईबापानं मोठ्या आनंदानं नव्या सुनेचं स्वागत केलं. काही वर्षांनी मी बाप झालो आणि माझा प्रवास सुरू झाला. रात्री अपरात्री लेकरू रडायचं अन् मी झोपेतून उठून गुमान त्याचे डायपर साफ करायचो. मध्यरात्री सारं शहर झोपलेलं असताना गॅलरीत घेऊन त्याला बसू लागलो. रात्री लेकरानं जागवलं म्हणून दुसऱ्या दिवशी ऑफिसात डुलक्या घेऊ लागलो आणि बॉसच्या शिव्या खाऊ लागलो. रोज रात्री मित्रांसोबत गप्पा मारणारा मी आता लेकराच्या गोळ्या-औषधं, खेळणी, कपडे खरेदी करू लागलो. घरी आल्यावर टिव्ही पाहत लोळणारा मी आता कितीही थकून आलो तरी लेकरासोबत खेळू लागलो. खूप चिडचिड होत होती पण मी शांत राहत होतो. कारण आता मी बाप होतो. एकीकडे माझा पोरगा मोठा होऊ लागला अन् दुसरीकडे माझा बाप म्हातारा होऊ लागला.

आता मी बापाला नवे कपडे आणू लागलो. लेकराला नवे कपडे आणू लागलो अन् स्वत: जुन्या कपड्यात दिवाळी साजरी करू लागलो. नवे कपडे पाहून बापाच्या डोळ्यात पाणी यायचं. अन् त्या पाण्यात मला कॉलेजची जीन्स दिसायची. बापाची केलेली फसवणूक दिसायची बापाने केलेले काबडकष्ट दिसायचे. बापाचे पाय धरून रडू वाटायचं. ''तुम्हाला मी लय फसवलं हो बाबा तुमच्या भोळेपणाचा मी लय फायदा घेतला'', असं म्हणत ढसाढसा रडू वाटायचं पण कितीही रडू वाटलं तरी मी कधीच रडलो नाही कारण मी आता बाप झालो होतो. दिवस सरले, वडील आजारी पडले. बिछान्याला खिळून राहिले. डॉक्टर म्हणाले थोडेच दिवस शिल्लक आहेत. जमेल तेवढी सेवा करा. तेव्हा वडील म्हणायचे, ''नितीन मला दवाखान्यात ने ! मला इंजेक्शन द्यायल सांग! मला लय त्रास होतोय !'' रडक्या स्वरात असं म्हणत ते ढसाढसा रडायाचे तेव्हा त्यांच्या शेजारी बसलेली माझी अपंग आई त्यांचे डोळे पुसायची. थरथरत्या हाताने त्यांचे पाय दाबायची. तेव्हा मी बेडरूममध्ये बसून ऑफिसचं ऑनलाईन काम करायचो. वडिलांच्या दवाखान्यासाठी डबल ड्युटी करायचो. वडील म्हणायचे, ''मला ज्यूस पाज'', तेव्हा मी त्यांना चमच्याने दुध पाजायचो. जसा मी माझ्या लेकराला ज्यूस पाजला

तसा मी बापाला ज्यूस पाजत होतो. ''माझा नातू झोपला का?'' असं त्यांनी विचारलं, त्यावर मी होकार दिला आणि म्हणालो, ''तुम्हीही आता शांत झोपा. सारखं सारखं कन्हू नका. झोपमोड होते.'' नारजीतच त्यांनी होकार दिला आणि झोपले. क्षणभर माझ्या हाताला हात लावला आणि स्मित करत म्हणाले, ''तू ज्यूस पाजला. बरं वाटलं आता बघ कसा शांत झोपतो.'' त्यांच्या त्या वाक्यावर मीही स्मित करत होकार दिला आणि लाईट बंद केली.

पहाटे उठलो आणि वडिलांची तब्येत कशी आहे हे पाहण्यासाठी लाईट चालू केली अन् काळजात स्फोटच झाला. बाप आम्हाला कायमचा सोडून गेला होता. ''आता बघ कशा शांत झोपतो'' असं म्हणत स्मित करत ते झोपले ते परत न उठण्यासाठीच! भल्या पहाटे आई रडू लागली. मीही रडू लागलो. पण क्षणात स्वत:ला सावरलं. बायकोला अन् आईला गाडीत बसवलं, समोरच्या सीटवर वडिलांना बसवलं आणि गावाकडं गाडी नेली. आई व बायको रडत होती. वडील शांत होते अन् मी ही शांत होते. रडण शक्यच नव्हतं, आता मी बाप होतो. बाप शरीराने मरतो पण आठवणीतून कधीच मरत नाही. प्रत्येकाच्या घरात आपल्या मेलेल्या वडिलांचा फोटो असतो, माझ्याही आहे. पण मी तो फोटो आता काढून कपाटात ठेवून दिलाय. त्यांचा तो हसरा चेहरा पाहिला की मला लाज वाटू लागते. मला घरातून पळूना जावं वाटतं. मी त्यांना किती फसवलं किती खोटं बोललो सारं काही आठवतं आणि खजिल व्हायला होतं त्या वेळी माझ्याकडून झाल्या चुका मी मान्य करतो. पण, बाप नसताना मान्य करण्याला आय अर्थ म्हणून वाटतं बाप अजून जगायला पाहिजे होता, कदाचित दहा हत्तींच बळ अंगी घेऊन मी पायावर लोटांगण घालून सगळ्या चुकांची कबुली तर दिली असती आणि मला विश्वास आहे. त्यांनी मला माफही केलं असतं कारण लेकरानं माफी मागितल्यावर माफ करायलाही समोरचा बापच असावा लागतो.

●●

## भारताची महत्त्वाकांक्षी मोहिम : चांद्रयान

**मेमाणे आशा**
प्रथम वर्ष, कला

भारताची महत्त्वाकांक्षी मोहिम असलेलं चांद्रयान यशस्वीरित्या लॉन्च करण्यात आले आहे. श्रीहरीकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रावरून हे २.३५ मिनिटांनी लॉन्च झालं. अवघ्या देशाचं याकडं लागलं होत. एलएमव्ही-३ या रॉकेटचा वापर करून हे यान लॉन्च करण्यात आलं २३ किंवा २४ किंवा ऑगस्ट रोजी चांद्रयान चंद्रावर लँड होईल. ए.एन. आयच्या माहितीनुसार चांद्रयान ३ विक्रम लँडर, प्रज्ञान, रीव्हर आणो प्रोपल्शन मॉड्युलचा समावेश आहे या यानाचं वजन २,९,४५,०५ किलो आहे. यातील वजन ३,९०० इतकं आहे. तर १,६९६,३९ किलो केवळ इंधन असणारा आहे. या यानानं अवकाशात झेप घेतल्यानंतर त्याचे काही भाग वेगळे झाले आणि मुख्य भागानं चंद्राकडं आगेकूच केली आहे. यावेळी सतीश धवन केंद्रात केंद्र सरकारचे अनेक मंत्री उपस्थित होते. अवघ्या देशानं हा सोहळा टीव्हीवर लाईव्ह पाहिला या मोहिमेच्या माध्यमातून भारत चंद्राच्या दक्षिण भागात उतरणार आहे. ही मोहिम यशस्वी झाल्यास चंद्रावर उतरणारा भारत चौथा देश ठरेल. दक्षिण भागात उतरणारा जगातील पहिलाच देश ठरण्याचा मान भारताला मिळणार आहे. आज लाँच झाल्यानंतर चंद्रावर पोहोचवण्यासाठी चांद्रयान-३ ला सुमारे ४० दिवसाच्या कालावधी लागेल. सर्व सुरळीत पार पडल्या सन २३ किंवा २४ ऑगस्ट या दिवशी चांद्रयान चंद्रावर उतरेल काही अडचणी आल्यास तारखा बदलूही शकतात, असं इस्त्रोने नमूद केले आहे. चांद्रयान - २ मोहिमेदरम्यान विक्रम लँडर प्रत्यक्ष चंद्राच्या पृष्ठभागावर उतरतानाच क्रॅश झालं होतं. त्यामुळे आता चांद्रयान -३ मोहिमेत हे लँडर सुरक्षितपणे चंद्राच्या पृष्ठभागावर उतरवणे हे सर्वात मुख्य लक्ष्य असणार आहे. चांद्रयान - ३ मधील लँडरचा विक्रम आणि रोव्हरला प्रज्ञान असं नाव देण्यात आलं आहे. चंद्रावर जाण्यासाठी सज्ज असलेल्या भारताच्या महत्त्वकांक्षी प्रकल्य चंद्रयान - ३ प्रक्षेपणासाठी सज्ज असताना देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे फ्रान्सच्या दौऱ्यावर आहेत.

●●



# गाडा

**चिखले प्रतीक्षा**
प्रथम वर्ष, कला

अक्षय टेमकर हा युवा लेखक आहे. ज्याने स्वत: नुकतीच अजिंठा पब्लिकेशन ही संस्था सुरू केलीय. या संस्थेमार्फत प्रकाशित झालेलं गाडा हे पहिलं पुस्तक आणि अक्षयचा पहिला कथासंग्रह. चौदा छोटेखानी कथा यात आहेत. नावावरूनच हा ग्रामीण पार्श्वभूमी असणारा कथासंग्रह आहे हे जाणवते आणि कथाविषयी ही तसेच आहेत. वाचताना ग्राम जीवनाच्या भवतालात आढळणाऱ्या अनेक व्यक्तींची आठवण ताजी होते. ही सर्व माणसं आपल्या परिघातच असतात. तरीही त्यांनी नेमकी नोंद आपण घेतलेली नसते. मात्र संवेदनशील मनाने आणि काहीशा तटस्थपणाने जेव्हा आपण याकडे पाहू लागतो तेव्हा त्यातले बारकावे दिसू लागतात. अक्षयपाशी ही संवेदनशीलता पुरेपूर आहे या कथांवरून सिद्ध होते. त्याच्या प्रत्यक्ष संपर्कात आलेली ही सर्व माणसं जिती जागती आहेत, हाडामांसाची आहेत. त्यांची नावे बदलली आहेत मात्र मूळ आशय कथाविषय तोच ठेवून लेखन केलेलं आहे. या माणसांची सुख-दु:खे, यांचे स्वभाव, हेवेदावे, परात्मभाव या सगळ्यांचं एकसंध रेखाटन यात आहे, जोडीला कधी उत्कंठा वाढवणारा घटनाक्रम आहे तर कधी हेलावून टाकणारी संकटे आहेत तर कधी दुनियादारी शिकवणारे अनुभव आहेत तर कधी जीवनाचा नि खोटारडेपणाचा तिटकारा यावे असे प्रसंग आहेत.

यातील कथावकाश ग्रामीण भवतालचे आहेत. पात्र जी मते मांडत असतात ते लेखकाचे मत असते. लेखक दोन पत्रांत भांडत विसंवाद घडवून आणतो आणि त्यातून त्याचं म्हणणं मांडतो. कथेतून तो काही ठोकताळे व्यक्त करतो. बदलत्या गावजीवनावर भाष्य करतो. गावाकडल्या जुन्या नव्या पिढीचे काळेपांढरे चित्रे खोलतो. गावजीवनाचा अविभाज्य भाग असणाऱ्या शेती-मातीवर, मुक्या जीवावर, निसर्गावर, पिकपाण्यावर पात्रांच्या आडून भाष्य करतो. तेव्हा त्यातून त्याला संदेश द्यायचा असतो. 'गाडा' ही शीर्षक कथा तुकाराम या वृद्ध शेतकऱ्याची आहे, त्याच्या बैलजोडीने शर्यत जिंकावी हे त्याचे स्वप्न आहे आणि त्याचा वाहवत चाललेला मुलगा हे त्याचं दुखणं आहे. यातलं नाट्य देखणं आहे. ही कथा कसदार झालीय. ग्रामीण

भागातील राजकारणाने बारकावे आमदारकीच्या गोष्टीत आहेत. घुंगरूमध्ये आयुष्यभर दळभद्री जीवन असणाऱ्या खास्ता हाल असणाऱ्या रामशा थोरातला एके दिवशी घबाड हाती लागलं. त्याच्या मनात एक द्वंद साकारतं, अखेरीस तो त्यावर हात मारतो, अफाट श्रीमंत होतो मात्र अखेरीस विपरीत घडतं.

अंधारातून उजेडाकडे असा त्याचा प्रवास होतो. खेड्यापाड्यात प्रेमापायी वेड लागलेले जीव कमी दिसतात, अशा प्रेमवेड्या मुलीचं जीवन चितारताना अक्षयने त्याला गवसलेलं/सापडलेलं स्त्रीमन रेखाटलं आहे. सर्वच कथांचा काळ सद्य दशकातला आहे. अत्यंत जुन्या आठवणींचे रुढ फारसे नाही तेरीही या लेखनातून डोकावणारे ग्राम्यजगत जुने आहे हे विशेष! या सर्व कथा विशिष्ट हेतूसमोर ठेवून लिहिल्या आहेत हे जाणवते. काहितरी लिहावसं वाटणं ही बाब साहजिक आणि सामान्य आहे. मात्र आपल्याला काय लिहायचे आहे? आणि का लिहायचे? याची उत्तरे लेखकास ठाऊक असली पाहिजेत. केवळ हौसेखातर कवितेच्या बुंदी पाडणारे, पानभर गद्य लिहिणारे खूप आढळतील, हरेकास लिहित व्हावं वाटण हे गैर नाहीच. उलट ज्या ज्या व्यक्तीस आपली अभिव्यक्ती शब्दबद्ध करावीशी वाटते. त्यांनी ती आवश्य करावी. मात्र लिहिताना काही भान असणे जरुरीचे आहे. आपण का लिहितो? हे ज्याला ज्ञात असते त्या व्यक्तींनी आपलं प्रकटन अचूक व्हावं म्हणून प्रयत्नशील असलंच पाहिजे. याही पुढे जाऊन आपलं लेखन अनेकांनी वाचलं पाहिजे असं ज्यांना वाटतं त्यांनी तर या बाबतीत आग्रही असावं. आपली भूमिका व्यापक स्तरावर चर्चिली जावी, आपल्या लेखनावर मतमतांतरे मांडली जावीत असे ज्यास वाटते त्यांनी तर अधिक सजग असलं पाहिजे. अक्षय टेमकरला या गोष्टी चांगल्या उमजलेल्या आहेत.

●●

**हालात का प्याला**

हालात का प्याला समंदर भर लाया,
फिर भी अंतः खाली पाया गया,
जीवन की नय्या ढूंढती रही,
उस मौके को जो हो सही,
सुने ए किस्से जिद्द के,
जो लगे पागलपन के,
जब देखू उन हस्थियो को,
ना की उन अस्थियो को,
कोशिशों के ए मतावरे,
टहल रहे है इन समंदर किनारे,
जैसे उन्होंने खोया तेज उनका,
जो चमक रहे थे तिनका बनकर सूरज का,
आग की एक चिंगारी,
खाक कर दे जंगल की सारी होशियारी,
लगे यह बात सही,
जैसे हम बन फिर रहे अहंकारी,
हालात का प्याला समंदर भर लाया,
फिर भी अंतः खाली पाया गया।

**हुळे अमित**
तृतीय वर्ष, कला

●●







# पसायदान विश्वकल्याणाचे मागणे

**भांबुरे वैष्णवी**
तृतीय वर्ष, (बी. व्होक. फुड)

पसायदान ज्ञानेश्वर माऊलींनी आपल्याला खूप काही दिलंय. ज्ञानेश्वरीसारखा महान ग्रंथ दिला. हरिपाठ देऊन, एक आदर्श जगासमोर ठेवला आणि या जगाला अज्ञानाच्या अंध:कारातून बाहेर काढले. माऊलींनी जन्माला आल्यानंतर इंद्रायणीच्या काठावर बसून विश्वात्मक वाग्‌यज्ञ म्हटला, इंद्रायणीच्या भक्तीचा महापूर आणला. वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षी या समाजाला गीतेसारख्या महान साक्षात भगवंताने सांगितलेल्या ग्रंथाचे चिंतन, विवेचन सर्वसामान्य लोकांना सोप्या शब्दात करून सांगण्याचे काम माऊलींनी ज्ञानेश्वरीच्या माध्यमातून केले. आता विषय येतो तो पसायदानात मागितलेल्या दानाचा !

ज्ञानेश्वरीसारख्या महान ग्रंथाची सांगता करताना माऊली या जगासाठी, संपूर्ण समाजासाठी, विश्वासाठी मागणं मागताना पसायदान लिहितात. संपूर्ण ज्ञानेश्वरीचे आणि संपूर्ण गीतेचे सार जर कुठे असेल तर ते पसायदानात. कोणत्याही कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करतात. पण पसायदानाचा अर्थ काय? कशासाठी म्हणावं? काहीच माहित नसतं. पण मग प्रश्न असा पडतो की जर पसायदानासारखं महान विश्वकल्याणाकरिता जे मागणं माऊलींनी विश्वात्मक देवाकडे मागितले ते खरंच सत्यात उतरले का? तसचं खरंच होतय का? ते पूर्णत्त्वाला गेलंय का? जरी त्याचा अर्थ समजत नसला, ते पूर्णत्त्वाला गेलं नसंल तरी आपण परत-परत म्हणत राहतोय. मग मला वाटतं फक्त पाठांतर म्हणून किंवा कोणीतरी सांगितलं म्हणून आपण पसायदान न म्हणता आपण त्याचा भावार्थ समजून घेतला पाहिजे. माऊलींनी पसायदान आपल्याला दिलं ते आपल्या जीवनामध्ये सौंदर्य निर्माण व्हावं म्हणून कारण पसायदान ही आपल्या जीवनाची सौंदर्यता आहे आणि काय सुरेख आहे पहा आपण सुरवात करतो पसायदानाची ''आता विश्वात्मके देवें'' पण त्याआधी माऊलींनी एक ओवी लिहिली आहे. ती फार महत्त्वाची आहे.

**'किंबहुना तुमचे केले । धर्मकिर्तन हे सिद्धी नेले ।।'**

माऊली म्हणतात की, ही जी ज्ञानेश्वरी आहे ना ती एक धर्मकिर्तन आहे. जे मी नाही तर तुम्ही केलंय.

तुम्ही म्हणजे कोणी तर गुरूंनी. माऊलींचे गुरू कोण? त्यांचे मोठे भाऊ म्हणजे निवृत्ती महाराज. त्यांच्या चरणावर ज्ञानेश्वरी समर्पित करताना म्हणतात, हे सगळ जे केलं ते तुम्ही केलंत, तुम्ही हे माझ्याकडून करून घेतलत.' यावरून लक्षात येतं की, माऊलींचे मन किती मोठे आहे. स्वत: लिहिलेल्या ज्ञानेश्वरीचं श्रेय मात्र गुरूंना दिले. त्याच गुरूंना माऊली पसायदानात विश्वात्मक देव म्हणून संबोधतात. जसं आपण लहानपणापासून ऐकत आलो. 'विद्या विनयेन शोभते' त्याचा प्रत्यय या ठिकाणी येतो. माऊली विश्वात्मक देवापुढे विनम्र होऊन या जगासाठी मागणं मागतात. ''जर ज्ञानानंतर अहंकाराने जन्म घेतला तर ते ज्ञान विष आहे, पण त्याच ज्ञानानंतर जर नम्रतेने जन्म घेतला तर ते ज्ञान अमृत आहे.'' म्हणून नेहमी नम्रच असावं हे माऊलींच्या आचरणातून दिसून येते. मग ज्ञानेश्वर महाराज निवृत्तीनाथांकडे मागणे मागतात की हे गुरू निवृत्तीनाथा तुझ्या कृपेने सगळं तर मिळालयं, पण आता मला हे या विश्वाला सगळं वाटून टाकायचंय, विश्वकल्याणाकरिता देऊन टाकायचंय त्यासाठी मला हे द्या असा हट्ट माऊली निवृत्ती दादांकडे करतात.

**आता विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावे ।**
**तोषोनि मज द्यावे । पसायदान हें ।।१।।**

की आता हे विश्वात्मक देवा... हे निवृत्तीनाथा हा जो यज्ञ वाग्यज्ञ मी घातलाय ना त्याच्यावर प्रसन्न होऊन तोषोनि म्हणजे स्वत:हून, स्वच्छेने, खूश होऊन हे दान द्या. असं वैतागून, चिडून की बाबा हे घे असं दान नको तर प्रसन्नतेने द्या. असं माऊली म्हणतात. इथे पसायदानाच्या प्रत्येक ओवीचे विवेचन करणे कठीण आहे म्हणून थोडक्यात सांगते. पसायदानाला आपण विश्वप्रार्थना का म्हणावे हे सांगतांना मला वाटतं की माऊलींनी या पसायदानात दृष्टाच्या, दुर्जनांचा नाश करा असे नाही सांगितले. भगवान श्रीकृष्ण गीतेमध्ये सांगतात की दृष्टांना संपून ही पृथ्वी दृष्टमुक्त करावी. पण माऊली सांगतात की, दृष्टांना संपवायची, मारायची गरज नाहीये. तर गरज फक्त त्यांच्यातला दृष्टपणा घालवायची आहे. जसं की, अंधार नाही तर प्रकाश कमी पडतो. तेव्हा अंधाराचा उच्चार आपण ती परिस्थिती दर्शविण्यासाठी करतो किंवा थंडी पडली असे कधी म्हणतो तर जेव्हा उष्णता कमी होते पण वैज्ञानिक भाषेत सांगायचं झालं तर अंधार आणि थंडी या गोष्टींचा कुठेच उल्लेख केला जात नाही. तसं दृष्ट लोक नाही त्यांची वृत्ती आहे. ती संपवण्याची विनंती करतात. यामध्ये लक्षात येतं ज्ञानेश्वर महाराजांना या जगाची माऊली का म्हणतात. त्यानंतर पसायदानामध्ये माऊली मागतात की या जगात जे दृष्ट वृत्तीचे लोक आहेत. त्यांची दृष्ट वृत्ती सांडो आणि त्यांच्या हातून सत्कर्म घडो. गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण सांगतात की कर्म करत चला पण माऊली म्हणतात की, सत्कर्म करत चला आणि त्याचबरोबर जगामध्ये एकमेकांमध्ये मैत्रीची भावना निर्माण व्हावी असे मागणे मागतात. जसं की मुलगा मोठा झाला की, वडिलांनी मुलांचे मित्र व्हावे, आईनी मुलींची मैत्रिण व्हावे. तसं ता जगात सगळे जण जर एकमेकांचे मित्र झाले तर ते इतरांविषयी मनात वाईट भावना निर्माण होते ती होणार नाही. त्याचप्रमाणे जर लोकांनी सांगितल्याप्रमाणे सत्कर्म केले. दृष्टभावना सोडून दिली तर त्यांना हवं ते मिळो असं माऊली विश्वात्मक देवाकडे मागणं मागतात.

पसायदानामध्ये माऊली या विश्वकल्याणासाठी कळकळीने विश्वात्मक देवाकडे मागणं मागतात. हे देवा सर्वांचं भलं कर, त्याच्यामध्ये प्रेमळ भावना निर्माण कर, त्यांना प्रेमाने वागायला सांगतात, एकमेकांमध्ये मैत्रीची भावना निर्माण कर. त्यांच्याकडून सत्कर्म घडो, सर्व जगाला सुखी ठेव असं विश्वकल्याणाकरिता मागणं मागतात. म्हणून पसायदानाला विश्वप्रार्थना असे संबोधले जाऊ शकते. पण हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा लोक पसायदानाप्रमाणे वागायचा प्रयत्न करतील पसायदानाचा अर्थ समजून घेतील म्हणून पसायदान फक्त वाचायला किंवा म्हणायला शिकून काही उपयोग नाही तर पसायदान जगायला शिकलं पाहिजे. ''चला तर मग पसायदान जगू या, विश्वप्रार्थना घडवू या.''

●●




# जीएसटी : वस्तू व सेवा कर

**पोखरकर सिद्धी**
प्रथम वर्ष, वाणिज्य

तुम्ही सर्वांनी जीएसटी हा शब्द कुठे ना कुठे नक्की ऐकला असेलच? खूप लोकांना जीएसटी म्हणजे काय हे माहित असेलच? तरीही मी सांगते जीएसटी म्हणजे काय? जीएसटी म्हणजेच वस्तू व सेवा कर. जीएसटी म्हणजे वस्तू व सेवांवर लागू केला जाणारा कर. वस्तू व सेवा कर हा एक अप्रत्यक्ष विक्री कर आहे जो विशिष्ट वस्तू व सेवांच्या किंमतीवर लागू केला जातो. तुम्हाला माहित आहे का? जीएसटी भारतात कधी व कसा स्थापन करण्यात आला होता? तर आपल्या भारतीय संविधानाप्रमाणे जुन्या अप्रत्यक्ष कर संरचनेप्रमाणे केंद्रिय व राज्य सरकारद्वारे वेगवेगळ्या सेवा व वस्तुंवर वेगवेगळे कर आकारले जात होते आणि प्रत्येक कराचे दर वेगवेगळे होते.

केंद्रिय व राज्य सरकारचे प्रमुख स्त्रोत कस्टम ड्युटी सेवा कर (सर्व्हिस टॅक्स) आणि विक्री कर (सेल्स टॅक्स) होते. ''वन नेशन वन टॅक्स'' हा हेतू देण्यासाठी कलम २४६ 'अ' नुसार लागू करण्याची तरतूद करण्यासाठी १६ सप्टेंबर २०१६ पासून भारताच्या संविधानात सुधारणा करण्यात आली होती. १ जुलै २०१७ रोजी जीएसटी भारतात लागू करण्यात आला होता.

१. फक्त वस्तू व सेवांवर लागू होतो.
२. राष्ट्राची आर्थिक वाढ सुधारते.
३. रिव्होल्युशनरी मॅचिंग इनव्हॉइस संकल्पना पुरवठादराने दाखल केलेल्या इनव्हॉइसचे तपशील तपासते.
४. पेट्रोलियम उत्पादने, अल्कोहोलीक पेयांवर जीएसटी लागू होत नाही.
५. कॅस्केडिंग प्रभाव काढून टाकते.
६. उत्पादन आणि वितरण शृंखलेच्या प्रत्येक टप्प्यावर बहुस्तरीय श्रेणी गोळा केली जाते.

**जीएसटी प्रणालीअंतर्गत तीन कर**

**१. सीजीएसटी :** एका राज्यात खरेदी केल्यानंतर त्याच राज्यात विकल्या जाणाऱ्या वस्तू किंवा सेवांवर सीजीएसटी कर आकारला जातो.

**२. एसजीएसटी :** जेव्हा कोणतीही वस्तू किंवा सेवा एकाच राज्यात पुरवली जाते, तेव्हा त्यावर एसजीएसटी आकारला जातो.

**३. आयजीएसटी :** जेव्हा एखादी वस्तू किंवा सेवा एका राज्यातून दुसऱ्या राज्यात पुरवली जाते तेव्हा आयजीएसटी आकारला जातो. वरील लेख लिहिण्याचा उद्देश असा आहे की, किशोरवयीन मुलांना जीएसटी म्हणजे काय? जीएसटीचे काय वैशिष्ट्य आहे आणि जीएसटी ही संकल्पना भारतात कधी व कशी आली हे माहित असणे अत्यंत आवश्यक आहे.

**जीएसटीचे फायदे**

**१. कराच्या कॅस्केडिंग प्रभावाचे निर्मूलन :** यापूर्वी, प्रत्येक उत्पादन स्तरावरील कर दायित्वामध्ये मागील टप्प्यात गोळा केलेले कर समाविष्ट होते. यामुळे उत्पादनाची किंमत वाढेल आणि ग्राहकांना अनेक अप्रत्यक्ष करांचा भार सहन करावा लागेल. याचे उत्तम वर्णन 'टॅक्स ऑन टॅक्स' प्रभाव म्हणून केले जाते. जीएसटीचा एक फायदा म्हणजे एक सरलीकृत आणि एकात्मिक करप्रणाली. करांचा कॅस्केडिंग प्रभाव काढून टाकण्यासाठी ते इनपुट टॅक्स क्रेडिट सिस्टम वापरते.

**२. नोंदणीसाठी उच्च थ्रेशोल्ड :** यापूर्वी ५ लाख किंवा त्याहून अधिक उलाढाल असलेला कोणताही व्यवसाय करावा लागत होता. त्याचप्रमाणे, सेवा कराची मर्यादा १० लाख रुपये होती. जीएसटी अंतर्गत, थ्रेशोल्ड २० लाख रुपये ठेवण्यात आला आहे. जीएसटीमुळे अनेक छोटे व्यापारी आणि सेवा पुरवठादारांना मिळालेल्या अनेक फायद्यांपैकी हा एक आहे.

**३. सुलभ ऑनलाइन प्रक्रिया :** नोंदणीपासून ते GST भरण्यापर्यंतची प्रक्रिया ऑनलाइन करण्यात आली आहे आणि ती सोपी आहे. यामुळे व्हॅट, अबकारी शुल्क आणि सेवा कर अंतर्गत विविध नोंदणी आणि फाइलिंग करण्यासाठी खर्च आणि वेळ वाचतो. यामुळे अनुपालनांची संख्याही कमी होते.

**रचना योजना :** २० लाख ते ७५ लाख रुपयांची उलाढाल असलेल्या छोट्या व्यवसायांसाठी हे फायदेशीर आहे. ते त्यांना कर कमी करण्याचा पर्याय देते.

●●



## जिव्हाळा

सर्व काही देता यावे
श्रेय राहू नये हाती
असा लाभला जिव्हाळा
पाषाणाची फुले व्हावी
यावी लावता कपाळी
भक्ती-भावनेने माती
एक साध्या सत्यासाठी
देत जावे पंचप्राण
राहो बनुनी आकाश
माझा शेवटचा श्वास
मनामनात उरावा
फक्त प्रेमाचा सुवास
सारा अंधारच प्यावा
अशी लागावी तहान
सारे मन कळू नये
व्हावे एवढे लहान....

**गेंगजे पूजा**
प्रथम वर्ष, वाणिज्य

●●




# मोबाईलच्या विळख्यात सापडलेली तरुणाई

**भांड प्रतिक्षा**
प्रथम वर्ष, विज्ञान

कित्येक फेक अकाउंट असणारं फेसबूक, अफवा पसरवणारं व्हॉट्सॲप, घरी मायबापाचं न ऐकणाऱ्यांना जिथं दुसऱ्यांची टीव टीव ऐकावी लागते ते म्हणजे ट्विटर आणि ज्याच्याशिवाय आयुष्याचं टायर हे पंक्चर झाल्यासारखण वाटतं ते म्हणजे यु-ट्युब ही सर्व सोशल मिडियाची माध्यमे आहेत. पण आजच्या युवकांची अवस्था इतकी वाईट आहे की, रस्त्यावरून जात असताना कोणाचा अपघात झाला तर त्याला हॉस्पिटलमध्ये नेण्यासाठी मदत करत नाही पण मोबाईलमध्ये त्या घटनेचं रेकॉर्डिंग करण्यात आजचा युवक गुंतलेला आहे. पूर्वीचे लोक एकमेकांना शुभेच्छा देण्यासाठी स्वत:च्या हाताचा वापर करून छान असं ग्रिटींग कार्ड तयार करत होते. पण आताचे लोक मोबाईलच्या माध्यमातून एकमेकांना मेसेजरूपी शुभेच्छा पाठवितात. पूर्वीच्या काळी एक वर्तमानपत्र सगळ्या बसमध्ये फिरायचं त्यामुळे वाचनाची आवड होती पण आज जर पाहिलं तर बसमध्ये प्रत्येकजण मोबाईलमध्ये रील्स पाहण्यात गुंतलेला आहे. पहिल्यांदा किती आनंद वाटत होता की, माणसाचा माणसाशी संवाद होत होता, त्यामुळे माणुसकी होती, विचारांची देवाण-घेवाण होत होती. माणसांमध्ये नि:स्वार्थीपणा होता. पण आता त्या सगळ्या गोष्टी बंद झाल्या आहेत. आज माणसांच्याच गर्दीमध्ये माणूस शोधावा लागतोय.

आजच्या युवकांना पबजी आणि वेळखाऊ गेम माहीत आहे. पण वयाच्या २३ व्या वर्षी हसत-हसत फासावर जाणारे सळसळत्या रक्ताचा धगधगता अंगार असणारे शहीद भगतसिंग आजच्या युवकांना माहीत नाही. आजच्या युवकांना ऐश्वर्या रॉयच्या मुलीचं नाव माहीत आहे पण भारताचे राष्ट्रपती होऊन गेलेले डॉ. अब्दुल कलाम यांचं पूर्ण नाव आजच्या युवकाला माहीत नाही. स्वत:च्या आईच्या टाचांवर पडलेल्या भेगांपासून तो युवक अनभिज्ञ आहे. परंतु सोशल मिडियावर शेतकऱ्याला कर्जमाफी झालीच पाहिजे यासाठी एकामागून एक पोस्ट टाकणारा युवक जेव्हा स्वत:चा बाप शेतात राब-राब राबतो तेव्हा त्या बापाच्या कामाला हातभार लावण्यासाठी त्या युवकाचा हात काम करत नाही. कारण त्याचा हात मोबाईलवर टायपिंग करण्यासाठी अडकलेला असतो.

आज ह्या मोबाईलमुळं आमचं जीवन विस्कळीत झालं आहे. आमच्यामध्ये वाचनाची आवड राहिली नाही, आमच्यामध्ये माणुसकी राहिली नाही. एकमेकांन मदत करण्यासाठी आम्ही सहाय्य करत नाही. आमचं पूर्ण जीवनच बदलून गेलं आहे. आम्ही लहान असताना मैदानावर खेळायचो. आता त्याच मैदानाकडे पाहिलं तर सगळ्यांचं डोकं मोबाईलमध्ये दिसते. आज ह्या मोबाईलने आमचं जगणं असहाय्य करून टाकलं. आमच्यातील सुसंवाद मोबाईलमुळे हरवला आहे. आज आमचं आयुष्य आणि भविष्य फक्त मोबाईल झाला आहे. मोबाईलमुळे आमच्या आयुष्यात काय चाललंय, चांगलं चाललं आहे की वाईट चाललं आहे? हेच आजच्या युवकांना कळत नाही.

अगोदरची पिढी परंपरा, संस्कृती लोक काय म्हणतील ? या ओझ्याखाली जगत होती अन् आत्ताची तरुणाई बंधन तोडून काहीतरी नवं करू पाहत आहे. कशामुळे झाला हा बदल तर मोबाईलमुळे.

आमच्या हातात मोबाईल आला,
आम्ही वाचन करणं विसरलो,
आमच्या हातात मोबाईल आला,
आम्ही मैदानी खेळ विसरलो.
आमच्या हातात मोबाईल आला.
आम्ही एकमेकांशी संवाद साधायचं विसरलो,
आमच्या हातात मोबाईल आला,
आम्ही वर्तमानपत्र वाचायचं विसरलो.
आमच्या हातात मोबाईल आला,
आम्ही वेळेवर जेवण करणं विसरलो.
आमच्या हातात मोबाईल आला,
आम्ही वेळेवर झोपणं विसरलो.
आमच्या हातात मोबाईल आला,
आम्ही माणुसकी विसरलो.
आमच्या हातात मोबाईल आला, अन्
आम्ही आयुष्य जगायचं विसरलो.
म्हणूनच म्हणावेसे वाटते
संघर्षाच्या आधीच हार मानलीस तू
कर्तबगारी अधी गमावलीस तू
जीवन हा संघर्ष आहे,
तोच नको म्हणतोस तू
अरे जगण्याआधीच संपलास तू.

आज जर आम्ही मोबाईलमुळं चांगल्या गोष्टी विसरलो असु तर आम्ही फक्त वाईट गोष्टी स्वीकारायला लागलो आहोत.

●●

## जीवनावरील कविता

चाल काय करतोस
काहितरी करून दाखव....
वेळ जाईल निघून
प्रवाहामध्ये तरून दाखव.....
लाखो आले आणि गेले,
बोलून उपदेश सगळे,
स्वत: काही नाही केले,
फक्त उपदेश दिले.....
उपदेशाचे कडू तू पिऊन तर बघ,
सत्याची साथ देऊन तर बघ,
हिंमत आहे तुझ्यात,
आयुष्यात शिखर चढण्याची स्वत:वर
विश्वास ठेवून बघ....
हीच वेळ आहे
योग्य पाऊल पुढे टाकण्याची,
काहीतरी करून दाखवण्याची.....
घाबरू नकोस निर्णय घे
यश तुझ्याच हातात आहे.....

**इंदोरे आदिती**
प्रथम वर्ष, वाणिज्य

●●




## मराठी भाषेची वैशिष्ट्ये

**वळसे सानिका**
प्रथम वर्ष, कला

१. सुमारे ८ ते ८.५० कोटी लोक मराठी बोलतात.

२. मराठीही जगातील दहावी सर्वाधिक बोलली जाणारी भाषा आहे. काही वर्षांपूर्वी ती १९ व्या स्थानी होती.

३. भारतातील सर्वात जास्त बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये मराठीचा तिसरा क्रमांक लागतो.

४. मराठी ही भारताच्या २२ अधिकृत भाषांपैकी एक असून महाराष्ट्र दमण, दीव, दादरा आणि नगर हवेली यांची अधिकृत तर गोव्याची दुसरी अधिकृत भाषा आहे.

५. मराठी भाषेच्या अनेक उपबोली आहेत. त्यातील काही प्रमुख बोली : प्रमाण मराठी, अहिराणी, वऱ्हाडी, कोळी, मालवणी, चित्पावनी, दक्षिनी (तंजोर मराठी) इत्यादी

६. मूळ मराठी भाषा ही मोडी लिपीत लिहिली जात असे. आता मात्र ती बाळबोध (देवनागरी) लिपीत लिहिली जाते.

७. भारतातील सर्वात प्राचीन वाङ्मयांपैकी काही मराठी भाषेत आहे. इसवी सन ६०० च्या सुमारास हे वाङ्मयप्रकार लिहिले गेले असावेत.

८. मराठी भाषा ही इंडो-युरोपियन या भाषा कुलातील इंडो-आर्यन या उपकुटुंबाची सदस्य आहे.

९. अनेक इंडो-आर्यन भाषांमध्ये (जसे हिंदी) दोनच लिंगे मानली जातात. पुल्लिंग आणि स्त्रीलिंग मात्र मराठी व्याकरणात नपुंसकलिंगसुद्धा आहे.

१०. मराठी भाषेची जुनी आवृत्ती जिला महाराष्ट्री प्राकृत असे म्हणतात. त्यात लिहिलेला शिलालेख जुन्नरजवळ नाणेघाटात सापडला. याचा काळ अंदाजे इसवी सन पूर्व तीनशे वर्षे असावा.

११. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी मराठीत रूजलेले पारिभाषिक शब्द काढून त्या जागी मराठी शब्द सुचवून मराठी भाषा समृद्ध केली. उदाहरणार्थ तारीख (फार्सी)- दिनांक. मेयर (इंग्लिश) - महापौर

१२. दरवर्षी २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा दिवस साजरा केला जातो. मराठीतील थोर साहित्यिक वि. वा शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांचा हा जन्मदिवस आहे.



# माझा आवडता महिना श्रावण

**वळसे सानिका**
प्रथम वर्ष, कला

चैत्रापासून सुरू होणाऱ्या मराठी महिन्यांचे रंगरूप आगळेवेगळे असते. कुणाला चैत्राच्या पालवीची मोहिनी पडते, तर कुणाला वैशाख वणवा आवडतो. कुणाला मेघश्याम आषाढ हवाहवासा वाटतो. तर कुणी सोनेरी आश्विनसाठी झुरतात. मला स्वत:ला मात्र हवाहवासा वाटतो तो, 'हिरवा श्रावण'. श्रावणात सृष्टीत सर्वत्र हिरव्या रंगाची उधळण झालेली आढळते. हिरव्या रंगातही किती विविध छटा असतात! कुठे गर्दहिरवा, तर कुठे पोपटी! या सर्व रंगछटांतून चैतन्याचा, सर्जनतेचा आणि सौंदर्याचा साक्षात्कार घडत असतो. श्रावण हा मराठी महिन्यांतला पाचवा महिना उकाड्याने हैराण करणारे चैत्र-वैशाख गेल्यावर जेष्ठ-आषाढात पावसाचा धुवांधार वर्षाव सुरू होतो. वातावरण कुंद आणि ढगाळलेले असते. घराबाहेर पडणेदेखील पुष्कळदा अवघड होते. अशा वेळी माणसाला दिलास लाभतो तो श्रावणात! श्रावणातील पावसाचे वर्णन करताना बालकवी म्हणतात.

**श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहिकडे**
**क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरूनी ऊन पडे ।**

श्रावणातील ऊनपावसाचा पाठशिवणीचा खेळ पाहून मन हरखून जाते. अवचित कधीतरी सप्तरंगी इंद्रधनुष्याचे मंगल तोरण नभोमंडपाला आगळी शोभा आणते. या सुंदर श्रावणमासाचे वर्णन करताना कविश्रेष्ठ कुसुमाग्रज म्हणतात-

''**हसरा नाचरा जरासा लाजरा,**
**सुंदर साजरा श्रावण आला ।**''

श्रावणाचे हे चैतन्य मुला-माणसात, पशु-पक्ष्यात, पाना-फुलांत सर्वत्र ओसंडून जाताना आढळते. श्रावणात फुलणारा तेरडा रंगीबेरंगी गुच्छांचा नजराणा घेऊन आलेला असतो. शेतात डोलणाऱ्या तुऱ्यावर श्रावणाचे सोनेरी ऊन पडते आणि त्यांचा तजेला नव्या उत्साहाने डोलत वाहतो. श्रावणसरींच्या स्पर्शाने उल्हासित झालेली पिके भावी सुबत्तेची आशा पालवू लागतात. दरम्यान शिवारात राबणाऱ्या शेतकऱ्यांना जसा विसावा मिळतो. अशा या प्रसन्न श्रावण महिन्यात सर्वत्र उत्साह ओसंडत असतो.

श्रावणमास म्हणजे व्रत-वैकल्यांचा, सणावारांचा काळ. श्रावणातील सोमवारांचे केवढे माहात्म्य, मंगळवारी

मंगळागौरीची पूजा, शुक्रवारी जिवतीमातेचे व्रत, तर शनिवारी मारुतीची आराधना या श्रावणात माणूस आपल्या उपकारकर्त्या सागराला नारळी पौर्णिमेला भक्तीभावाने नारळ अर्पण केला जातो. असा हा श्रावणमास! सर्वांच्या आनंदाची हिरवळ फुलवणारा आणि आगामी समृद्ध जीवनाचे ओझरते दर्शन घडवणारा. मला वाटते माझ्याप्रमाणे आपणा सर्वांनाही तो खूप खूप आवडत असावा!

श्रावण महिना हिंदू पंचांगातील एक पवित्र आणि धार्मिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वपूर्ण महिना आहे. हा महिना विशेषतः श्रावण पौर्णिमेपासून सुरू होतो आणि भारतीय संस्कृतीत विविध धार्मिक व्रत, उपवास, आणि सण यांच्यासाठी प्रसिद्ध आहे. त्याचे महत्त्व खालीलप्रमाणे आहे:

**१. श्रावण सोमवारा:** श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी भगवान शिवाची विशेष पूजा केली जाते. या दिवशी अनेक भक्त उपवास धरतात आणि शिवलिंगावर जलाभिषेक करतात. हा महिना शिव उपासनेसाठी अत्यंत शुभ मानला जातो.

**२. सणांची रेलचेल:** या महिन्यात नागपंचमी, रक्षाबंधन, हरितालिका तीज, आणि गोपालकाला यांसारखे सण साजरे केले जातात. यामध्ये विशेषतः रक्षाबंधन भावाबहिणीच्या नात्याचे प्रतीक म्हणून महत्त्वाचा असतो.

**३. व्रत आणि उपवास:** श्रावण महिन्यात स्त्रिया आणि पुरुष विविध व्रत पाळतात. श्रावणातील मंगळवार आणि शुक्रवार स्त्रियांसाठी विशेष व्रताचे दिवस असतात. यासोबतच, या महिन्यात शाकाहाराचे पालन करणे, मांसाहार आणि मद्यपान टाळणे हा भक्तांचा संकल्प असतो.

**४. पर्यावरणाशी नाते:** या महिन्यात पाऊस सुरू असतो आणि नैसर्गिक समृद्धीचा महिना मानला जातो. झाडे लावण्याची परंपरा या महिन्यात वाढीस लागते, कारण श्रावण महिना पर्यावरणस्नेही म्हणूनही ओळखला जातो.

**५. वैदिक महत्त्व:** वैदिक ग्रंथांमध्ये श्रावण महिन्याचे विशेष महत्त्व सांगितले आहे. यामध्ये धार्मिक उपासनेतून पापांचा नाश होतो आणि भक्तांना मोक्ष प्राप्तीची संधी मिळते, असे मानले जाते.

**६. निसर्गातील शुद्धता:** या महिन्यात जल, वायू, आणि पर्यावरणातील शुद्धतेला विशेष महत्त्व दिले जाते. धार्मिक विधी आणि पूजा यांचे आयोजन करून निसर्ग आणि मानवाचे नाते दृढ करण्याचा प्रयत्न केला जातो.

श्रावण महिना धार्मिक उत्साहाने आणि निसर्गाच्या सौंदर्याने परिपूर्ण असतो, आणि हिंदू धर्मातील लोकांसाठी अध्यात्मिक शांतीचा महिना म्हणून महत्त्वाचा आहे.

●●

**बाबा**

स्वत:च्या मनातलं दु:ख लपवून
सदैव चेहऱ्यावर आनंद ठेवणारी व्यक्ती
म्हणजे बाबा

खिशात रुपयादेखील नसताना मुलांच्या संपूर्ण
इच्छा पूर्ण करण्याची तयारी ठेवणारी व्यक्ती
म्हणजे बाबा...

मुलांच्या आयुष्यात कितीही संकटं आली
तरी घाबरू नको, सगळं चांगलं
होईल असं समजून सांगणारी व्यक्ती
म्हणजे बाबा.....

स्वत:च्या मुला-मुलींवर सगळ्यात जास्त
प्रेम करणारे आणि त्यांच्या सुख-दु:खात
त्यांना साथ देणारी व्यक्ती
म्हणजे बाबा....

कितीही दु:ख झाले तरी
डोळ्यातून पाणी न आणणारी व्यक्ती
म्हणजे आपले बाबा.....

**गवारी अनिशा**
प्रथम वर्ष, वाणिज्य

●●



## मराठी भाषा काल, आज आणि उद्या

**ढोबळे वैष्णवी**
तृतीय वर्ष, कला

मराठी साहित्य निर्मितीस प्रारंभ झाला तो सामान्यत: दहाव्या व अकराव्या शतकात व तो प्रामुख्याने केला महानुभव पंथियांनी. त्यांनी मराठीचा उपयोग संस्कृतच्या जागी करण्यास प्रारंभ केला व काही काळ तरी संस्कृतनिष्ठांना चांगलाच शह दिला. पण त्या पंथांच्या विचित्र व सर्वसामान्यांच्या पूर्वापार धारणा-विचारांना धक्का देणाऱ्या, अपरिचित तत्त्वज्ञानप्रचाराचे कार्य गुप्तपणे अनेक सांकेतिक लिप्यांतून करावे लागते. यामुळे मराठी माध्यमांद्वारे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचण्याच्या त्यांच्या मूळ हेतूस सहजच बाधा येऊन खंड पडला. त्यांचे सर्व मराठीसाहित्य या पर्यायांपुरतेच मर्यादित राहते. मराठीचा यथावश्यक परिचय होणे मागे पडले. अलीकडेच ते सांकेतिक लिप्यांच्या कडिकुलुपातून मुक्त झाले आणि त्यावेळीच त्याचे अलौकिकत्त्व महत्त्व लक्षात आले. चक्रधर हे त्या पंथाचे संस्थापक. त्यांनी महाराष्ट्रासंबंधी अभिमानाने म्हटले आहे. ''महाराष्ट्री असताची योग्यता महाराष्ट्र सात्विक तेथेच जड चेतन पदार्थ तेही सात्विक तेथे असता शरिर मानसिक कव्हनीची उपद्रव उपजला असे तो महाराष्ट्री असता शमे : तेथचां अन्नोदकी शमे: तेथचा औषधी शमे : तेथंचां वारा झाडी पावूस तेही सात्विक : तेणे सकळ उपद्रव शमेती : ''महंत म्हणजे निर्दोष : आणि एकं देश निर्दोष होती : परी सगून नव्हेती : महाराष्ट्र निर्दोष : आणि शगुन तेथे असता अनाचार करावयाची बुद्धी नुपजे : आन उपनली तर करून दीती : ते महाराष्ट्र धर्म सिद्धी जाए : ते महाराष्ट्र : महंत म्हणिजे थोर : तर तेची थोरी कवणे अर्थे असे. पा. ना. सात्विक हा एक दुसरा सुखरूप : तिसरा इष्टकारक : चवथा निर्दोष : पाचवा सगुण : महाराष्ट्र थोर : आणिक हा एक कैसे थोर : जेणुका अर्थी आपुली थोरी असे : तेतु लाही अर्थी आणिकासी थोरी करी : थोरापासौनि महाथोर तयाते महाराष्ट्र म्हणिजे : ''नको गा केशवट्या : येणे माझीये स्वामीचा म्हातारिया सामान्य परिवारू नागवैल की : परमेश्वरे तरी जीवाचेया संकोचता आन अनेक वासना अयोग्यता जाणौनि आन काठीन्यत चुकवौति सकळासि अल्पायासे ब्रह्मविद्याचिया ठाये निवासितां येवौनि परमात्म लाभुद्यमां

●●

# थोडं तरी जग बाई !

थोडं तरी जग बाई, थोडं तरी जगणे
धुणं भांडी चहापाणी, एवढंच का तुझं जग?
माझं घर, माझा नवरा, किती वेड्यावानी करते
साऱ्यांच करता करताच, तुझे आयुष्य सरते.
नात-नातू, लेक-सून, यातचं अडकून पडणार का?
जीव ओवाळून टाकला तरी,
कुणी तुझ्यासाठी रडणार का?
घरासाठी राबूच नको,
असं आम्हाला म्हणायचं नाही,
थोडं तरी मनासारखं
तिनं जगायचं का नाही?
एखाद्या दिवशी बोलता बोलताच
अंगात येतं तुझ्या
फक्त प्लॅनिंग ऐकून ऐकून
बाकिचे घेतात मजा
स्वित्झर्लंड, सिंगापूर
नुसत्या गप्पा मारतेस
पिक्चरला जाऊ म्हटलं तरी
पुन्हा पुन्हा हारतेस
अगं वेडे स्वत:साठी, थोडंतरी जग
एक दिवस मैत्रिणींसोबत, घालवून तरी बघ
पाच सहाजणी मिळून, करा स्वतंत्र जीप
मोकळ्या हवेत एखादी, काढा वन डे ट्रीप,
आरडा-ओरडा, हसी-मजाक
पुन्हा लहान व्हावं
रडगाणं गायचं सोडून
मजेत गाणं गावं
किचनमध्ये गॅसजवळ
होरपळून जाऊ नको
अन्नपूर्ण म्हटलं की
हुरळून जाऊ नको
प्रत्येकाला स्पेस पाहिजे
तिला जीव नाही का ?
तुम्हाला खूप टेन्शन असतं
तिला भावना नाहीत का?
वेडे घरात कुणीही तुझा
पुतळा उभारणार नाही,
कदाचित श्राद्ध पक्षालाही
तुझा फोटो सापडणार नाही
माझं म्हणणं असं नाही की,
तिने मोकाट सुटावं
नाकात वार शिरल्यासारखं
सदा पळत सुटावं
तिच्यावर जबाबदारी ढकलून
आपण तमाशा पहावा का?
ती भैरवी गात असताना
आपण मल्हार गावा का?
कविता फक्त एवढचं म्हणते
स्वत:लाही वेळ दे
जगणं सुंदर होण्यासाठी
मैत्रिणींणा शीळ दे
अधून-मधून प्रत्येकाला
लहान होता आलं पाहिजे
एक दिवस उनाड होऊन
जगणं धमाल झालं पाहिजे....

**केंद्रे पद्मजा**
एम. कॉम

●●



# पर्यावरण संतुलन : काळाची गरज

**पोखरकर सिद्धी**
प्रथम वर्ष, वाणिज्य

''स्वत: भगवान शंकर अमृत वाटून विष प्याले.'' पर्यावरण दोन शब्दांनी बनलेले आहे. पर+आवरण म्हणजे आपल्या सभोवतालचे वातावरण. पर्यावरण आणि मानव यांचे नाते खूप जवळचे आहे. माणसाच्या भौतिक गरजा पर्यावरणामुळे भागतात. आपल्याला पाणी, हवा इत्यादी घटक पर्यावरणातून मिळतात. आपण पर्यावरणापासून आहोत. प्रत्येकाच्या जीवनासाठी पर्यावरण हे अत्यंत महत्त्वाचे आहे. मानवाने आपल्या बुद्धी सामर्थ्याच्या जोरावर विविध क्षेत्रात अतुलनीय प्रगती केली आहे. मानवाच्या प्रगतीच्या वाटचालीत निसर्गाचा मोठा हातभार आहे. या निसर्गाच्या दिनक्रमात मानवाने हस्तक्षेप करून अनेक संकटे ओढावून घेतलेली आहे. संपूर्ण मानवी जीवनच धोक्यात येऊ लागले आहे. म्हणूनच पर्यावरणाच्या संतुलनाची मानवाला गरज भासू लागली आहे.

पर्यावरण केवळ हवामानाचा समतोल राखण्याचे काम करत नाही तर जीवनासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टीदेखील पुरवते. लोकांना पर्यावरणाचे महत्त्व समजावे आणि त्याबाबत जनजागृती व्हावी यासाठी ५ जून रोजी 'जागतिक पर्यावरण दिन' साजरा केला जातो. पर्यावरणाच्या ढासळलेल्या संतुलनामुळे पृथ्वीवरील जीवसृष्टीला विविध प्रकारे तोंड द्यावे लागत आहे. कित्येक जीवन-जाती नष्ट झाल्या आहेत. कित्येक नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. निसर्गातील अन्न साखळी तुटली तर पुन्हा भीषण संकट! म्हणूनच कोट्यावधी रुपये खर्च करून दुर्मिळ प्राण्यांचे, वनस्पतींचे जतन करण्यास कित्येक देश पुढे येऊ लागले आहेत. पर्यावरणाचे संतुलन राखण्याच्या दृष्टीने 'हे विश्वची माझे घर' ही संत ज्ञानेश्वरांनी सांगितलेली महान कल्पना सर्वांनी अंमलात आणणे गरजेचे आहे. मानवाने निर्मिलेल्या प्रत्येक वस्तूंचा जास्तीत जास्त पुनर्वापर करून नवनिर्मितीच्या माध्यमातून होणारे प्रदुषण टाळणे, निसर्गातील जीवसृष्टीतील अन्न साखळी टिकवण्यासाठी खास उपाययोजना करणे, हवा, पाणी दुषित करणाऱ्या घटकांना आळा घालणे, अत्याधुनिक तंत्राचा वापर करून कारखान्यातील धूर, दुषित वायू यांचे प्रमाण कमी करणे, कर्क व मकर वृत्तावरील किरणे प्रखर असतात, येथील उष्णता परावर्तित करण्यासाठी उपाययोजना करणे इत्यादी

अनेक बाबींचा संतुलीत विचार करून कार्यवाही करणे म्हणजे पर्यावरणाचे खऱ्या अर्थाने संतुलन राखणे होय. पर्यावरण केवळ आपल्या आरोग्याची काळजी घेत नाही तर आईप्रमाणे आपल्याला आनंद आणि शांतीदेखील देते. आपण सर्वांनी पर्यावरणाबाबत जागरूक असणे गरजेचे आहे. वृक्षतोडीवर शासनाने कठोर कायदे केले पाहिजेत. यासोबतच पर्यावरण स्वच्छ ठेवणे हे आपले कर्तव्य आहे हे सर्वांना समजले पाहिजे. कारण स्वच्छ वातावरणात राहुनच आरोग्य, मानवाची निर्मिती व विकास होऊ शकतो. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी आणि वृक्षतोड रोखण्यासाठी अनेक महत्त्वाच्या गोष्टी लक्षात घेता येऊ शकतात.

**१. वनसंवर्धन आणि वृक्षारोपण** : जिथे झाडे तोडली गेली आहेत, त्या ठिकाणी पुन्हा झाडे लावण्याची (वनीकरण) प्रक्रिया महत्वाची आहे. गावं, शहरे, शाळा, संस्था आणि खाजगी कंपन्या यांच्यामार्फत वृक्षारोपण मोहिमा राबवून अधिकाधिक झाडे लावता येतील. जन्मदिवस, सण, विशेष प्रसंगी झाडे लावा हा संदेश लोकांमध्ये रुजवणे आवश्यक आहे.

**२. वृक्षतोड नियंत्रित करणे** : सरकारद्वारे वनसंवर्धनाचे कठोर नियम लागू केले पाहिजेत. वृक्षतोड केल्यास दंड आणि शिक्षा यांची कडक अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. विकास प्रकल्पांसाठी होणारी वृक्षतोड कमीत कमी करण्यासाठी पर्याय शोधणे आणि सस्टेनेबल (टिकाऊ) विकासाच्या कल्पना पुढे आणणे महत्त्वाचे आहे.

**३. शाश्वत शेती** : पारंपरिक शेतीत वृक्षतोड मोठ्या प्रमाणात केली जाते. यासाठी शाश्वत आणि पर्यावरणपूरक शेतीचे तंत्रज्ञान वापरावे. आंतरपीक पद्धती आणि जंगल शेती सारख्या पद्धती शेतीत वापरल्यास, शेतीत झाडे टिकवून ठेवता येतात.

**४. पुनर्वापर आणि पुनर्व्यवस्था** : कागद आणि इतर लाकडी वस्तूंचा वापर कमी करून पुनर्वापराच्या सवयींना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. प्लास्टिक, मेटल, आणि इतर वस्तूंचा पुनर्वापर करून पर्यावरणीय हानी कमी करता येते.

**५. पर्यावरणीय शिक्षण** : शाळांमध्ये आणि समाजामध्ये पर्यावरणाचे महत्त्व समजावून सांगणे आवश्यक आहे. वृक्षतोड, हवामान बदल, आणि पर्यावरणीय हानी याबद्दलची जागरूकता वाढवणे महत्त्वाचे आहे. एनजीओ आणि सामाजिक संघटना यांच्यामार्फत पर्यावरण संवर्धनाच्या मोहिमा चालवता येतील.

**६. कार्बन उत्सर्जन कमी करणे** : वृक्षतोड थांबवण्याबरोबरच, कार्बन उत्सर्जन कमी करणे आवश्यक आहे, कारण ते वातावरणातील तापमान वाढवते. यासाठी नवीकरणीय ऊर्जा स्रोत जसे की सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, इत्यादींचा वापर करणे फायदेशीर आहे.

७. समाजातील सहभाग : स्थानिक लोकांना पर्यावरण संवर्धनाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेणे आवश्यक आहे. यासाठी लोकशाहीच्या माध्यमातून वनसंवर्धन धोरणे आखली जाऊ शकतात. वन क्षेत्रांमध्ये राहणाऱ्या लोकांना त्यांच्या आजीविकेसाठी शाश्वत साधने उपलब्ध करून देणे आवश्यक आहे, ज्यामुळे त्यांना जंगल तोडण्याची गरज भासणार नाही.

**८. कायदे आणि धोरणे** : भारतातील वनसंरक्षण कायदा, १९८० आणि जैवविविधता कायदा, २००२ सारखे कायदे प्रभावीपणे अंमलात आणणे आवश्यक आहे. पर्यावरणीय मूल्यांकन हे कोणत्याही विकास प्रकल्पांपूर्वी करणे गरजेचे आहे, जेणेकरून पर्यावरणीय हानी होणार नाही.

**९. शहरीकरणाचे शाश्वत नियोजन** : शहरे विकसित करताना जंगले आणि हिरवे क्षेत्रे राखून ठेवणे आवश्यक आहे. स्मार्ट सिटी संकल्पना अंतर्गत हिरवळीचे क्षेत्र वाढवणे आणि त्याचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

**१०. जलसंवर्धन** : झाडे आणि पर्यावरण टिकवण्यासाठी जलसंवर्धन महत्त्वाचे आहे. झाडांना योग्य पाणी मिळाले पाहिजे आणि भूमिगत जलस्तर कायम ठेवण्यासाठी जलस्रोतांचे संवर्धन करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष:** पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी आणि वृक्षतोड थांबवण्यासाठी प्रत्येक व्यक्तीची जबाबदारी आहे. वृक्षतोड थांबवून पर्यावरणाचे संरक्षण करणे, भविष्यातील पिढ्यांसाठी आणि पृथ्वीवरील जीवन टिकवण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.



# मराठीच्या बोली व प्रदेश

**चिखले प्रतिक्षा**
प्रथम वर्ष, कला

**अ. उत्तर महाराष्ट्र**

१. **अहिराणी :** जळगाव जिल्हा, धुळे, नंदुरबार, नाशिक ते मध्य प्रदेशातील बऱ्हाणपूर, शहापूर, अतुर्लीपर्यंतच्या विस्तृत भूप्रदेशात ही बोलीभाषा प्रचलित आहे. शब्दांमध्ये नाद आणि लय हे या बोलीची वैशिष्ट्य आहे.

२. **तावडी :** जामनेर, भुसावळ, जळगाव, बांदवर, रावेर, यावल तालुका या भागात तावडी बोली प्रचलित आहे. तावडी बोलीत मोठ्या प्रमाणात 'क' च्या जागी 'ख' चा उच्चार केला जातो. उदा - डोखं (डोकं)

३. **देहवाली :** भिल्ल समाजात ही आढळते. गुजराती आणि हिंदी भाषांचा हिच्यावर मोठा प्रभाव आहे. धुळे, नंदुरबार या भागात ही बोली वापरात आहे. या भाषेचे खळवाड आणि मेवासी असे दोन पोटप्रकारही आहेत.

**आ. कोकण**

१. **कोकणी/चित्पावनी :** कोकणी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अनेक बोली आहेत.

२. **माणदेशी :** सांगली, सातारा या जिल्ह्यांतील आटपाडी, माण तालुक्यांत प्रामुख्याने तर सांगली जिल्ह्यातील जत, खानापूर, कवठे महांकाळ या तालुक्यांच्या, सातारा जिल्ह्यातील खटाव या तालुक्याच्या सोलापूर जिल्ह्यातील सांगोला, मंगळवेढा, माळशिरस या तालुक्यांच्या काही भागात बोलली जाते.

३. **मालवणी :** दक्षिण रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात बोलली जाणारी ही बोली आहे. या बोलीस कुडाळी असेही म्हणतात. हेल काढून आलेले अनुनासिक उच्चार हे या बोलीचे वैशिष्ट्य आहे.

४. **कोळी :** मुख्यत: मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, अलिबाग तसेच गुजरातमधील उमरगाव, दादरा नगर हवेली आणि गोव्यात त्याचबरोबर संपूर्ण कोकणातील किनारपट्यांवर कोळी भाषा बोलली हाती. कोळी जातीतील अनेक उपजातींमध्ये थोड्याफार भाषेचे फरक पडतात. जसे कोळी, मांगेली, वैती, आगरी इत्यादी.

**इ. कर्नाटक सीमा**

**१. कोल्हापूरी :** कोल्हापूर भागात बोलली जाणारी ही बोली आहे. लय काढून बोलण्याची लकब या भागात आढळते. तसेच कोकणी भाषेचा प्रभाव यावर दिसतो. भाषेत रांगडेपणा व शिव्यांचा वापर आढळतो.

**२. चंदगडी बोली :** कर्नाटक-महाराष्ट्र सीमावर्ती प्रदेशातील अनेक गावांची ही भाषा आहे. कोल्हापुरकर जिल्ह्यातील चंदगड भागात भाषा प्रचलित आहे. या भूभागात दोन भिन्न भाषा-बोलींचा संपर्क, विविध राजकीय अंमल, मराठी कन्नड आणि कोकणी भाषेच्या प्रभावाखाली तयार झालेली ही एक बोली भाषा आहे. चंदगड तालुक्याचा पश्चिमभाग, दोडामार्ग-सावंतवाडी तालुक्याचा सीमेलगतची गावे, आजरा तालुक्याच्या दक्षिण भागातील गावे जी कोकणीच्या प्रभावाने तयार झालेली बोली वापरतात. यामध्ये 'मिय्या जेवलो' (मी जेवले), 'मिय्या बाजारास गेल्लो' (मी बाजारात गेलो) अशी शब्द रचना दिसते. तसेच 'कोठे' ऐवजी 'खडे' असा शब्द ऐकू येतो.

**३. बेळगावी :** बेळगाव या महाराष्ट्राचा सीमाभागातील ही बोलीभाषा ही कन्नड, चंदगडी, कोल्हापुरी, कोकणी अशा अनेक बोलींच्या मिश्रणातून तयार झालेली आहे.

**ई. मराठवाडी**

मराठवाडा परिसरात ही ठसकेबाज मराठी भाषा वापरली जाते. नांदेड जिल्ह्यात तेलंगणा राज्याला लागून असल्याने एक वेगळाच हेलका धरला जातो. तर महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती भागातील उस्मानाबाद व लातूर जिल्ह्यात थोडी वेगळी भाषा बोलली जाते.

**उ. विदर्भ**

**१. नागपूरी :** पूर्व विदर्भातील नागपूर, वर्धा, चंद्रपूरचा काही भाग आणि चंद्रपूरचा काही भाग आणि गडचिरोलीचा काही भाग तसेच भंडारा (गोंदिया) या जिल्ह्यात बोलली जाणारी नागपूरी ही काहीशी निराळी बोली आहे. तसेच मध्यप्रदेशातील शिवनी, छिंदवाडा, बालाघाट व रायपूर या भागातही ही बोली प्रचलित आहे.

**२. वऱ्हाडी :** बुलढाणा, वाशीम, अकोला, यवतमाळ, अमरावती आणि वर्धा या सहा जिल्ह्यांतून वऱ्हाडी बोलली जाते. मूळ मराठी अशी ही बोली कुठल्याही प्रकारचा हेल न काढता, अनुनासिक इत्यादीचा अतिरेक न करता अत्यंत संथपणे बोलली जाते.

**३. झाडीबोली :** भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या चार जिल्ह्यांचा भूप्रदेश 'झाडीपट्टी' म्हणून ओळखला जातो. या भागातील बोलीभाषेला झाडीबोली असे म्हणतात.

**ऊ. इतर**

**१. नारायणपेठी बोली :** महाराष्ट्रातील स्वकूळ साळी समाजाची बोली. आंध्रप्रदेशातून येऊन देशभर विखुरलेले मराठी विणकर ही बोलीभाषा बोलतात.

**२. तंजावर मराठी :** ही मराठी भाषेचीचे एक बोली असून ती भारताच्या तमिळनाडू ह्या राज्यात बोलली जाते. जवळपास एक लाखाहून अधिक लोक ही भाषा रोजच्या व्यवहारात उपयोगात आणतात. तमिळनाडू राज्यातील तंजावर किंवा तंजावर ह्या नगरातील ही एक बोलीभाषा आहे.

**३. नंदभाषा :** व्यापार करताना इतरांना कळू नये म्हणून व्यापारी ही एक सांकेतिक भाषा इतिहासात वापरत होते. आजही काही ठिकाणी वापरात आहे. त्या भाषेमध्ये चलनाच्या उल्लेखांसाठी निराळे शब्द आहेत.

**भटक्या विमुक्त**

भटक्या विमुक्त जमातींच्या मराठी संलग्न बोली आहेत. यांना पारूशी असेही संबोधन आहे. यामध्ये गोंधळी, कुडमुडॅ जोशी, गोसावी, भराडी, गोपाळ, शिकलगार, वैदू, नंदीवाले, बेलदार, कोल्हाटी आदी भटक्या जमाती येतात. सदैव भ्रमणात राहिल्याने यांच्या बोलीमध्ये विविध शब्द आहे. आपली कौशल्ये आपल्याच जमातीत राहावीत यासाठी या बोलीभाषांचा उपयोग केला जातो.

●●



## स्वत:शीच बोलायचे राहून गेले

खूप कमवली धन-दौलत
खूप कमवली नाती....
खूप जपली माणसं आपली
खूप जपल्या आठवणी....
खूप मिळाले मित्र नवे
खूपजण साथ सोडून गेले.....
खूप जगलो सुखात आयुष्य
खूप दु:खही सहन केले.....
खूप हसलो सुखात
खूप दु:खात रडूनही झाले....
पण,
या सर्वांशी करार करताना
स्वत:शीच बोलायचे राहून गेले.....

**केदारी मिरा**
एम. कॉम.

●●

## मला समजलेले माझे बाबा

ज्या माणसामुळे मला दुनिया कळली, ते माझे बाबा
ज्या माणसामुळे आयुष्याची वळणे पाहिली
ते माझे बाबा ||
प्रेम कधीही दाखवत नाही
पण माझ्यावर सर्वांत जास्त प्रेम करतात
ते माझे बाबा ||
प्रत्येक वेळी मला हसवतात, ते माझे बाबा |
खाली पडल्यावर प्रत्येकवेळी मला सावरतात
ते माझे बाबा ||
मी चुकल्यावर मला ओरडतात
पण तरीही सावरून घेतात, ते माझे बाबा ||
मंदिरात गेल्यावर देवाकडे प्रार्थना करतात,
माझ्या आयुष्यातले सगळे सुख माझ्या लेकीला
मिळू दे आणि तिच्या आयुष्यातले सगळे दु:ख मला
मिळू दे, ते माझे बाबा ||
कितीही कामात असले तरी
माझ्यासाठी त्यांचा वेळ काढतात, ते माझे बाबा ||
स्वत:च्या अंगावरील सदऱ्याला
भोकं पडलेली असली तरी
मला नवीन कपडे आणून देतात
ते माझे बाबा ||
स्वत:च्या पायात चप्पल
नसेल तरी चालते त्यांना
पण आपल्या लेकीच्या पायात चांगलं चप्पल पाहिजे
असा विचार जे करतात, ते माझे बाबा ||
स्वत: उपाशी पोटी झोपतात
पण मला पोटभर जेवू घालतात, ते माझे बाबा ||
मी बोलण्याआधीच सर्व काही ज्यांना कळते
ते माझे बाबा |
मी मागण्याआधीच मला हवे ते आणून देतात
ते माझे बाबा ||

**पोखरकर सिद्धी**
प्रथम वर्ष, वाणिज्य

●●



# वाणिज्य विभागातील करिअर संधी

**गोडे संस्कृती**
द्वितीय वर्ष, वाणिज्य

शैक्षणिक क्षेत्रात विज्ञान आणि कला शाखेसोबत वाणिज्य शाखा हा शिक्षणाचा सर्वात लोकप्रिय प्रवाह मानला जातो. वाणिज्य हे व्यवसाय, व्यापार, लेखा, आर्थिक माहिती आणि व्यापाराच्या विविध पैलूंशी संबंधित आहे.

कला आणि विज्ञान शाखेच्या प्रत्येक क्षेत्रात वाणिज्य शाखादेखील मोठी भूमिका बजावते. आजच्या डिजिटल युगात तंत्रज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्रात कॉमर्सचा वापर केला जात आहे आणि त्यामुळे हळूहळू वाणिज्य क्षेत्रात विद्यार्थ्यांचा कल वाढताना दिसत आहे. शैक्षणिक मंडळाने २०१७ मध्ये केलेल्या संशोधनानुसार एकट्या मुंबईत २.६७ लाख विद्यार्थ्यांनी विज्ञान आणि कला शाखेपेक्षा वाणिज्य शाखेची निवड केली. हा लेख प्रत्येकासाठी डोळे उघडणारा आहे, जो सिद्ध करतो की, वाणिज्य प्रवाह निवडणे हा विद्यार्थ्याने घेतलेल्या सर्वोत्तम निर्णयांपैकी एक असेल.

वाणिज्य क्षेत्रातील शिक्षणात पदवी मिळवून विद्यार्थी खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात नोकरीच्या संधी मिळवू शकतात. पदव्युत्तर स्तरावर त्यांचा अभ्यास सुरू ठेवण्यासाठी किंवा स्वत:चे उद्योजकीय प्रयत्न करण्यासाठी देखील वाणिज्य शाखा एक आदर्श पाया म्हणून काम करते. व्यावसायाशी संबंधित ज्ञान आणि कौशल्यांचा सन्मान करण्यापलीकडे, संपूर्ण देशामध्ये आर्थिक साक्षरतेला चालना देण्याचे काम वाणिज्य शिक्षणातून केले जाते.

**वाणिज्य शिक्षणाचे फायदे :**

१. वाणिज्य शाखेच्या शिक्षणामुळे तुम्हाला विविध प्रकारच्या नोकऱ्या मिळू शकतात. तुम्ही वित्त, लेखा, विपणन, मानव संसाधन, कर आकारणी, बँकिंग क्षेत्रे यामध्ये काम करू शकता. हे एक अतिशय लवचिक क्षेत्र आहे त्यात नोकरीच्या भरपूर संधी आहेत.

२. वाणिज्य शाखेचे शिक्षण तुम्हाला तुमचा स्वत:चा व्यवसाय कसा सुरू करायचा आणि तो यशस्वी कसा करायचा हे देखील शिकवते.

३. वाणिज्य शाखेचे शिक्षण विद्यार्थ्यांना पैसे आणि गुंतवणूक कशी व्यवस्थापित करावी हे शिकण्यात मदत करते. ते स्मार्टली आर्थिक निर्णय घेऊ शकतात.

विद्यार्थी अकाऊंटिंग, टॅक्स व गुंतवणूक कशी करावी याबद्दल शिकतात.

४. वाणिज्य शाखेतील शिक्षणामध्ये आर्थिक लेखा, कर, संप्रेषण आणि व्यवसाय योजना यांसारखी व्यावहारिक कौशल्येदेखील शिकवली जातात. हे त्यांना त्यांच्या करिअरमध्ये यशस्वी होण्यास मदत करते.

५. वाणिज्य शाखेत शिक्षण तुम्हाला नेतृत्व कसे करावे, संघात कसे काम करावे. गंभीरपणे विचार कसा करावा आणि समस्यांचे निराकरण कसे करावे यासारखी महत्त्वाची कौशल्ये शिकवते.

६. वाणिज्य शाखेतील शिक्षण विद्यार्थ्यांना नोकरीसाठी चांगले उमेदवार बनवण्यासाठी आवश्यक कौशल्ये आणि ज्ञान मिळवण्यास मदत करते.

७. वाणिज्य शाखेतील शिक्षण देशाच्या आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या विकास वाढीस मदत करते.

**वाणिज्य क्षेत्रातील करिअर संधी**

- Chartered Accountant (Ca)
- Chartered Financial Analyst (CFA)
- Company Secretary (CS)
- Cost Accountant
- Digital Marketing
- Retail Manager
- Investment Banker
- Actuary
- Personal Financial Advisor
- Research Analyst
- Investment Analyst
- Stock Broker
- Tax Consultant
- Auditor / Financial Risk Manager

●●



**छ. शिवाजी महाराज की जय...**

रयतेचे राजा होते,
निराधारांचे आधार होते
मातेचे पुत्र होते,
पित्याचे वारस होते.
छ. शिवाजी राजे एक वादळ होते,
नावातच सादर होते,
छ. शिवाजी राजे एक मन होते,
साऱ्या राज्यात सण होते.
छ. शिवाजी राजे एक स्वप्न होते,
महाराष्ट्राचे रत्न होते,
अफाट ध्येय होते,
मूर्तीमंत तेज होते.
बाहेरून दगडासारखे,
मनातून मेणासारखे,
तीन शब्दांत न भावणारे,
स्वराज्याची जाणीव करून देणारे
छ. शिवाजी राजे द बॉस होते,
वाईटांचा दि एन्ड होते,
छ. शिवाजी राजे एक कोहीनूर होते,
सगळ्यांनाच आवडेल असा राजा होते.

**केदारी मिरा**
एम. कॉम

●●



# अस्तित्त्व हाच सुंदर दागिना

**भांड प्रतिक्षा**
प्रथम वर्ष, वाणिज्य

आस्तित्वच हाच सुंदर दागिना, समान मानव माना स्त्रीला, तिची अस्मिता खुडू नका, देवी म्हणूनी भजू नका वा, दासी म्हणूनही पिटू नका. समाजाने स्त्रीला देवी म्हणून पुजावे ही अपेक्षा नाही. समाजाने स्त्रीला दासी म्हणून हिंणवावं हेही उचित नाही. फक्त या समाजाकडून एवढीच अपेक्षा आहे की समाजाने स्त्रीला माणूस म्हणून समानतेची वागणूक द्यावी. सहानुभूती नकोच असते तिला, फक्त सहनशक्ती हवे आहे. केविलवाणी नजर नको असते तिला, पण परिस्थितीत झगडण्याचे ताकद हवी असते. माहिती मला ती पूर्णपणे स्वतंत्र नाही, कुटुंबाच्या मर्यादा, समाजाची बंधन सगळं काही सांभाळायचं असतं तिला. पण माझ्यातले 'मी' पणाला जिवंत ठेवायचं असेल तर झगडा स्वतःशी आणि लढा जगाशी द्यावाच लागेल नाही का? ढाळू नको अश्रू पुसणारं कोणी नाही, हाक यातनांची ऐकणार कोणी नाही. जीवन जगण्याचे मार्ग जरी खुंटले ग ! या तुझ्याच देवतांनी तुलाच लुटले ग ! तिला बाई पण नकोसंही वाटत असेल, तिच्यावर सातत्याने होणाऱ्या अन्याय, अत्याचारामुळे तिला तिच्या बाईपणाचा तिरस्कारही वाटत असेल, म्हणूनच असुरक्षित असलेल्या या बाईपणात सुरक्षित असणार पुरुष पण निर्माण करण्याचा, ती भाबडा प्रयत्नही करत असेल परंतु काळ कितीही पुढे गेला ना पुरुषत्वाची कितीही लेबल आपण लावत गेलो ना तरीसुद्धा बाईपण हे कधीच झाकलं जात नाही. कारण आजही दर महिन्याला तिला मासिक पाळी येतेच. बाळंतपणाच्या कळा ह्या त्याला नाही तर तिलाच सहन कराव्या लागतात. स्वतःपासून दुसरा जीव निर्माण करत असताना पुनर्जन्म हा तिचाच होत असतो. अर्थात या साऱ्या वेदना सहन करण्याची क्षमता, ताकदही त्याच्यात नाही तर तिच्यात असते. हे त्या निसर्ग देवतेलासुद्धा मान्य आहे. म्हणूनच बाळंतपणाच्या वेदना मासिक पाळी किंवा सौंदर्य ही बाईपणाची कमजोरी नाही. 'ना कोई सरहद ठहरी, ना कोई चार दिवारी ठहरी, पिंजरे से निकली तो जाकर आसमान पे नारी ठहरी.' आताच्या स्त्रिया एवढ्या सक्षम अन् चाणाक्ष आहेत की हातात अगदी माती जरी आली ना तरी त्यातील सोन्याचे कण वेचून प्रतिकूल

परिस्थितीलासुद्धा अनुकूल करण्याची क्षमता त्यांच्यामध्ये पहायला मिळते. त्या जगाशी प्रामाणिक राहण्याआधी स्वतःशी प्रामाणिक असतात म्हणूनच ते हे जग जिंकू शकतात. वडिलांसाठी प्रियकर सोडतात, नवऱ्यासाठी घर सोडतात, भावासाठी संपत्ती सोडतात, मुलांसाठी नोकरी सोडतात, बाहेर कोणी छेडलं तर बाहेर जाणंसुद्धा बंद करतात, काही वाईट लोक म्हणतात की चांगली स्त्री फक्त ती असते ती आपल जगणं थांबून जिवंत असून मेल्यासारखे वागते. म्हणूनच स्त्रियांना सांगावसे वाटते, भगवंताने डोक्यावर घ्यावं अशी तू कळस हो. आईने मन भरून ओवाळावं, अशी तू तुळस हो. परिस्थितीपुढे झुकू नको तिच्यावरती सरस हो. खंबीरपणे उभी रहा तटस्थ, तू तीन पाणी पळस हो.

••




## तू प्यार है

तू प्यार है,
तू बेहद है,
तू प्यार है,
तू एक है,
बेहद तू जुनून है।
बेहद तुझे बनाया है,
तू तड़प है,
बेहद तू आग है,
मशाल की कसम,
तू रूह का रूप है।
तुझे हासिल करना है,
तू रग रग में है,
सफलता की सीढ़ी का,
ढाल है,
बेहद तू जुनून है।
मुझे सुकून तब है,
जब तू मेरे पास है,
मेरा सुख दुख है,
तुझे पाने के लिए,
बेहद जरूरी है।
हदें पार कर,
तू रब का खेल है,
बेहद तब है,
जब तू जुनून से
बेहद है।

**संकलन : पोखरकर स्वप्निल**
प्रथम वर्ष, वाणिज्य

••



# स्त्री अबला नव्हे तर सबला

**भांड प्रतिक्षा**
प्रथम वर्ष, विज्ञान

स्त्री अबला की सबला एकच मध्यबिंदू असलेल्या एकाही रेषेच्या या दोन बाजू आहेत. आकाशाला गवसणी घालण्यासाठी गेलेली आणि गतप्राण झालेली सुनिता विल्यम्स एक महिला ना, आपल्या देशाच्या माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, सुनीता विल्यम्स, किरण बेदी, पी. टी. उषा आपल्या बुद्धीच्या आणि आपल्या पराक्रमाच्या जोरावर आपलं अस्तित्व सिद्ध केलं. नवदुर्गा दुर्गा माता अशी अनेक रूप स्त्रीमध्ये पाहणाऱ्या समाजाला स्त्री अबला की सबला? हा प्रश्न पडावा हे नवलच.

या विषयाला खरंतर कुठून सुरुवात करू हे खरंतर मलाही कळत नाही. जिने नऊ महिने आपल्या गर्भात आपल्या बाळाला साभाळलं त्या माझ्या मातेपासून करू की जिने मनगटावर राखी बांधून माझ्या बंधूच रक्षण कर असं म्हणणाऱ्या माझ्या बहिणीपासून करू एकतर्फी प्रेमातून बळी गेलेल्या अमृता देशपांडे पासून करू की दहावीच्या परीक्षेला जाताना जिला ॲसिड टाकून जाळलं त्या रेणूका चौधरीपासून करू, पाश्चात संस्कृतीच्या तालावर नाचणाऱ्या माधुरी दिक्षीतपासून करून की स्त्री शिक्षणाच्या पुरस्कर्त्या सावित्रीबाई फुले यांच्यापासून करू, संसाराचा गाडा आनंदाने हाकलणाऱ्या ''अरे संसार संसार जसा तवा चुल्हयावर आधी हाताला चटके मग मिळते भाकर'' असं समर्पणाचे गीत गाणाऱ्या माझ्या गृहिणी बहिणाबाईंपासून करू, ''ढाळू नको अश्रू पुसणारं कोणी नाही ही हाक यातना ऐकणारे कोणी नाही, जीवन जगण्याचे मार्ग जरी खुंटले ग! या तुझ्याच देवतांनी तुलाच लुटले ग!''

आजही जीवनाच्या प्रत्येक वळणावर पुरुषांनी महिलेला साथ द्यावी, पुरुषांनी महिलेला बळ द्यावं, आणि पुरुषांनी महिलेचे चारित्र्य जपावं हे आजही मला कुठेतरी खटकत आहे. स्त्री म्हणजे केवळ अश्रुंचा बाण, स्त्री म्हणजे पुरुषांच्या तालावर नाचणारी कळसुत्री बाहुली आणि स्त्री म्हणजे पुरुषांच्या पायातील वाहन ही विशेषणे आज कुठेतरी फिकी पडत आहे. स्त्रियांनी आपल्या पराक्रमाच्या, कर्तृत्वाच्या जोरावर ही विशेषणे मागं पाडलेली आहेत.

आज आपल्या कुटुंबाला आपल्या समाजाला पर्यायाने राष्ट्राला सामर्थ्य देण्याचं काम हे स्त्री करत आहे. पुरुषांमध्ये असणारी प्रचंड आग विझवण्याचे सामर्थ्यसुद्धा स्त्रीमध्ये आहे तरीही आजच्या स्त्रीला जीवन नकोसं वाटावं? ''स्त्री जन्मां तुझी कहाणी हृदयी अमृत नयनी पाणी.''

अशी म्हणण्याची वेळ स्त्रीवर यावी काय कारण असू शकलो स्त्रीवर होणारे अन्याय, अत्याचार, बलात्कार तिला मिळणारी अमानुष वागणूक आजही तिच्या प्रगतीला बांध घालत आहे. आज राजकारण समाजकारण, बँक संघटन वकिली, वैद्यकीय क्षेत्र, सर्वच क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून भिडत आहे, आपलं वर्चस्व आपलं अस्तित्व सिद्ध करत आहे. नेतृत्व करताना देखील कुठलीही स्त्री कमी पडली नाही. अहो ! पारतंत्र्याच्या काळात झाशीची राणी सावित्रीबाई फुले या स्त्रिया कमी पडल्या नाही तर या संगणकाच्या युगात त्या का डगमगतील ? स्त्री म्हणजे अबला नक्कीच नाही तर स्त्री म्हणजे महिला, महान शक्ती हे लोकांना पटवून दिलं पाहिजे आज स्वातंत्र्याचा उपभोग घेत असताना स्त्रियांनी जीवनमुक्तीचा मार्ग दाखवावा लागतो. एकतर्फी प्रेमाला नकार दिल्यानंतर तिच्यावर जिवघेणा हल्ला होतो. आज कामाच्या ठिकाणीसुद्धा महिला सुरक्षित नाही हे दुर्दैव म्हणावं लागेल. हो ती डगमगते, ती कोलमडते, ती रडते, ती थकते, पण तरीसुद्धा ती ताठ उभी राहते. स्त्रीला समजून घेणं फार सोपं आहे पण तिला ओळखणं हे फार कठीण आहे. आजच्या या महिलांना मी सांगू इच्छिते की, कोणा एका कृष्णासाठी अमृत म्हणून विषाचा घोट नाही घ्यायचा, कारण त्याग हा निरर्थक ठरतो. एक वचनी रामासाठी काट्याकुट्यांचा वनवास सितेसारखा नाही, भोगायचा कारण विश्वास आता पायदळी तुडवला जातोय. कोणी एका धृतराष्ट्रासाठी डोळ्यांवर पट्टे बांधून अंधारात नाही रहायचं, कारण नि:स्वार्थी भावना आता शुन्यात विरत चालल्यात. कोणा एका पांडवाच्या आग्रहासाठी द्रौपदीसारखं महाभारत नाही घडवायचं आता लढा स्वबळावर दिला जातोय. कोणालातरी सबळ करण्यासाठी स्वतःला अबला मरत नाही.

''चांद अधुरा आहे सितारों के बिना,
गुलशन अधुरा आहे बहारों के बिना,
समंदर अधुरा अधुरा आहे किनरो के बिना,
संसार अधुरा आहे एक नारी के बिना.''

महिला सबलीकरण म्हणजे महिलांना समाज, अर्थव्यवस्था, आणि व्यक्तिगत स्तरावर अधिकार आणि संधी मिळवून देणे, ज्यामुळे त्या स्वयंपूर्ण आणि आत्मविश्वासाने जीवन जगू शकतील.

**१. शिक्षणाचे महत्त्व:** शिक्षण हे महिला सबलीकरणाचे सर्वात मोठे साधन आहे. शिक्षणाने महिलांना स्वतःच्या हक्कांची जाण होते आणि त्यांना विविध संधी प्राप्त होतात. शिक्षणामुळे महिलांना आर्थिक स्वातंत्र्य आणि समाजातील भूमिका समजून घेण्याची क्षमता मिळते, ज्यामुळे त्या विविध क्षेत्रांमध्ये यशस्वी होऊ शकतात.

**२. आर्थिक सबलीकरण:** आर्थिक सबलीकरण म्हणजे महिलांना स्वतःचे आर्थिक निर्णय घेण्याची आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्याची संधी देणे. स्त्री-उद्योजकतेला चालना देणे, महिलांना छोट्या व्यवसायांसाठी कर्ज उपलब्ध करून देणे, आणि महिलांना सक्षम नोकऱ्या मिळवून देणे यासाठी विविध योजना चालविल्या जातात.

**३. स्वतंत्र निर्णयक्षमता:** महिला सबलीकरणाचे उद्दिष्ट आहे महिलांना त्यांचे वैयक्तिक, कौटुंबिक, आणि सामाजिक जीवनातील निर्णय स्वतंत्रपणे घेण्याची क्षमता मिळवून देणे. यात विवाह, करिअर, मुलांचे संगोपन, आणि आर्थिक गुंतवणूक यासंबंधी स्वातंत्र्य असणे महत्त्वाचे आहे.

**४. राजकीय सहभाग:** महिलांना राजकीय क्षेत्रात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. महिलांनी स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत, विधानसभेतील प्रतिनिधी म्हणून काम केले पाहिजे. महिलांना राजकीय क्षेत्रात योग्य प्रतिनिधित्व दिल्यास त्यांच्या समस्यांचे आणि अधिकारांचे संरक्षण अधिक प्रभावीपणे केले जाऊ शकते.

**५. कायद्यांचे संरक्षण:** महिलांच्या हक्कांचे संरक्षण करणारे अनेक कायदे आहेत, जसे की स्त्रीविरोधी हिंसाचार कायदा, घरेलू हिंसाचारविरोधी कायदा, आणि कार्यस्थळी लैंगिक छळविरोधी कायदा. या कायद्यांचे योग्यरित्या अंमलबजावणी झाल्यास महिलांना सुरक्षित आणि स्वतंत्र जीवन जगण्याची संधी मिळते.

**६. आरोग्य आणि आरोग्यसेवा:** महिलांचे शारीरिक आणि मानसिक आरोग्य सबलीकरणाच्या प्रक्रियेत महत्त्वाचे स्थान राखते. महिलांना योग्य आरोग्यसेवा मिळणे, प्रजनन आरोग्याबाबत जागरूकता असणे, आणि त्यांना स्वच्छता साधने उपलब्ध होणे आवश्यक आहे.




# कर्तृत्व शिखराचे विलोभनीय दर्शन : डॉ. ए. पी. जे. अब्दूल कलाम

**माळी चैताली**
प्रथम वर्ष, विज्ञान

भारतीय महासत्तेचे स्वप्न दाखवणारे आणि त्यांच्या मनात सकारात्मक विचारांची दिवेलागण करणारे भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम हे एक लोकोत्तर व्यक्तिमत्व होते. डॉ. कलाम हे आदर्श शिक्षक आणि भविष्यांचा वेध घेणारे विचारवंत होते. त्यांचे संबंध जीवन ही स्फूर्तीची गाथा आहे. मरगळलेल्या मनाना नवचैतन्य देण्याचं विलक्षण सामर्थ्य त्यांच्या जीवनचरित्रात आणि तत्त्वज्ञानात आहे.

हैदराबाद विद्यापीठाच्या स्कूल ऑफ मॅनेजमेंट सायन्सेसमध्ये 'प्रोफेसर' म्हणून कार्यरत असणारे अरूण तिवारी हे भारतात संरक्षण तंत्रज्ञानासाठी भक्कम औद्योगिक पाया निर्माण करण्यासाठी सल्लागार म्हणून मोलाची कामगिरी करत आहेत. त्यांना कलाम यांच्या चमूतील सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यांनीच १९९९ मध्ये कलाम यांच्याबरोबर त्यांचे आत्मचरित्र 'विंग्ज ऑफ फायर' शब्दबद्ध केलं. अनेक पुस्तकांमधून त्यांनी कलाम यांच्या अनेक अज्ञात पैलूंवर नेमकेपणाने प्रकाश टाकला आहे. वाचकांना कलाम यांच्या विषयीच्या किती तरी नव्या गोष्टी या पुस्तकातून समजतात. कलाम यांच्याविषयी अनेक पुस्तकं आजवर प्रकाशित झाली. लेखकाला कलाम यांचा अतिशय जवळून घडलेला सहवास, सततचा संपर्क आणि त्यांच्याबरोबर सहलेखन करण्याची मिळालेली संधी यामुळे त्यांनी लिहिलेले हे पुस्तक इतर सर्व पुस्तकांपेक्षा श्रेष्ठ आहे. या पुस्तकात केवळ कलाम यांचं जीवनचरित्र नाही. ज्या महापुरूषांच्या विचारांतून त्यांचे व्यक्तिमत्व घडले त्यांचे चिंतन आहे. माणूस म्हणून घडलेले दर्शन आहे. वैयक्तिक आठवणी आणि किस्से आहेत. अनेक घटना-प्रसंगातल्या कलाम यांच्या उत्कट भावना या पुस्तकात शब्दबद्ध झाल्या आहेत. त्यामुळे कलाम यांना समग्रपणे समजून घेण्यासाठी परिपूर्ण जीवनचरित्र म्हणून या पुस्तकाचा उल्लेख करावा लागेल.

'नांदी', 'निर्मिती', 'जाणीव' आणि 'विस्तार' अशा चार भागांतल्या ३२ प्रकरणांतून कलाम यांचा जीवनप्रवास उलगडत जातो. सामान्य कुटूंबात जन्मास आलेल्या कलाम यांना त्यांच्या मनात आशेचा नंदनवन निर्माण करणारे शिक्षक शालेय जीवनातच भेटले. त्यांचे शिक्षक सुब्रमणिया

अय्यर यांनी पक्ष्यांच्या उड्डाणाबाबत वर्गात शिकवताना फळ्यावर पक्ष्याचे चित्र काढले. पक्षी आधी उड्डाण करून नंतर कसे उडू लागतात, हे सांगितले. ते कलाम यांना समजले नाही, तेव्हा त्यांचे शिक्षक त्यांना उडणारे पक्षी दाखविण्यासाठी समुद्रकिनारी घेऊन गेले. तिथे उडणारे पक्षी पाहून कलामांना कळून चुकले की, पक्ष्याला त्याच्या जीवनापासून भरारी घेण्याची ऊर्जा मिळते. आणि त्याची तीव्र इच्छाच घडण्याची प्रेरणा देते. या धड्याचा कलाम यांच्या मनावर परिणाम झाला. या धड्याने पक्ष्यांचे उड्डाण हे त्यांच्या इच्छाशक्तीचे प्रतीक बनले.

ऐहिक मर्यादांवर स्वार होत आणि संकटांशी दोन हात करत झेपावून जाण्याचं स्वप्न त्यांच्या मनात पेरले. त्या स्वप्नांच्या पूर्ततेसाठी कलाम अहोरात्र प्रयत्नशील राहिले. मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये या एरोनॉटिकल इंजिनिअरिंगसाठी कलाम यांनी अर्ज केला तो स्वीकारला गेला. परंतू या मानाच्या संस्थेत प्रवेश घेणं हे खर्चिक काम होते. त्यावेळी कलाम यांची बहिण ओहरा त्यांच्या मदतीला धावून आली. त्यांच्या प्रवेशासाठी तिनं आपल्या सोन्याच्या बांगड्या आणि साखळी गहाण ठेवली. या कृतीनेकलामांना त्याग म्हणजे काय, हे शिकवले. अशा अनेक प्रसंगांनी कलामांना जीवनदर्शन घडवले आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक परिपक्व होत गेले, या संस्काराविषयी लेखकाने खूप नेमकेपणानं या पुस्तकात लिहिले आहे.

एमआयटीमध्ये शिकत असताना प्रा. स्पाँउर, प्रा. के.व्ही.ए. पंडलई, प्रा. नरसिंह राव, प्रा.श्रीनिवास यांच्यासारखे अधिकारी प्राध्यापक त्यांना गुरू म्हणून लाभले. त्यांनी कलामांमधल्या जिज्ञासू कृतीला नव्या वाटा दाखविल्या. आपल्या महत्त्वाकांक्षांना जीवनसिद्धीत साकार करण्याच्या खेळातले दोन प्रतिस्पर्धी आहेत. ते म्हणजे भीती आणि अज्ञान. या विषयावर ज्ञान हाच उतारा आहे, हा संस्कार दिला वयाच्या सव्वीसाव्या वर्षी एमआयटीतून बंगळूरच्या हिंदूस्थान एअरक्राप्ट लिमिटेडमध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून झालेली निवड, डीटीडी अँड पी (एअर) मध्ये वैज्ञानिक सहायक म्हणून केलेलं काम, भारतीय अंतराळ संशोधन समितीत अग्निबाण अभियंता म्हणून झालेली नेमणूक, नासात प्रशिक्षणासाठी जाण्याची मिळालेली संधी आणि डॉ. विक्रम साराभाई यांचा घडलेला सहवास यातून कलाम यांच्यातला संशोधक फुलत गेला.

देशाचे अकरावे राष्ट्रपती म्हणून कलाम यांची प्रचंड बहुमतानं निवड झाली. भारतीय प्रजासत्ताकाचे ते पहिलेच शास्त्रज्ञ- जे राष्ट्रपती बनले. शपथग्रहण समारंभानंतर राष्ट्रपती कलाम यांना एकवीस तोफांची सलामी देऊन सहा घोड्यांच्या बग्गीतून घोडदळाच्या पथकातील घोड्यावर स्वार असलेल्या शरीररक्षकांसह राष्ट्रपतीभवनात नेण्यात आले. हा सारा प्रसंग लेखकांने विलक्षण रेखाटला आहे. कलाम यांचा नेहमीचा आवडता वेश म्हणजे निळा शर्ट आणि स्पोर्ट शूज, यापुढे बंद गळ्याचा सूट हा त्यांचा नवा पोशाख असणार होता. अतिशय साधेपणानं आयुष्य जगणारे कलाम यांना राष्ट्रपतीभवनातल्या मंडळींना त्यांच्या संतवृत्तीचे दर्शन कसे घडले, हे वाचण्याजोगं आहे.

कलाम हे मुलांना आणि तरूणांना भेटण्यासाठी कायम उत्सुक असत. सौराष्ट्रातील सारंगपूर या लहानशा गावात एका युवा परिषदेत भाषण करून थकलेले कलाम विश्रांती घेत होते. एक सहा वर्षांचा मुलगा त्यांची स्वाक्षरी घेण्यासाठी धडपडत होता. सुरक्षारक्षक अडवत होते. त्यांच्या सुरक्षा कड्यातून आत येण्यास कलाम यांनी त्याला परवानगी दिली. त्याला स्वाक्षरी दिल्यानंतर कलाम हसले आणि म्हणाले, ''लहान मुलांना कधीही निराश करू नका- कारण ते आपल्या आयुष्यातली सुरूवातीची वर्ष जगत आहेत.'' त्यानंतर काही मिनिटांतच ते त्यांच्या मोटारीकडे जात असताना एका नव्वद वर्षाच्या वृद्ध शेतकऱ्याने हात उंचावला.

डॉ. कलाम त्याच्या दिशेनं चालत गेले. त्या वृद्धाच्या पणतूला कलाम यांच्या बरोबर छायाचित्र काढायचे होते तेव्हा ते म्हणाले, ''वृद्ध माणसाला कधीही निराश करू नका. कारण तो आपल्या आयुष्याची अखेरची वर्ष जगत असतो.'' अशा अनेक प्रसंगातून कलाम यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान साध-सोपे होते. या पृथ्वीतलावर एकही दुःखी चेहरा नसावा, असे त्यांना वाटत होते. अनेकदा जे विज्ञाननिष्ठ आणि बुद्धिप्रामाण्यवादी असतात त्यांच्या

भावनांना मोहोर येत नाही. असे म्हटले जाते; पण कलाम यांच्याबाबतीत असे घडले नाही. ते आध्यात्म मानणारे वैज्ञानिक होते. 'धर्म हे अंतरंगाचे विज्ञान आणि विज्ञान हा बाह्यसृष्टीचा धर्म', या विचाराशी ते सहमत होते. हे सारं स्वीकारताना 'भारतीयत्वाला' त्यांचं नेहमीच सर्वोच्च प्राधान्य होते. आपल्या जगण्यातून आणि विचारांतून जनसामान्यांची मने प्रज्ज्वलित करणाऱ्या कलाम यांना जाणून घेण्यासाठी हे पुस्तक वाचायला हवे. एका कर्तृत्वशिखराला प्रदक्षिणा घातल्याचा आनंद आवर्जून देते.

●●



**बाप**

बाप म्हणजे काय असते
बाप म्हणजे आपले जीवन असतो
हे बऱ्याच जणांना कळत नसते.
बाप हे एक हिरवे पान असतो.
कष्ट करणे हेच त्याचे जीवन असते
बाप असतो घराचे अस्तित्व
पण मुला-मुलींना कळत नाही त्यांचे महत्त्व
बाप म्हणजे जणू शिंपल्यातील मोती
आपल्यासाठी तो कष्ट करतो किती
बाप असतो घराचा कळस
कधी करतो का? तो कामाचा आळस
आपल्या नावामागे असते बापाचे नाव
त्यांच्यामुळे तयार होते आपले वेगळेच गांव
मुलांना येता थंडी-ताप,
दवाखान्यात नेणारा असतो तो बाप
विधात्याने निर्माण केला पिता
मुलांच्या सुखासाठी तो सारखा झटत होता.

**- भालेराव ऋतुजा**
प्रथम वर्ष, विज्ञान

●●

**मुलगी**

मुलगी मानाचा तुरा
मुलगी आदर्शाचा झरा
मुलगी यशाची लता
मुलगी आत्मविश्वासाची सत्ता
मुलगी हृदयाचा श्वास
मुलगी जगण्याचा ध्यास
मुलगी सोबतीचा हाथ
मुलगी जीवनाची साथ
मुलगी स्वप्नांची छाया
मुलगी आई-बापाची माया
मुलगी सौंदर्याचे रंगरूप
मुलगी जगण्याचे स्वरूप
मुलगी पणतीची ज्योत
मुलगी सूर्याची वात
मुलगी यशाचे शिखर
मुलगी आनंदाचा सागर
मुलगी भाऊ-बहिणींची नाती
मुलगी आयुष्यभराची माती

**- दिघे अर्पिता**
प्रथम वर्ष, विज्ञान

●●



# भावनिक बुद्धिमत्ता

**हुलावळे साक्षी**
द्वितीय वर्ष, कला

**प्रस्तावना**

सॅलोव्ह : यांनी सर्वप्रथम भावनिक बुद्धीमत्तेची व्याख्या केली. ''बोध आणि भावना यांचा संगम म्हणजे भावनिक बुद्धी. या त्याच्या संकल्पनेला १९९६ पर्यंत प्रसिद्धी मिळाली नाही.

गोलमन (१९९६) मध्ये *Emotional Inteligence : why it can matter more than IQ* हे पुस्तक लिहिले त्यानंतर सॅलोव्हमायर याची भावनिक बुद्धीची संकल्पना लोकांपर्यंत पोहोचवली. गोलमन यांनी त्याच्या पुस्तकात असे प्रतिपादन केले की, व्यक्तीच्या यशात बुद्धी गुणाकांचा २०% तर भावनिक बुद्धीचा ८०% भाग असतो. भावनाचा व्यक्तीच्या वर्तनावर परिणाम होत असतो. विशेष करून नकारात्मक भावना या व्यक्तीच्या यशाआड येतात. या निरीक्षणातूनच भावनिक बुद्धीची संकल्पना पुढे आली.

भावनिक बुद्धी व भावनिक गुणांक (EQ) या संज्ञा समानार्थाने वापरल्या जातात. एट म्हणजे भावनिक जाणीव आणि भावनिक व्यवस्थापन कौशल्य, याच्यामुळे तार्किकता व भावना याच्यात समन्वय साधून आनंद प्राप्त होतो जेव्हा एट हा कार्यक्षमतेत रुपांतरीत होतो, तेव्हा भावनिक सक्षमता विकसीत होते.

**भावनिक बुद्धिमत्ता : सर्वसाधारण कल्पना**

''कोणीही रागावू शकतो. ते सोपे आहे. पण योग्य व्यक्तीवर, प्रमाणात, बरोबर वेळेवर, निश्चित हेतूकरिता आणि उचित मार्गाने रागवता येणे सोपे नाही.'' – ॲरिस्टॉटल

**विषयाची ओळख**

प्रेम, सुख, भय, ममता, द्वेष, लज्जा, तिटकारा, आश्चर्य, दुःख, उत्साह आणि राग यात सामाईक असे काय आहे? तुमच्या दैनंदिन जीवनावर ज्यांचा थेट परिणाम होतो, अशा या भावना आहेत. मिळविलेले गुण, उत्तीर्ण परीक्षा, शैक्षणिक यश यातून दिसणाऱ्या बुद्ध्यांकांवर किंवा तुमच्या बुद्धिमत्तेवर कामाच्या ठिकाणी मिळणारे यश अवलंबून असते. असा फार पूर्वीपासून समज असायचा. बुध्दयांकांवर किंवा तुमच्या बुद्धिमत्तेवर कामाच्या ठिकाणी मिळणारे यश अवलंबून असते. असा फार पूर्वीपासून समज असायचा. बुद्धयांक चाचणीमध्ये उच्च गुणांकन प्राप्ती, प्रगत संगणक पदवी किंवा अभियांत्रिकीची पदवी, शालेय प्रगती ही तुमची

बौद्धिक ओळखपत्रे मानली जातात. जगण्याच्या कठीण क्षणांना समोर जाताना पुस्तकी शिक्षणाच्यापलीकडे तुम्ही कसे चाणाक्ष आहात? येथे अडचणीतून मार्ग काढण्याच्या वेगळ्या वृत्तीची गरज असते. तरबेज असण्याचा वेगळा मार्ग म्हणजे भावांक किंवा भावनिक बुद्धीमत्ता याची आवश्यकता आहे असे म्हणता येईल.

निसर्गदत्त महान बौद्धिक क्षमतांमुळे तुम्ही वसुली संबंधीचे हुशारीने पृथ्थकरण करणारे किंवा कायद्याचे अभ्यासक व्हाल पण विकसीत भावनिक बुद्धिमत्तेमुळे तुम्ही सीईओ पदाकरीता उमेदवार, तेजस्वी फिर्यादी वकील, यशस्वी राजकारणी किंवा सक्षम सरकारी अधिकारी व्हाल. तुमचे भावनिक गुणांक तुमच्या विवाहातील यशाची, प्रेमप्रकरणाची खात्री देणारे असतात. उच्च बुद्ध्यांक असूनही माणसांना त्यांच्या व्यावसायिक व वैयक्तिक जीवनात अपयश का येते व याचे उत्तर म्हणजे भावनिक बुद्धिमत्तेची कमतरता हे आहे.

सध्या नोकरीतील सुरक्षिततेची खात्री नाही. 'जॉब' ची संकल्पना वेगाने बदलत आहे त्याची जागा 'फिरती कौशल्ये', 'विक्री' कौशल्ये यांनी घेतली आहे. अशा वेळा भावनिक गुणांकाचा विचार मुख्य घटक आहे. ह्या 'बौद्धिक' गुणांना काही दर्शके विविध संदर्भातून वेगळी नावे दिली गेली आहे. 'चाणाक्षपना' व्यक्तिमत्व यापासूनच ते मृदू कौशल्ये, 'कार्यक्षमता' क्षमतांचे तंतोतंत आकलन झाले आहे. आणि एक त्याला नाव दिले आहे. 'भावनिक बुद्धिमत्ता किंवा भावनिक गुणांक.

**भावनिक गुणांक (EQ) म्हणजे काय?**

खूप मोठ्या प्रमाणात 'भावनिक गुणांक' हा शब्द वापरला जातो. 'भावनिक बुद्धिमत्तेची व्याख्या करण्यापूर्वी 'भावना' या संज्ञेची व्याख्या करणे उचित ठरेल, चित्तवेधकपणे अंतर्ज्ञानाने 'भावना शब्दाचा अर्थ आपण जाणतो. पण काही बाबतीत एकमत असूनही मानसतज्ज्ञांनी सामान्यतः भावनांची शास्त्रीय तात्विक भूमिका स्वीकारलेली नाही. भावना असल्याचा परिणाम म्हणजे प्रत्येकाचा भावनेबाबतचा अनुभव होय. 'भावने' चे सपाटीकरण आणि वर्णन मानसशास्त्रज्ञानी वेगळ्या प्रकारे केले आहे. पण ही मानवी मनाची गुंतागुंतीची स्थिती आहे याबाबत सर्वांचे एकमत आहे त्यात मोठ्या प्रमाणात असलेल्या शारीरिक बदलांच्या समावेश होती.

आपल्या स्वतःच्या भावना निर्माण करायला शिकणे हे प्रत्येकासाठी महत्त्वाचे आहे. आपण स्वतःला जे सांगतो, त्या आपल्या विचाराने व्यक्त केलेल्या प्रतिक्रियाचे नियंत्रण केले जाते. आपला स्वतःचा भावना निर्माण करण्यासाठी लागणारा विश्वास आणि उत्तम उदाहरणे यांचे आपले आकलन जसजसे स्पष्ट होईल, त्यानुसार अक्षरशः आपण आपल्या स्वतःच्या जीवनाची निवड करीत आहोत. हे शिकून स्वतःचे विचार, भावना आणि कृतीला जबाबदार बनतो. भावना 'छत्रीच्या संज्ञेत' बसते ती परिस्थिती, परिस्थितीचे स्पष्टीकरण, व आकलन, त्या परिस्थितीशी संबंधित भावना किंवा प्रतिसाद या सर्वांना ही संज्ञा सामावून घेते.

मिश्रणे, विविधता, बदल व सूक्ष्मभेदांसह हजारो भावना आहेत. विविध अगदी भिन्न व वैश्विक जाणवणाऱ्या भावना 'विरुद्ध-सांस्कृतिक अभ्यासाने' शोधल्या आहेत. खरचं व्यक्त करणाऱ्या शब्दांपेक्षा भावनांमध्ये असणारी गूढता जास्त असते. उदा. काही महत्त्वाच्या भावना, त्यांच्या मिश्रित भावनांसह पुढे दिल्या आहेत.

१. **राग** : त्वेष, अत्यंत चीड, हुकुमी, अपमानाने येणारा संताप, मनस्ताप, चिडचिड, द्वेष आणि हिंसा.
२. **निराशा** : अति दुःख, क्लेश, खिन्नता, स्वतःची कीव, एकाकीपणा, निराशा
३. **आनंद** : सुख, उत्साह, हर्ष, विरंगुळा, संतोष इत्यादी.
४. **भिती** : भय, जरब, संकट, बेचैनी, चिंता, तीव्र भिती इत्यादी.
५. **प्रेम** : स्वीकार, परस्पर आकर्षण, मित्रत्व, मोह, भक्ती इत्यादी.

अशा प्रकारे भावनांची वर्गवारी करायची याबद्दलच्या सर्व प्रश्नांची पृथ्थकरणावर दिलेली यादी करणार नाही हे निश्चित उदा. भिती, दुःख, तीव्र, राग व मत्सर यांच्या मिश्रणाविषयी काय म्हणायचे? किंवा निश्चितता व समतोल वृत्ती, धैर्य आणि क्षमाशीलता आशा व विश्वास अशा गुणागद्दल किंवा शंका नीरसपणा, आत्मसुंतष्टता अशा

आणखी काही प्रसिद्ध दुर्गुणाविषयी काय सांगायचे? याची उत्तरे नाहीत.

**तुमचा भावनिक गुणांक कसा मिळविता?**

अनुभवातून प्राप्त ज्ञानाची निर्मिती म्हणजे तुमची भावनिक मनोरचना. सभोवती असणाऱ्या शिक्षक, पालक तथाकथित नायक वगैरेच्या भूमिकेतून भावनिक कार्यकुशलता, क्षमता, कल्पना तुमच्याकडून शिकल्या जातात. सामाजिक शिक्षण प्रक्रियेतून तुम्ही भावनिक बुद्धिमत्ता शिकता. स्वतःला व इतरांना कसे समजून घ्यायचे किंवा आपापसातील नातेसंबंध कसे हाताळायचे याबाबत, तुमच्या आयुष्यात कधीही कोणीही तुम्हाला सांगायला येत नाही.

अशा संकल्पना औपचारिकपणे तुम्हाला कुणीही शिकविल्या नाहीत. हे न ओळखता, भावनिक बुद्धिमत्तेचे ज्ञान समाजगृहीत धरतो, थोडक्यात, या कल्पना, क्षमता कार्यशक्ती याचे कोणतेही औपचारिक ज्ञान तुमच्यासमोर येत नाही. त्यामुळे एक विचित्र परिस्थिती निर्माण होते. तुम्ही मोठे होता, समाजकामाची जागा, परिवार आणि अन्य तुमच्याकडून तंतोतंत आणि परिपूर्ण कल्पनाचे ज्ञान असण्याची अपेक्षा करतात. बुद्धिमत्तेचे 'विचार करणे' पृथ्थकरण करणे, स्मरण, तुलना उपयोजन, परीक्षेला बसणे, उच्च गुण प्राप्त करणे हेच काम आहे. असा विश्वास मोठ्या प्रमाणावर विकसनशील समाजात पसरलेला आहे हीच वेगळी समस्या आहे.

आमच्या वैयक्तिक व व्यावसायिक जीवनात भावना मनावर बिंबवण्याचे प्रयत्न होत नाही. आपल्या भावी पिढ्यांना ही भावनिक कौशल्ये खुलेपणाने देण्याचा कोणताही नियोजीत वा जाणीवपूर्वक प्रयत्न करीत नाही हे दुर्देव आहे. चूक नाहीशी होईपर्यंत चाचणीची कालबाह्य पद्धत सर्वसाधारण माणूस त्याच्या भावनिक समस्या सोडविण्यासाठी उपयोगात आणतो आहे. 'भावनिक गुणांक' असे जे काही आहे ते उशीराच शिकाल आणि इतक्या तातडीने आताच शिकण्याची गरजही नाही असे तुमच्यापैकी अनेकांना निश्चित वाटत असेल. ह्रदय व शरीर याचे दोन भागात विभाजन असते. असे दिसून येते. माझे मुख्य म्हणजे असे आहे की, 'ह्रदय' आणि 'मस्तक' याचे योग्य मिश्रण म्हणजे 'भावनिक बुद्धिमत्ता'

**भावनिक बुद्धिमत्ता आणि तुमचे व्यक्तिमत्त्व**

तुमची भावनिक बुद्धिमत्ता, म्हणजेच भावनिक गुणांक तुमच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब असते. व्यक्मित्त्व विकासात तुमचा भावनिक गुणांक कसे घवघवीत यश मिळवू न देतो किंवा स्पेशल अयशस्वी करतो हे समजण्यासाठी काही महत्त्वाचे बुद्ध्यांक पाहू या.

**१. भावनिक गुणांक आणि बुद्ध्यांक याचा संबंध**

भावनिक गुणांक हा बुद्ध्यांकाच्या विरुद्ध नाही. मेंदूवर ह्रदयाचा हा विजय वगैरे नाही. ही दोन्हीची विलक्षण युक्ती आहे. भावना व तर्कनिष्ठ बुद्धिमत्ता यांच्यातील संबंध गुंतागुंतीचे आहेत. कारण भावना शैक्षणिक व भावनिक मूलभूत गोष्टी यांच्या तोल, ऐतिहासिक, विभाजन स्वीकारण्याऐवजी त्यांच्या परस्परांवर क्रिया कशा होतात. याचे महत्त्व ओळखणे आवश्यक आहे. जाणीवपूर्वक प्रयत्नातून, भावनिक प्रतिसाद नियामांच्या चौकटीत आणणे शक्य आहे व अशा जाणिवेची कमतरता असली की, भावनिक प्रतिक्रिया तर्कबुद्धी विचारांकडे दुर्लक्ष करतात. आजवर विविध बुद्ध्यांक चाचण्यातून मानसतज्ज्ञांनी बुद्धीचे मोजमाप केले आहे. बुद्ध्यांक चाचणीसाठी वापरलेले सूत्र साधे व सुसंस्कृत असे आहे. व्यक्तीचे प्रत्यक्ष वय व मानसिक वय यांची तुलना या सूत्राने केली जाते.

एखादया व्यक्तिमध्ये शिकण्याची किती क्षमता आहे हे ठरविण्याचा हेतू यामागे असतो याप्रमाणेच मानसशास्त्रीय चाचण्याचा उपयोग करून आपण भावनिक गुणांक निश्चित करू शकतो. भावनिक बुद्धिमत्तेच्या मोजमापासाठी त्या विकसीत केल्या गेल्या आहेत. काही माणसाच्या भावनिक गुणांक, बुद्ध्यांकाइतकाच वरचा असतो. भावनिक बुद्धिमत्तेला महत्त्व देणे म्हणजू बुद्ध्यांकाला कमी लेखणे असे नव्हे. नोकरीतील तडीस नेण्याची कामे किंवा जीवन या दोन्हीमध्ये भावनिक गुणवत्ता व बुद्ध्यांक दोन्ही महत्त्वाचे आहेत. विज्ञान वा अभियंत्रिकीमध्ये प्रवेश घेण्यासाठी तुलनेने वरच्या पातळीवरील बुद्ध्यांकाची गरज असते. पूर्ण व्यक्तिमत्त्व विकास आणि कामातील समाधानकारक

अभिव्यक्ती यात अन्य घट वागणूक, मनःस्थिती आणि संवेदना याच्याशी संबंधित आहेत आणि आता मोठ्या विस्ताराने 'भावनिक घटक' म्हणून त्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. हे म्हणणेच भावनिक गुणांकाच्या प्रसारासाठी पुढे नेणे आहे.

**२. भावना कुठून येतात**

माणूस मानसशास्त्रीयदृष्ट्या गुंतागुंतीचा असतो. विवेकशक्तीचा वापर करणे, आठवणे, शिकणे, कल्पना करणे त्याचबरोबर विशिष्ट उद्दिष्टांकडे कृतीप्रवण करणे, याबाबत मानवी मन समर्थ असते. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, माणसे केवळ विचारशक्ती व बुद्धिमुळे प्रेरित होत नाहीत. पण विकार, इच्छा आणि इतर भावना माणसाला प्रबळपणे प्रेरित करत असतात. विचारांपेक्षा वेगळ्या दिशाकडे सुद्धा! या सर्व वाटण्याला भावना म्हणतात. भावनांचे वर्णन करण्याचा दुसरा एक मार्ग आहे. काही गोष्टी अशा असतात की ज्यामुळे तुम्ही खूष असतात. आणि दूसरा मार्ग आहे. काही गोष्टी ज्या तुम्हाला अप्रिय असतात. काही तुम्हाला भावतात काही तुम्ही रद्दबातल करता. काय भावते व कशाबद्दल शंका आहे हे ठरविणे अनिश्चित असते.

प्राचीन काळातील भावनिक प्रतिसाद हे अस्तित्व टिकविण्यासाठी होते. रक्त मोठ्या स्नायूतून वेगाने धावते, आश्चर्य वाटल्यावर भुवया उंचावतात, ज्या योगे डोळे विस्फारून दृश्य बघता यावे आणि अनपेक्षित घटनांची अधिक माहिती मिळावी चेहऱ्यावर घृणा व नाकपुड्या सुरकतलेल्या असतात प्रत्येक भावनाही एक उत्तेजनाची रडणे, हसणे, पळणे, भिती याची सूचना देते. हा सर्व अस्तित्वासाठी संघर्ष होतो.

**भावनिक गुणांचा विकास होऊ शकतो का?**

**१. सुरुवातीच्या काळातील अनुभव**

भावनिक विकास आयुष्यात आरंभापासून सुरु होतो. त्याचा संबंध मुलाच्या प्रगतीशी अगदी जवळून असतो, लहानपणी शिक्षणातील क्षमता आणि प्रौढावस्थेत यश आणि समाधान या दोन्ही बाबत, मुलांची निरोगी भावनिक वाढ उपयुक्त असते. भावनिक दृष्ट्या अकुशल अशा व्यक्तिगत पालकत्वाचा, आणि करड्या सांस्कृतिक, धार्मिक परंपराचा आघात प्रथम मुलांना सहन करावा लागतो. भावनिक विकास कळण्यासाठी मुलांच्या वाढीचे मानसशास्त्र तपासणे योग्य ठरेल.

**२. भावनिक गुणांकातील परिपक्वता**

भावनिक बुद्धिमत्ता ही वाढते वय व अनुभव यामुळे विकसीत होते. व्यक्तिची प्रगती लहानपणापासून मोठेपणापर्यंत होत असते. याची खात्री पटली. तरीही नव्या युक्तांनी लहानांना शिकविण्यासारखे काहीसे अवघड पण झाले. भावनिक बुद्धिमत्तेच्या पातळ्यांचे प्रभुत्व शिक्षण तरुणांपेक्षा जुन्या कमचाऱ्यांना देणे, प्रेरित करणे जास्त सोपे आहे. दरम्यान सामाजिक कौशल्य आणि सहानुभावावर आधारित बळकट होता. स्वयंशिस्तबाबत पुरुषाचे काम चांगले आढळते.

**भावनिक गुणांक सुधारण्याच्या काही सूचना**

नवीन भावनिक कौशल्य शिकताना खालील सोनेरी नियम अंमलात आणा.

१. चांगल्या प्रकारे भावना हाताळणाऱ्या कुणाशीतरी संबंध ठेवा. किंवा आदर्श ठेवा.
२. ती व्यक्ती काय करते ते पाहा
३. इशारे लक्षात घ्या.
४. ती व्यक्ती कशी बोलते/वागते
५. त्याच्या/तिच्या मार्गदर्शनात सराव करा.
६. तुम्हाला प्रतिक्रिया देण्यास त्या व्यक्तिला सांगा.
७. स्वतःचा स्वतः, सराव करा.
८. तुम्ही त्या कौशल्यावर प्रभुत्व मिळेपर्यंत प्रतिसाद द्या.
९. अशी कृती पुन्हा पुन्हा करा.

**व्यवस्थापकांसाठी- भावनिक कौशल्ये**

**१. भावनांचे विजेते व्हा**

भावनिकदृष्ट्या बुद्धिमान म्हणजे भावनिक विजेता असणे, भावनिकदृष्ट्या काही गमावणारा नव्हे जेथे भावनिक बुद्धिमत्ता कृतीत येते, तेव्हा जीवनातील अनेक वेगवेगळ्या भावनांना प्रतिसाद कसा घ्यायचा ते ती सांगते. भावनिकदृष्ट्या बुद्धिमान व्यक्ती स्वतःच्या व इतरांच्या भावना समजून घेण्याच्या जास्त चांगल्या स्थितीत असते. म्हणूनच कोणत्याही परिस्थितीत योग्य निर्णय घेऊ शकते.

विजेता आणि पराभूत या कल्पनातून हे स्पष्ट करणे शक्य आहे. समाजाचा घटक व व्यक्ती म्हणूनही जो विश्वसनीय, भरवसा वाटावा असा, प्रतिक्रियाशील, यश असून अगदी अस्सलपणे उत्तरादाखल वागतो, तो आपल्याला विजेता वाटतो. याउलट सच्चाई नसलेला तो हरलेला.

**२. लोकांवर प्रभाव टाकण्यासाठी कला शिका**

संबंध जोडण्यासाठी आणि भावनांचा उपयोग करण्याची तुमची क्षमता या गोष्टींवर ठसा उमटविण्याची आणि प्रभावित करण्याची कुशलता अगदी जवळून संबंधित असते. लोकांवर प्रभाव टाकण्याची कला, कामाच्या ठिकाणी व्यक्तिगणिक, बदलत असते. लोकांवर प्रभाव टाकताना त्याच्या भावना सांभाळण्याकडे लक्ष द्यावे लागते. चांगली कामगिरी करणारी माणसे भावनिक आव्हान करण्यात कुशल असतात. ऐकणाऱ्यांवर त्यामुळे प्रभाव पडतो. अशा गोष्टीमुळे ते चांगले गटप्रमुख होतात. याउलट जे इतरांच्या भावना ओळखण्यात कमी पडतात, त्यांच्या संघटनेला व्यवस्थापनाचे खराब परिणाम स्वीकारावे लागतात.

**३. रागावर नियंत्रण**

कधी ना कधीतरी प्रत्येकजण रागावतो. हे स्वाभाविक आणि सोपे आहे. पण रागाचे व्यवस्थापन करणे सोपे नाही. राग हाताळण्यासाठी, विशेष कौशल्ये शिकण्याची आवश्यकता असते. रागीट माणसे दुखणी, वेदना यांची जास्त तक्रार करतात. आणि सर्दी, डोकेदुखी, पोटदुखी हे त्यांना सहन करावे लागते.

राग आपल्या होकारात्मक भावनांचा नाश करतो. राग शक्तीसंघर्ष निर्माण करतो. वाईट भावना टाळण्यासाठी, स्वतःला वाईट वाटू नये म्हणून आणि जे तुम्हाला आवडतात त्यांनी दुखावले जाऊ नये, याकरिता तुम्ही रागावलात दुःखी झालात तरी ज्यांच्यावर तुमचे प्रेम आहे त्यांना त्रास देणे थांबावे म्हणून तुमच्यात ती क्षमता निश्चितच आहे. हे ओळखायला शिका.

●●

## आयुष्य गंभीर होऊन जगू नका

जीवनात तसेच करिअरमध्ये केवळ शैक्षणिक किंवा करिअर विषयक ध्येय उराशी बाळगू नका सारे जीवन सुंदर समतोल व्यतीत करण्याच्या दृष्टीने आपले लक्ष व ध्येय निश्चित करा म्हणजेच तुमचे आरोग्य, नाते संबंध, मानसिक स्वास्थ सारे उत्तम राहील अशा दृष्टीने जीवनाची बांधणी करा तसेच बनण्याचा प्रयत्न करा. तरच आयुष्याला खरा अर्थ आहे. ....तुम्ही अलिशान मोटारचे ड्रायव्हिंग करीत असताना तुमची पाठ दुखत असेल तर ड्रायव्हिंगची काय मजा येणार.... तुम्ही शॉपिंग करायला मॉलमध्ये गेला असताना जर मनात खूप तणाव असेल तर त्याचा तुम्हाला काहीच आनंद उपभोगता येणार नाही. आयुष्य फार गंभीरतेने खरेच घेऊ नका. जीवन हे गंभीरपणे जगण्यासाठी मुळी नाहीच. मुळातच आपण या भूतलावर कायम राहण्यासाठी आलेलो नाही. येथे तुमचे अस्तित्व काही काळासाठीच आहे याचे सतत भान ठेवा. मोबाईल फोनमधील प्रीपेड कार्डसारखीच आपली व्हॅलिडिटी येथे टेंपररी आहे. आपण जर खरेच नशीबवान असलो तर अजून आपण पन्नास वर्षे जगू आणि खरे बघायला गेले तर पन्नास वर्षे म्हणजे अवघे २५०० रविवार! खरेच आपण इतके काम करण्याची मुळात गरज आहे का? हा प्रश्न मनाला सतत विचारा. महाविद्यालयामध्ये शिकत असाल तर कधी कधी क्लासला आरामात दांडी मारा, काही पेपर्समध्ये मार्क कमी पडले तरी हरकत नाही. एखाद्या रोबोप्रमाणे यंत्रवत काम करू नका. आयुष्य सहजतेने जगा, आनंदाने जगा, त्याची मजा लुटा, आपल्या आजूबाजूच्या लोकांना, कुटुंबियांना आनंद दया.

**– पोखरकर प्रिया**
**द्वितीय वर्ष, कला**

●●




## पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील : शैक्षणिक कार्य

**सरोदे मनिषा**
तृतीय वर्ष, कला

महाराष्ट्र हा दगडधोंड्यांचा देश, अंजन कांचन कडेकपाऱ्यांचा देश, भले रत्नांच्या खाणी या मातीत नसतील पण पृथ्वी मोलाची लाख नवरत्न या मातीने जगाला दिली. त्याच रत्नांतील एक रत्न म्हणजे ''कर्मवीर भाऊराव पाटील.'' बहुजनांच्या मुलांमध्ये शिक्षण प्रसार करणारा देवमाणूस कर्मवीर भाऊराव पाटील. आताचे सगळे ''शिक्षण सम्राट'' आहेत का? खऱ्या अर्थाने ''शिक्षणमहर्षी'' असणारे कर्मवीर भाऊराव पाटील. एकवेळ जन्मदात्या बापाचे नाव बदलीन पण वसतिगृहाला दिलेलं ''शिवाजी महाराजांचं नाव नाही बदलणार, असं छातीठोकपणे सांगणारे कर्मवीर भाऊराव पाटील.''

ग्रामीण भागातील शिक्षणाची गरज १०० वर्षापूर्वीच ओळखणारा शिक्षणमहर्षी. ग्रामीण शिक्षण चळवळीचे जनक म्हणजेच कर्मवीर भाऊराव पाटील. लोकशाहीचा मूळगाभा लोकशिक्षण हे आहे आणि हे लोकशिक्षण समाजाला विकासाकडे नेते हे कर्मवीरांना ज्ञात होतं म्हणून अनवाणी पायांनी वणवण करुन अवघा महाराष्ट्र पिंजून काढून शिक्षणाची गंगा बहुजनांच्या झोपडी झोपडीत आणि झोपडीतल्या खोपडीत नेणारे कर्मवीर भाऊराव पाटील होते. ज्या महाराष्ट्राच्या पवित्र मातीत कर्मवीरांसारखा'' शिक्षणमहर्षी जन्माला आला त्याच महाराष्ट्राच्या मातीत आजच्या ''शिक्षणसम्राटांनी'' शिक्षणव्यवस्थेचे चित्र काय निर्माण केलयं. तर ''शिक्षणाचा संबंध पदव्यांशी, पदव्यांचा संबंध नोकरीशी, नोकरीचा संबंध चाकरीशी, चाकरीचा संबंध छोकरीशी, या छोकरीचा संबंध भाकरीशी आणि भाकरीचा संबंध परत नोकरीशी'' अशी अवस्था करून ठेवलीय. त्यामुळे कर्मवीरांसारख्या शिक्षणमहर्षी असणाऱ्या माणसाचं व्यक्तिमत्त्व तरुणांना माहीत होणं काळाची गरज बनली आहे.

**कर्मवीर भाऊराव पाटील यांचे बालपण**

२२ सप्टेंबर १८८७ रोजी भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी झाला. त्यांचे वडील पायगोंडा पाटील हे रोड कारकून होते. भाऊरावांचे प्राथमिक शिक्षण विटे, दहिवडी अशा वडिलांच्या बदलीच्या ठिकाणी झाले. १९०२ ते १९०७ या वर्षी ते कोल्हापूरच्या राजाराम हायस्कूलमध्ये शिकले. शाळेच्या पहिल्या दिवशी

त्यांचे बाह्य रुप पाहून विद्यार्थी त्यांच्यावर हसले. शालेय अभ्यासक्रमात ते मागे असले तरी ते कुस्ती, पोहणे, मल्लखांब या क्रीडाप्रकारांत पटाईत होते. ते इंग्रजी सहावी म्हणजे आताची दहावी शिकले. १० वी नापास असणाऱ्या या विद्यार्थ्याने ज्ञानाची गंगा खेड्यापाड्यापर्यंत नेली. कोल्हापूरात असताना भाऊराव कोल्हापूर येथील दिगंबर जैन बोर्डिंगमध्ये राहत असत. ही बोर्डिंग १९०५ मध्ये राजर्षी शाहूंनी सुरू केली. १९०८ मध्ये मिस क्लार्क होस्टेल या अस्पृश्य मुलीच्या वसतिगृहाच्या उद्घाटन कार्यक्रमास गेले म्हणून त्यांनी दुसऱ्यांदा स्नान करावे हा आदेश न पाळल्यामुळे त्यांना वसतिगृहातून काढून टाकले गेले. शाहू महाराजांच्या वाड्यावर आले व राजवाड्यातील विद्यार्थी कक्षात त्यांची राहण्याची व्यवस्था केली.

कोल्हापूरात शिक्षण घेत असतानाच त्यांच्या जीवनावर महात्मा फुले, शाहू महाराज, महात्मा गांधी यांच्या जीवनाचा खूप प्रभाव पडला. या महान लोकांमुळेच भाऊरावांच्या मनात समाजसेवेचे शुद्ध बीज अंकुरीत झाले. शिक्षण हाच सर्व सुधारणांचा पाया आहे अशी त्यांची खात्री पटली. शिक्षणाच्या अभावामुळेच आपली पीछेहाट झाली आहे. याची त्यांना अगदी तरुण वयातच जाणीव झाली. त्यामुळेच त्यांनी १९०९ मध्ये काही मित्रांच्या सहकार्याने वाळवे तालुक्यातील दूधगाव येथे ''दूधगाव विद्यार्थी आश्रम'' ही संस्था काढली व भाऊरावांच्या शैक्षणिक कार्यास प्रारंभ झाला. काले या सातारा जिल्ह्यातील गावी १९१९ मध्ये सत्यशोधक परिषदेचे अधिवेशन भरले होते. ग्रामीण जनतेच्या शिक्षणासाठी शिक्षण संस्था स्थापन करावी अशी विनंती भाऊरावांनी केली आणि ती मान्यही झाली. दिन, दलित, बहुजन मुलांना शिक्षण दिले पाहिजे असा विचार त्यांनी मांडला.

शेतकरी म्हणजेच रयत. रयतेला शिक्षण देणारी संस्था म्हणूनच या संस्थेला ''रयत शिक्षण संस्था'' असे नाव देण्यात आले. अशा तऱ्हेने ४ ऑक्टोबर १९१९ रोजी ''रयत शिक्षण संस्था'' स्थापन झाली. श्रम, स्वावलंबन व समता या तत्वांवर त्यांच्या शैक्षणिक कार्याचा वटवृक्ष आधारलेला होता. ''ज्याच्या हाताला घट्टा व चट्टा नाही तो स्वावलंबी विद्यार्थी नाही'' असे भाऊराव म्हणत असत. शिक्षणामध्ये शारीरिक श्रमाची प्रतिष्ठा प्रस्थापित करण्याचा यशस्वी प्रयत्न भाऊरावांनी केला. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असतानाच काम केलं पाहिजे व त्यातून शिक्षणाचा खर्च भागवला पाहिजे असे ते बोलत असत. संस्थेचा दैनंदिन कारभार पाहता यावा म्हणून त्यांनी किर्लोस्कर कारखान्यातील कामाचा राजीनामा दिला. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना भोजन, पुस्तके, वह्या, पाटी हा खर्च भागवण्यासाठी लोकांचा सहभाग व आस्था निर्माण केली. लोकसहभागातून संस्थेचा खर्च भागवला जाई. दूधगाव, काले, नेर्ले या ३ ठिकाणी प्रथम जी वसतिगृह स्थापन केली होती त्यांचा खर्च भागवण्यासाठी प्रसंगी त्यांनी आपली पत्नी लक्ष्मी यांचे मंगळसूत्र देखील विकले होते.

१९१९ मध्ये रयत शिक्षण संस्थेची स्थापना जरी झाली असली तरी आपल्या कार्यास व्यापक रूप देण्यासाठी १९२४ मध्ये भाऊरावांनी सातारा येथे सर्व धर्माच्या, पंथाच्या व जातीच्या विद्यार्थ्यांसाठी एक वसतिगृह काढले. १९२७ साली महात्मा गांधींनी या वसतिगृहाला भेट दिली. सर्व जाती धर्मातील विद्यार्थी एकत्र राहतात हे पाहून गांधीजींना खुप आनंद झाला होता. भाऊरावांच्या पत्नीनेही आपले सर्व जीवन वसतिगृहाच्या कामातच देण्याचे ठरवले. पुढे तर त्यांच्या पत्नीने आपले सर्व जीवनच संस्थेसाठी व्यतीत केले.

१९३२ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ''युनियन बोर्डिंग हाऊस'' या नावाने वसतिगृह पुणे येथे फर्ग्युसन टेकडीच्या मागे असलेल्या वडार वस्तीजवळ झोपड्या बांधून सुरू केले. ४ एप्रिल १९३३ रोजी बडोद्याचे संस्थानिक सयाजीराव गायकवाड हे सातारा येथे आले तेव्हा त्यांनी शाहू बोर्डिंगला भेट दिली. महाराजांनी विद्यार्थ्यांची विचारपूस केली. तिथल्या भाकरी व पिठले याचा आस्वाद देखील घेतला ते स्वत: शिक्षणाचे चाहते होते. त्यांनी भाऊरावांना ४००० रुपयांचा चेक दिला व त्यातून बहुजन समाजाला महागडे इंग्रजी शिक्षण मोफत मिळावे अशी इच्छा प्रकट केली. १९३५ मध्ये सिल्व्हर ज्युबली रुरल ट्रेनिंग कॉलेज त्यांनी सातारा येथे सुरू केले. ''म. फुले अध्यापक विद्यालय'' असे त्या विद्यालयाचे नाव होते. १९४० मध्ये

रयत शिक्षण संस्थेच्या वतीने पहिले माध्यमिक विद्यालय महाराज सयाजीराव गायकवाड फ्री ॲंड रेसिडेन्शियल हायस्कूल सुरू झाले. त्यासाठी फलटणचे राजेसाहेब श्रीमंत मालोजीराजे निंबाळकर यांनी १० एकर जमीन, १ बंगला व रोख ५००० देणगी दिली होती.

शाळेतील विद्यार्थ्यांना वसतिगृहात राहणे, शाळेची स्वच्छता करणे, जमाखर्च लिहिणे, शेतीत काम करणे ही कामे करावी लागत. तेथे सर्व शिक्षण मोफत होते. ''कमवा व शिका'' हा उपक्रम शाळेत राबवला जाई. रयत शिक्षण संस्थेची आज ३२० हायस्कूल, ४३ महाविद्यालये, ५७२ शाळा व वसतिगृहे आहेत. रयत शिक्षण संस्था, सातारा ही फक्त महाराष्ट्रातील किंवा भारतातील सर्वात मोठी शिक्षण संस्था आहे, असे नाही तर संपूर्ण आशिया खंडात एवढी मोठी शाखात्मक विस्तार असलेली संस्था नाही. आज सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, सोलापूर, रायगड, मुंबई, अहमदनगर, नाशिक, बीड या जिल्ह्यात संस्थेचा शाखाविस्तार झालेला आहे. गांधी हत्येनंतर सातारा येथे गांधीजींना श्रद्धांजली वाहण्यासाठी झालेल्या सभेत तत्कालीन मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांच्या विरोधात अपशब्द काढले म्हणून संस्थेचे अनुदान बंद करण्याचा निर्णय घेतला. अत्यंत परिश्रमाने वाढलेली रयत शिक्षण संस्था बंद पडण्याचा धोका उत्पन्न झाला. मुंबई प्रांताचे तेव्हाचे गव्हर्नर मोरारजी देसाई यांनी तर भाऊरावांचा उल्लेख एका सभेत ''सैतान'' असा केला. त्यांनी स्वत: तसेच शंकरराव मोरे, केशवराव जेधे, बापूजी साळुंखे आदींनी महाराष्ट्रात झंझावती दौरा करून संस्थेसाठी पैशाचा पाऊसच पडला.

भाऊरावांनी आपली बाजू जनतेपुढे मांडली. ५२ दिवसात ५३००० रुपये संस्थेला देणगी मिळाली. शेवटी २३ जानेवारी १९४९ रोजी सरकारने अनुदान चालू केले. भाऊरावांनी शिक्षणाविषयी पुरोगामी विचार मांडले. शिक्षण साध्य नसून साधन असे ते म्हणत असत. शिक्षणातून नवचैतन्य, नवमानव व नवसमाज निर्माण झाला पाहिजे. असा त्यांचा विचार होता. शिक्षण घ्या, शहाणे व्हा, पालकांचे दारिद्रय आड येऊ देऊ नका, घाम गाळून शिका, समाजाच्या उपयोगासाठी शिका असे त्यांचे विचार होते. शिक्षण हे माणसाच्या विकासाचे मूळ साधन आहे. शिक्षणामुळे माणूस बहुश्रुत होतो असे ते म्हणत. ''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद'' हे रयत शिक्षण संस्थेचे बोधवाक्य होते. भाऊराव पाटील म्हणजे महाराष्ट्रातील रविंद्रनाथ टागोर होत. भाऊरावांची राहणी अत्यंत साधी होती.

१९१० पासून भाऊरावांनी खादीचे व्रत स्वीकारले व अखेरपर्यंत त्याचे पालन केले. त्यांचे वर्षाचे कपडे म्हणजे ४ नेहरू शर्ट, चार धोतरे, २ पंचे खांद्यावर घोंगडी, हातात काठी असे. भव्य देहयष्टी छातीत रुळनारी पांढरी शुभ्र दाढी, प्रभावी व्यक्तिमत्व, पहाडी आवाज, अमोघ वक्तृत्व ही त्यांची वैशिष्ट्य होती. पुण्यात उच्च शिक्षणासाठी ठेवलेल्या मुलांकरीता भाऊराव स्वयंपाकाचे साहित्य डोक्यावर घेऊन अनवाणी येत असे. स्वत: ते खेड्यापाड्यांत अनवाणी फिरून जातपात न पाहता हुशार अशी मुले शिकायला साताऱ्यात आणत असत. भारत सरकारने २६ जानेवारी १९५९ ला त्यांना ''पद्मभूषण'' ने सन्मानित केले. भाऊराव तेव्हा म्हटले होते. ''मला जनता जनार्दनाने दिलेली 'कर्मवीर' ही पदवी त्याहून श्रेष्ठ आहे'' ते आपल्या नावाखाली 'रयतसेवक' अशी पदवी लावत. शिक्षणाला एक नवी दृष्टी भाऊरावांनी दिली. श्रम करा व शिका, 'स्वावलंबी शिक्षण' हे त्यांच्या शिक्षणकार्यातील नवे तत्त्वज्ञान होते.

पुणे विद्यापीठाने डी. लिट. ही पदवी भाऊराव पाटील यांना गव्हर्नर श्री. प्रकाश यांच्या हस्ते दिली. ही पदवी देण्यासाठी ससून रुग्णालयात कुलगुरू रॅंग्लर परांजपे व विद्यापीठ रजिस्ट्रार गेले होते. भाऊरावांनी अनेक मुले शिक्षणासाठी परदेशात पाठवली होती. परदेशात विद्याविभूषित होऊन आलेले विद्यार्थी परत संस्थेमध्येच काम करु लागले. ९ मे १९५९ रोजी भाऊराव पाटील यांचे निधन झाले. भाऊराव पाटलांनी रयत शिक्षण संस्थेच्या सर्व शाळा व महाविद्यालयांमध्ये 'कमवा व शिका' योजना चालू करून श्रमप्रतिष्ठेचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. स्वावलंबी शिक्षण हा प्रयोग बहुदा देशात पहिलाच असावा. गेल्या १००-१५० वर्षात भाऊराव पाटील यांच्यासारखा लोकोत्तर पुरूष झाला नाही. यशवंतराव चव्हाण बोलतात ''जनता शिक्षणाचा नवा पायंडा पाडून बहुजन समाजात

शिक्षणाने क्रांती घडवून आणणे हे त्यांचे धेय्य होते. सामर्थ्यवान व गुणवत्तेने युक्त अशी माणसे तयार करणे हे यांच्या कार्याचे रहस्य होते. ना. ग. गोरे यांच्या मते ''कर्मवीर महाराष्ट्राला लाभलेले विश्वमित्र होते. शुन्यातून ब्रम्हांड निर्माण करण्याची करामत करून दाखवून भाऊरावांनी महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेवर अनंत उपकार केले आहेत. ह्याच कर्मवीरांच्या महाराष्ट्रात आज शिक्षण क्षेत्राचा बाजार चाललाय असं चित्र दिसतयं. शिक्षणाचा व्यापार करणारे लोक महाराष्ट्रात आलेत. भाऊरावांचा महाराष्ट्र आज खाऊरावांचा झालाय असच सगळीकडे दिसत आहे. आज त्यामुळेच कर्मवीरांबद्दल म्हणावेसे वाटते.

आदर्शच तू लोकनायक धर्मसंस्कृतीचा
अग्रदूत तू समाजपुरूष ज्ञानक्रांतीचा
झोपडीत तू हसत लाविला विद्येचा दीप
बहुजन हसला बहुमनी जळता शतकांचे पाप
विद्येच्या या दीपस्तंभास त्रिवार वंदन.....

●●



## पाखरू

आकाशात झेपावणाऱ्या त्या पाखराप्रमाणं,
मनसोक्त उडायचं राहूनचं गेलं...
जमिनीवर कोसळणाऱ्या त्या पावसाप्रमाणं,
मनसोक्त बरसायचं राहूनचं गेलं...
फुलांभोवती भिरभिरणाऱ्या त्या फुलपाखरांप्रमाणं,
मनसोक्त बागडायचं राहूनचं गेलं...
वसंतात बहरणाऱ्या त्या गुलमोहराप्रमाणं,
मनसोक्त फुलायचं राहूनचं गेलं...
माणसाच्या या दुनियादारीच्या जगात मात्र,
जगायचं राहून गेलं...

**- ढोबळे संतोष**
तृतीय वर्ष, कला

●●



## पिंजरा

ते पिंजऱ्यातलं पाखरू,
पुन्हा एकदा भरारी घेऊ पाहत होते,
विसरून गेलेलं स्वप्न,
पुन्हा एकदा जपू पाहत होते,
आपल्या नाजूक चोचीने ते
तारा तोडण्याचा प्रयत्न करत त्या
पिंजऱ्यातून मुक्त होण्याचे, स्वप्न पाहत होते, पण
तो पिंजरा एवढ्या सहजरित्या तुटणार नव्हता,
कारण माणसाने त्याला ''बंदिस्त'' नावाचे
कुलूप घातले होते...
पण, विरहाची गाणी न गाता त्याला
गगनचुंबी भरारी घ्यायची आस आहे
त्याच्या मनाची शांत झालेली जाग
आज पुन्हा एकदा खवळली आहे,
हरवलेली दिशा आज त्याला गवसली आहे,
तो जगतो त्याच्या स्वप्नांसाठी,
कारण.... कारण तो तुझ्यासारखा
पळवाट काढणारा नाही,
कारण, तो तुझ्यासारखा चार पोपड्या भिंतीआड
लपणारा नाही.
कारण, तो तुझ्यासारखा भ्याड नाही....

**- खिराड निकिता**
तृतीय वर्ष, कला

●●



# अल्बर्ट आइन्स्टाइन : सापेक्षतावाद

**निघोट शुभम**
तृतीय वर्ष, विज्ञान

अल्बर्ट आइन्स्टाइन हे २० व्या शतकातील सर्वात महान वैज्ञानिकांपैकी एक होते. त्यांच्या सापेक्षतावादाच्या सिद्धांताने भौतिकशास्त्राचे नियम पूर्णतः बदलले, तसेच जगाला विश्वाच्या गूढतेचे नव्या दृष्टीकोनातून दर्शन घडवले. आइन्स्टाइनच्या योगदानामुळे आधुनिक विज्ञानाची प्रगती अतिशय मोठ्या प्रमाणात झाली.

**प्रारंभिक जीवन**

अल्बर्ट आइन्स्टाइन यांचा जन्म १४ मार्च १८७९ रोजी जर्मनीच्या उल्म शहरात झाला. त्यांचे बालपण म्युनिकमध्ये गेले. त्यांचे वडील हर्मन आइन्स्टाइन हे एक इलेक्ट्रिकल इंजिनिअर होते, तर त्यांची आई पॉलीन आइन्स्टाइन ह्या संगीतप्रेमी होत्या. बालपणी आइन्स्टाइन शांत स्वभावाचे होते आणि अभ्यासात फारशी गती नव्हती. त्यांना बोलायला शिकायलाही इतर मुलांपेक्षा अधिक वेळ लागला होता. यामुळे काहींनी त्यांना मंदबुद्धी म्हणून हिणवले होते. आइन्स्टाइन यांना शालेय शिक्षणामध्ये फारसा रस नव्हता, मात्र गणित आणि विज्ञान या विषयांत त्यांना विशेष आवड होती. वयाच्या १२व्या वर्षी त्यांनी स्वतः गणिताचे आणि इयुक्लिडच्या भूमितीचे सखोल अध्ययन केले.

**शैक्षणिक आणि व्यावसायिक जीवन**

आइन्स्टाइन यांनी १८९६ साली झुरीख येथील स्विस फेडरल पॉलिटेक्निक स्कूलमध्ये प्रवेश घेतला, जिथे त्यांनी भौतिकशास्त्र आणि गणित यांचा अभ्यास केला. शिक्षणानंतर, सुरुवातीला त्यांना स्थिर नोकरी मिळाली नाही. काही वर्षांनंतर ते स्विस पेंट ऑफिसमध्ये क्लर्क म्हणून काम करू लागले. त्यावेळी त्यांनी भौतिकशास्त्रातील मूलभूत प्रश्नांवर विचार करून संशोधन सुरू केले.

**सापेक्षतावादाचा सिद्धांत**

१९०५ हे वर्ष आइन्स्टाइनचे चमत्कार वर्ष म्हणून ओळखले जाते, कारण त्यावेळी त्यांनी ४ महत्त्वाचे शोधनिबंध प्रकाशित केले. यातील सर्वात प्रसिद्ध म्हणजे विशेष सापेक्षतावादाचा सिद्धांत या सिद्धांताने पदार्थ आणि ऊर्जा यांच्यातील संबंध दर्शवणारे $E = mc^2$ हे समीकरण दिले, ज्यामुळे वस्तुमान आणि ऊर्जा यांच्यातील बदल लक्षात येऊ शकला. या समीकरणामुळे अणू ऊर्जेचा शोध लागला, ज्याचा उपयोग नंतर अणुबॉम्ब तयार करण्यात झाला.

१९१५ साली आइन्स्टाइन यांनी सामान्य सापेक्षतावादाचा सिद्धांत मांडला, ज्यामध्ये त्यांनी गुरुत्वाकर्षणाची नवी व्याख्या दिली. यामध्ये सांगितले की, गुरुत्वाकर्षण हे वस्तूंच्या वस्तुमानामुळे अवकाश आणि वेळेच्या वाकण्यामुळे निर्माण होते. या सिद्धांतामुळे काळ आणि अवकाश यांचा परस्पर संबंध मांडला गेला आणि विश्वाच्या रहस्यमय हालचाली समजण्यास मदत झाली.

**नोबेल पारितोषिक**

आइन्स्टाइन यांना १९२१ साली नोबेल पारितोषिक मिळाले, मात्र ते सापेक्षतावादासाठी नव्हते, तर फोटोइलेक्ट्रिक इफेक्टच्या संशोधनासाठी होते. या संशोधनाने क्वांटम यांत्रिकीच्या पायाभूत तत्त्वांवर प्रकाश टाकला. त्यांनी शोधले की प्रकाश एक ऊर्जा रूप आहे, जो लहान लहरी किंवा फोटॉन्सच्या स्वरूपात असतो. याचा उपयोग नंतर अनेक तंत्रज्ञानांमध्ये झाला, जसे की सौर ऊर्जा, टीव्ही, आणि कॅमेराचे सेन्सर.

**जर्मनीतून पलायन**

१९३३ मध्ये, जर्मनीत हिटलरने सत्ता घेतल्यानंतर आइन्स्टाइन यांना नाझी सरकारच्या धोरणांमुळे जर्मनी सोडावे लागले. आइन्स्टाइन हे ज्यू धर्मीय होते, आणि नाझी सत्ताधीशांनी त्यांना धोका दिला होता. त्यामुळे ते अमेरिकेला गेले आणि प्रिन्स्टन युनिव्हर्सिटीमध्ये काम करू लागले. तेथे त्यांनी आपले संशोधन चालू ठेवले.

**शेवटचे वर्ष**

आइन्स्टाइन यांनी आयुष्यभर शांतता, विज्ञान आणि मानवतेसाठी काम केले. दुसऱ्या महायुद्धात त्यांनी अणुबॉम्बसाठी मार्गदर्शन करणारे पत्र अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना लिहिले, मात्र युद्धानंतर त्यांनी अण्वस्त्रांच्या वापराचा विरोध केला. ते एक शांततेचे पुरस्कर्ते होते आणि वैज्ञानिक तत्त्वज्ञानावर आधारित जगाची बांधणी व्हावी, असे त्यांचे मत होते. अल्बर्ट आइन्स्टाइन यांचे १८ एप्रिल १९५५ रोजी निधन झाले. त्यांच्या बुद्धिमत्तेचा आणि वैज्ञानिक योगदानाचा जागतिक स्तरावर आजही आदर केला जातो. अल्बर्ट आइन्स्टाइन हे केवळ एक महान वैज्ञानिक नव्हते, तर ते एक मानवतावादी आणि शांततेचे पुरस्कर्ते होते. त्यांचे विचार आणि संशोधनांनी केवळ विज्ञानच नव्हे, तर जगाच्या दृष्टीकोनातही आमूलाग्र बदल घडवला. आइन्स्टाइन यांची कामगिरी विज्ञानाच्या इतिहासात एक अनमोल ठेवा म्हणून कायम राहील.

**सापेक्षतावाद ते क्वांटम संगणक**

भौतिकशास्त्र हा विज्ञानाचा असा एक शाखा आहे, ज्यामुळे मानवजातीला निसर्गातील अनेक गूढ गोष्टी समजून घेता आल्या. अल्बर्ट आइन्स्टाइनच्या सापेक्षतावादाच्या सिद्धांतापासून ते सध्या होत असलेल्या क्वांटम संगणकांच्या शोधांपर्यंत भौतिकशास्त्राने अनेक नवे शोध लावले आहेत, ज्यांनी विज्ञानाच्या दुनियेचे नियम बदलून टाकले. या लेखात आपण या शोधांचा आढावा घेऊ.

**१. सापेक्षतावादाचा सिद्धांत** : १९०५ साली अल्बर्ट आइन्स्टाइनने सापेक्षतावादाचा विशेष सिद्धांत मांडला, ज्यामध्ये $E = mc^2$ हे समीकरण प्रसिद्ध झाले. याचा अर्थ ऊर्जा (E) आणि वस्तुमान (m) यांचे संबंध दर्शवला जातो. विशेष सापेक्षतावादाने सांगितले की प्रकाशाचा वेग स्थिर असतो आणि कोणताही पदार्थ प्रकाशाच्या वेगापेक्षा जास्त वेगाने प्रवास करू शकत नाही. यानंतर आइन्स्टाइनने १९१५ साली सामान्य सापेक्षतावाद मांडला, ज्याने गुरुत्वाकर्षणाची नवी संकल्पना दिली. या सिद्धांतानुसार गुरुत्वाकर्षण हे एका वस्तुमानामुळे वेळ आणि अवकाशातील वाकण्याचे परिणाम आहे. यामुळे आपण मोठ्या वस्तुमानाच्या जवळ जाऊन कसे वाकलेले अवकाश-वेळ पाहतो, हे स्पष्ट झाले. या सिद्धांताचा उपयोग आपण आज उपग्रहांमध्ये, जीपीएस तंत्रज्ञानात, आणि ताऱ्यांच्या हालचाली समजून घेण्यासाठी करतो.

**२. क्वांटम सिद्धांत**

२०व्या शतकाच्या सुरुवातीला क्वांटम यांत्रिकीने विज्ञानाचे दृष्टीकोन बदलले. मॅक्स प्लांक आणि नील्स बोअर यांनी मांडलेला क्वांटम सिद्धांत सांगतो की अणूंमध्ये ऊर्जा अनियंत्रितरित्या सतत मिळत नाही, तर ती क्वांटम नावाच्या लहान युनिट्समध्ये मिळते. हे ज्ञान आण्विक पातळीवर घडणाऱ्या प्रक्रियांसाठी महत्त्वपूर्ण ठरले. उदा. इलेक्ट्रॉन्स विशिष्ट ऊर्जा पातळ्यांवरच असू शकतात, यामुळे आण्विक

बांधणीचा अभ्यास करणे सोपे झाले.

**३. ब्लॅक होल्सचे संशोधन आणि गुरुत्वीय लहरी**

आइन्स्टाइनच्या सामान्य सापेक्षतावादाच्या सिद्धांतानुसार, अतिशय मोठ्या वस्तुमानाच्या वस्तू अवकाश-वेळेचे विकृतीकरण करतात. या सिद्धांतामुळे ब्लॅक होल्सची (काळे विवर) संकल्पना पुढे आली. आज ब्लॅक होल्सच्या संशोधनामुळे ताऱ्यांचे जीवनचक्र आणि विश्वातील गूढ गोष्टी उलगडण्यास मदत होत आहे. २०१५ साली वैज्ञानिकांनी गुरुत्वीय लहरी शोधल्या, ज्यांची भविष्यवाणी आइन्स्टाइनने केली होती. या लहरी मोठ्या वस्तुमानाच्या वस्तूंच्या हालचालीमुळे निर्माण होतात आणि त्या अवकाश-वेळेमध्ये तरंग निर्माण करतात. हे संशोधन खगोलशास्त्राच्या दृष्टीने क्रांतिकारक मानले जाते.

**४. हिग्ज बोसॉन कणाचा शोध**

२०१२ साली उएठ्ठ या प्रयोगशाळेत हिग्ज बोसॉन नावाचा कण शोधला गेला, ज्याला गॉड पार्टिकल म्हणूनही ओळखले जाते. हिग्ज क्षेत्राच्या परस्परांमुळे कणांना वस्तुमान मिळते, अशी हिग्ज बोसॉन सिद्धांताची मांडणी होती. या शोधाने अणूंच्या बांधणी आणि वस्तुमानाच्या निर्मितीच्या प्रक्रियेबद्दल महत्त्वाचे ज्ञान दिले.

**५. क्वांटम संगणक**

क्वांटम संगणक हे आधुनिक विज्ञानातील एक अतिशय प्रगत तंत्रज्ञान आहे, जे भविष्याचा वेध घेते. पारंपारिक संगणकांमध्ये बिट्स वापरले जातात, ज्यांना फक्त दोन स्थिती असतात (० किंवा १). मात्र, क्वांटम संगणकांमध्ये क्विबिट्स असतात, ज्यांना एकाच वेळी ० आणि १ दोन्ही स्थितींमध्ये असण्याची क्षमता असते. हे तंत्रज्ञान क्लासिकल संगणकांच्या तुलनेत कितीतरी पटींनी जास्त जलद आणि सक्षम आहे. क्वांटम संगणकाचा वापर क्रिप्टोग्राफी, औषधनिर्मिती, हवामान अंदाज, आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या क्षेत्रात होण्याची शक्यता आहे. यामुळे वैज्ञानिक आणि तंत्रज्ञांच्या अपेक्षेप्रमाणे, भविष्यात या संगणकांनी अनेक समस्यांचे नवे उत्तर शोधले जाऊ शकते.

अल्बर्ट आइन्स्टाइनच्या सापेक्षतावादाच्या सिद्धांतापासून ते क्वांटम संगणकांच्या विकासापर्यंत, भौतिकशास्त्राच्या आधुनिक शोधांनी मानवजातीला अनेक नवी दृष्टी दिली आहे. या शोधांनी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील अनेक मर्यादा मोडीत काढून, आपल्याला निसर्गाच्या गूढ गोष्टी समजून घेण्याची संधी दिली आहे. तसेच, या शोधांचा उपयोग मानवजातीच्या विकासासाठी आणि भौतिक समस्यांचे उत्तर शोधण्यासाठी नक्कीच महत्त्वाचा ठरतो आहे.

●●

**विज्ञानाची गाथा**

तारांगणातील प्रकाशाचा खेळ,
ग्रहांचा निनाद, आणि नभींची वेळ,
विज्ञान सांगतं विश्वाचं गाणं,
प्रकृतीचं अद्भुत, अपार आहे ज्ञान।
अणूचे नर्तन, कणांचा संवाद,
क्वांटमच्या दुनियेत सापेक्षतेचा वाद,
गूढातलं गूढ उलगडतं विज्ञान,
निसर्गाचं तंत्र, मानवी संधान।
प्रकाशाचा वेग आणि काळाचा प्रवाह,
गुरुत्वाकर्षणाच्या रहस्यांचं दर्शन घडवणारा साक्षात्कार,
जनुकांमध्ये दडलेली आयुष्याची चावी,
विज्ञानाने दिली मानवी जात नवीन नवी।
शोधतो आपण तारकांचं तंत्र,
डोकावतो काळाच्या अनंतात अंतर,
प्रकृतीची ही लपलेली कथा,
विज्ञानाने उघडली जिवंत यशगाथा।
प्रगतीचा मार्ग, नवे शोध, नवा प्रकाश,
विज्ञान देतं ज्ञानाचं अमर उपहास,
मानवाच्या बळाने निर्माण झालं विज्ञान,
तसेच असेल आपल्या भविष्याचं संधान!

**- ठोसर प्रांजल**

एम. ए. एस्सी, रसायनशास्त्र

●●



# जीवशास्त्रातील नवीन संशोधन: माणसाचे जीनोम प्रकल्प

**बैरागी रोहित**

द्वितीय वर्ष एम. एस्सी, वनस्पती विज्ञान

जीनोम म्हणजे एखाद्या सजीवाच्या सर्व अनुवांशिक माहितीचे संकलन. मानवाच्या शरीरातल्या प्रत्येक पेशीत जी अनुवांशिक माहिती असते, ती जीनोमद्वारे व्यक्त होते. २१व्या शतकातील वैज्ञानिक प्रगतीमध्ये मानव जीनोम प्रकल्प (Human Genome Project) हे एक क्रांतिकारी पाऊल ठरले आहे. हा प्रकल्प १९९० मध्ये सुरू झाला आणि २००३ मध्ये पूर्ण झाला. यामध्ये मानवाच्या जीनोमचे संपूर्ण नकाशांकन करण्यात आले, ज्यामुळे आजवर अनेक महत्त्वाचे शोध आणि नवी वैद्यकीय साधनं तयार झाली आहेत.

**माणसाचे जीनोम प्रकल्प म्हणजे काय?**

मानवाच्या जीनोममध्ये सुमारे ३ अब्ज DNA बेस पेअर (A, T, C, G) असतात. हे बेस पेअर एकत्रितपणे आपले सर्व अनुवांशिक गुणधर्म ठरवतात. मानव जीनोम प्रकल्प म्हणजे या बेस पेअरचे संपूर्ण मॅपिंग करणे, म्हणजेच आपल्यातील प्रत्येक गुणधर्म कशामुळे आणि कशा पद्धतीने निर्माण होतो, हे समजून घेणे. या प्रकल्पाचा उद्देश होता मानवाच्या जीनोममधील सर्व जनुकांची ओळख पटवणे आणि त्यांचे कार्य समजून घेणे. या प्रकल्पामुळे मानवाच्या अनुवंशिक रचनेचे मूलभूत तत्त्व स्पष्ट झाले, ज्यामुळे अनेक आरोग्यविषयक समस्यांच्या मुळाशी जाऊन उपाय शोधणे शक्य झाले आहे. मानव जीनोम मॅपिंगमुळे लागलेले नवे आरोग्यविषयक शोध.

**प्रकल्पाचा उद्देश** : मानव जीनोम प्रकल्पाचे काही प्रमुख उद्देश खालीलप्रमाणे.

**संपूर्ण जीनोम मॅपिंग करणे** : मानवाच्या सर्व जनुकांची ओळख पटवणे आणि त्यांचे स्थान व कार्य समजून घेणे.

**अनुवांशिक विकारांचा अभ्यास** : वांशिक आजारांचा अभ्यास करून, त्यांचे कारण असणारे जनुक ओळखणे. उदाहरणार्थ, सिस्टिक फायब्रोसिस, हंटिंग्टन रोग, आणि अल्झायमर यांसारखे वांशिक विकार.

**व्यक्तिकृत औषधोपचार विकसित करणे** : प्रत्येक व्यक्तीचे जीनोम वेगळे असते, त्यामुळे औषधांचे परिणामही व्यक्तिनिहाय वेगवेगळे असतात. जीनोम मॅपिंगच्या मदतीने वैयक्तिक औषधनिर्मिती शक्य होईल, ज्यामुळे रुग्णांसाठी अधिक प्रभावी उपचार करता येतील.

**मानवाच्या उत्क्रांतीचा अभ्यास :** मानवाच्या उत्क्रांतीचा अभ्यास करून, त्यातील अनुवांशिक बदल ओळखणे.

**व्यक्तिकृत औषधनिर्मिती** : जीनोम मॅपिंगमुळे प्रत्येक व्यक्तीचे अनुवांशिक गुणधर्म वेगळे असतात हे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीच्या जीनोममध्ये असलेल्या फरकांनुसार औषधोपचार कसे दिले जावेत, हे ठरवणे शक्य झाले आहे. काही रुग्णांमध्ये विशिष्ट औषधे अधिक प्रभावी असू शकतात, तर काहींमध्ये त्यांचे दुष्परिणाम होऊ शकतात. व्यक्तिकृत औषधोपचाराच्या मदतीने रुग्णाच्या अनुवांशिक माहितीच्या आधारावर योग्य औषधनिर्मिती केली जाते.

**वांशिक आजार ओळखणे आणि उपचार करणे**

काही आजार वांशिक असतात, म्हणजेच ते जनुकांद्वारे पुढच्या पिढीकडे जातात. जीनोम मॅपिंगमुळे सिस्टिक फायब्रोसिस, हंटिंग्टन रोग, आणि ब्रॅका जनुकांमुळे होणारा स्तनाचा कर्करोग यांसारखे वांशिक आजार ओळखणे सोपे झाले आहे. ही माहिती मिळाल्यामुळे आता योग्य वेळी उपचार सुरू करता येतात.

**कर्करोग संशोधन :** कर्करोग हा अनुवांशिक बदलांमुळे होणारा आजार आहे. जीनोम प्रकल्पाच्या मदतीने कर्करोगाच्या जनुकांचा सखोल अभ्यास होऊन टार्गेटेड थेरपीज विकसित केल्या गेल्या आहेत. हे उपचार थेट कर्करोगाच्या पेशींवर लक्ष केंद्रित करतात, ज्यामुळे आजाराची तीव्रता कमी होते.

**नवीन जनुकांचे शोध** : जीनोम मॅपिंगमुळे हजारो नव्या जनुकांचा शोध लागला आहे, ज्यांचे कार्य मानवाला पूर्वी माहिती नव्हते. या जनुकांचे कार्य समजल्यामुळे जीवनाच्या विविध पैलूंचा अभ्यास करता येतो. उदाहरणार्थ, मेंदूच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या काही जनुकांचे संशोधन चालू आहे, ज्यामुळे न्यूरोलॉजिकल समस्यांचा (उदा. अल्झायमर किंवा ऑटिझम) अभ्यास करता येईल.

**आनुवंशिक जोखमींचे विश्लेषण** : जीनोम मॅपिंगमुळे आता प्रत्येक व्यक्तीच्या जीवनशैलीनुसार किंवा वांशिक इतिहासानुसार कोणत्या आजारांचा धोका अधिक आहे, हे ओळखता येते. उदाहरणार्थ, मधुमेह, हृदयविकार, आणि उच्च रक्तदाबासारख्या आजारांचा पूर्वीच अंदाज घेता येतो. यामुळे रोग प्रतिबंधक उपाययोजना वेळेत करता येतात.

**भविष्यातील संभाव्यता**

**आनुवंशिक संपादन** : जीनोम मॅपिंगच्या माध्यमातून आपल्याला कोणते जनुक कोणत्या आजाराशी संबंधित आहे, हे कळल्यामुळे CRISPR सारख्या तंत्रज्ञानाच्या मदतीने जनुकांमध्ये बदल करता येऊ शकतात. भविष्यात हे तंत्रज्ञान वांशिक आजारांवर उपचार करण्यासाठी वापरले जाईल, जे अनुवांशिक दोष कायमचे काढून टाकण्यास मदत करेल.

**अवयव निर्माण** : जीनोम संशोधनामुळे स्टेम सेल तंत्रज्ञानामध्ये मोठी क्रांती झाली आहे. भविष्यात स्टेम सेल्सपासून मानवी अवयव तयार करण्याच्या दिशेने संशोधन सुरू आहे. हे अवयव नैसर्गिक अवयवांच्या प्रमाणेच काम करू शकतात, ज्यामुळे अवयव प्रत्यारोपणाची समस्या सोडवता येईल.

**मानवी उत्क्रांतीचा अभ्यास** : जीनोम प्रकल्पाच्या मदतीने मानवाच्या उत्क्रांतीचा सखोल अभ्यास करता येईल. कोणत्या जनुकांमुळे मानवाचा विकास कसा झाला आणि त्याची जैविक वैशिष्ट्ये कशी निर्माण झाली, हे समजून घेता येईल. यामुळे मानवाच्या भूतकाळातील अनुवांशिक इतिहासाचेही अध्ययन करता येईल.

**विकसनशील देशांमधील आरोग्य सुधारणा :** जीनोम संशोधनाचे परिणाम आता विकसित देशांपर्यंतच मर्यादित राहिलेले नाहीत. विकसनशील देशांमधील वांशिक आजार आणि संसर्गजन्य रोगांचा सामना करण्यासाठी जीनोम संशोधनाचा उपयोग होईल. यामुळे जागतिक स्तरावर आरोग्य सुधारण्यासाठी एक नवी दिशा मिळेल.

मानव जीनोम प्रकल्प हा जीवशास्त्राच्या इतिहासातील एक क्रांतिकारी टप्पा आहे. या प्रकल्पामुळे माणसाच्या अनुवांशिक माहितीचा सखोल अभ्यास करता येतो आणि अनेक आजारांच्या उपचारांमध्ये नवीन साधने उपलब्ध झाली आहेत. या प्रकल्पाच्या मदतीने वैद्यकीय तंत्रज्ञानातील पुढील प्रगती आणि औषधोपचारांची क्रांती साधली जाऊ शकते. भविष्यात मानवाच्या आरोग्यविषयक समस्यांवर प्रभावी उपाय सापडण्यास मदत होईल, तसेच मानवजातीचा विकासही अधिक वैज्ञानिक दृष्टिकोनातून

साधता येईल.

**प्रमुख वैज्ञानिक व संस्थांचा सहभाग**

**जेम्स वॅटसन** : जेम्स वॅटसन हे DNA चे द्विगुणित हेलिक्स संरचनेचे सह-शोधकर्ते होते आणि त्यांनी सुरुवातीच्या काळात मानव जीनोम प्रकल्पाचे नेतृत्व केले. १९८८ मध्ये वॅटसन यांना राष्ट्रीय आरोग्य संस्था अंतर्गत मानव जीनोम प्रकल्पाचे पहिले संचालक बनवण्यात आले.

**फ्रान्सिस कॉलिन्स** : जेम्स वॅटसन यांच्या नंतर, फ्रान्सिस कॉलिन्स यांनी मानव जीनोम प्रकल्पाचे नेतृत्व केले. कॉलिन्स हे एक नामवंत आनुवंशशास्त्रज्ञ असून त्यांनी जीनोम प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी मोठे योगदान दिले. कॉलिन्स यांनी जीनोम मॅपिंगच्या संशोधनाला पुढे नेले आणि त्या आधारावर आज वैयक्तिक औषधोपचार विकसित करण्यात आले आहेत.

**क्रेग व्हेंटर** : क्रेग व्हेंटर हे आणखी एक महत्त्वाचे नाव आहे. त्यांनी जीनोम मॅपिंगमध्ये सेलेरा जीनोमिक्स या खासगी संस्थेच्या माध्यमातून स्वतंत्र पद्धतीने जीनोम अनुक्रमणाचे कार्य केले. त्यांनी शॉटगन अनुक्रमण पद्धतीचा वापर करून, कमी वेळात जीनोम अनुक्रमणाचे कार्य पूर्ण केले. व्हेंटर यांचा या प्रकल्पात खूप महत्त्वाचा वाटा आहे.

**एरिक लँडर** : एरिक लँडर हे ब्रॉड इन्स्टिटट्यूट चे सह-संस्थापक आहेत आणि मानव जीनोम प्रकल्पात त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांनी जीनोम मॅपिंगच्या डेटाची गणिती आणि सांख्यिकी पद्धतीने विश्लेषण करण्याचे काम केले.

**संशोधन संस्थांमध्ये सहभाग:** हा प्रकल्प विविध आंतरराष्ट्रीय संस्था आणि शास्त्रज्ञांच्या सहभागाने यशस्वी झाला. प्रमुख संस्था खालीलप्रमाणे आहेत. **यूएस नॅशनल ह्यूमन जीनोम रिसर्च इन्स्टिटट्यूट** : अमेरिकेतील या संस्थेने या प्रकल्पात महत्त्वाची भूमिका बजावली. **सेलेरा जीनोमिक्स** : क्रेग व्हेंटर यांची खासगी संस्था, ज्यांनी जीनोम अनुक्रमणात तंत्रज्ञान आधारित मोठे योगदान दिले. **ब्रॉड इन्स्टिटट्यूट** : जीनोम संशोधनात महत्त्वाची भूमिका बजावणारी संस्था. **युनायटेड किंगडमचे वेलकम ट्रस्ट सेंटर** : या संस्थेनेही प्रकल्पात मोठा सहभाग घेतला.

**सहभागी देश** : मानव जीनोम प्रकल्प आंतरराष्ट्रीय होता, आणि खालील देशांनी यामध्ये सहभाग घेतला. अमेरिका, युनायटेड किंगडम, फ्रान्स, जपान, चीन, जर्मनी.

**शास्त्रज्ञांचे कार्यक्षेत्र** : या प्रकल्पात वेगवेगळ्या प्रकारचे शास्त्रज्ञ सहभागी होते. जीवशास्त्रज्ञ : जीनोमचे मॅपिंग आणि जनुकांचे कार्य समजून घेणारे तज्ञ. अनुवंशशास्त्रज्ञ : जीनोममधील अनुवांशिक घटकांचे विश्लेषण करणारे शास्त्रज्ञ. बायोइन्फॉर्मेटिक्स तज्ञ : मोठ्या प्रमाणात जीनोम डेटाचे संगणकीय विश्लेषण करणारे तज्ञ. रसायनशास्त्रज्ञ : DNA आणि जनुकांच्या रासायनिक घटकांचे परीक्षण करणारे तज्ञ. संगणकशास्त्रज्ञ : जीनोम डेटाचे अनुक्रमण आणि विश्लेषण करण्यासाठी संगणकीय तंत्रज्ञान तयार करणारे.

मानव जीनोम प्रकल्प हे एक महाकाय संशोधन कार्य होते, ज्यामध्ये विविध शास्त्रज्ञ आणि संस्था सहभागी होऊन अनुवांशिक माहितीचे सखोल ज्ञान मिळवण्यात यश आले. यामुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठी क्रांती घडली आणि आजही या प्रकल्पाच्या आधारावर अनेक नवी शोध आणि उपचारपद्धती विकसित होत आहेत.

●●



# ‘युवकांच्या अर्थपूर्ण जीवनाचा शोध’ अमृत बंग स्पर्धा परीक्षा विशेष व्याख्यान



पाहुण्यांचे प्राचार्यांसमवेत हितगूज



प्रमुख व्याख्याते अमृत बंग यांचे स्वागत



प्रास्ताविक करताना प्राचार्य



मार्गदर्शन करताना व्याख्याते अमृत बंग



डॉ. गणेश वाघ प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख



व्याख्यान प्रसंगी विशेष चर्चा

## रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन मा. चंद्रकांत दळवी यांची महाविद्यालयास भेट



पाहुण्यांचे स्वागत करताना प्रा. डॉ. हेमांगी गावीत



मा. दिलीप रावजी वळसे पाटील यांच्या स्वागत प्रसंगी



मा. चंद्रकांत दळवी यांचे स्वागत करताना प्राचार्य



मा. दिलीपरावजी वळसे यांच्यासोबत आगमन



मा. दळवी साहेब मार्गदर्शन करताना



शिक्षकांच्या सहविचार सभेत मार्गदर्शन करताना मान्यवर

# आंतरराष्ट्रीय चर्चासत्र 'Exploring Innovation in life Science' दि. २३ मार्च २०२४



शहीद दिनाचे प्रतिमापूजन करताना मान्यवर



सूत्रसंचालन करताना डॉ. हेमांगी गावीत



कर्मवीर प्रतिमेजवळ प्रमुख पाहुण्यांचे स्वागत



प्राचार्य डॉ. एस. पी. पाटील यांचे स्वागत




प्रमुख व्याख्यात्यांसोबत चर्चा



व्याख्याते डॉ. के. एन. धुमाळ

## इतिहास विभाग आयोजित शिवजयंतीनिमित्त प्रदर्शन दि. २७ फेब्रुवारी २०२३



प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना प्राचार्य



शिवकालीन हत्यारे आणि वास्तूंचे प्रदर्शन




जंजिरा किल्ल्याची प्रतिकृती



शिवकालीन हत्यारे आणि वस्तूंचे प्रदर्शन



प्रतापगडाच्या प्रतिकृतीजवळ मान्यवर

## महाविद्यालय नॅक कमिटीची भेट



नॅक कमिटीचे आगमन



कर्मवीर प्रतिमेजवळ पाहुण्यांची भेट



स्वागत करणारे ढोल पथक



भित्तिपत्रकाचे उद्‍घाटन करताना मान्यवर



नॅक कमिटीचे स्वागत प्र. प्राचार्य डॉ. बी. पी. गार्डी



नॅक कमिटी सदस्यांची विद्यार्थ्यांशी वार्तालाप

# नॅक कमिटीसमोर सांस्कृतिक कार्यक्रम




आधुनिक महिलांची नृत्यातून आदिरूपे




नॅक पिअर टीम कमिटी भेट अहवाल देताना कुलगुरु अविनाश तिवारी, जीवाजी विद्यापीठ ग्वाल्हेर




समूह नृत्य करताना विद्यार्थी




नॅक कमिटी चेअरमन प्राध्यापक वर्गाशी संवाद साधताना



समूह नृत्य सादर करताना



नॅक कमिटीचे सोबत कॉलेज स्टाफ

## AAA मूल्यांकन समिती भेट



AAA मूल्यांकन प्रसंगी



प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांचे स्वागत



प्राचार्य डॉ. एल. डी. भोर यांचे स्वागत



AAA मूल्यांकन अहवाल सुपूर्द करताना मूल्यांकन समिती



AAA समितीचे राष्ट्रीय छात्रसैनिकाकडून स्वागत



मार्गदर्शन प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर

## १ मे (कामगार दिन)



कामगार दिनाचे ध्वजवंदन मा. प्राचार्य व इतर



ध्वजाला सलामी देताना शिक्षक वर्ग



'महाराष्ट्र गीत' सादर करणारा गायनवृंद

## माजी विद्यार्थी सहविचार मेळावा



मा. उदय पाटील यांचे स्वागत करताना मा. मधुकर वाघ



मनोगत व्यक्त करताना ज्येष्ठ माजी विद्यार्थी



माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष मा. मधुकर वाघ मनोगत व्यक्त करताना

# English Section

Dr. G. C. Wagh




"Education is the passport to the future, for tomorrow belongs to those who prepare for it today."

– Malcolm X

# अनुक्रमणिका


- **Commerce And Recent World**/Sanskruti Gode/103
- **Digital Marketing An Important Concept**/ Pokharkar Siddhi /104
- **A Book Review of Rama Mehta's "Inside the Haveli"**/Ragini Shete /105
- **K. G. F. : 2 A Film Review**/Shaikh Najiya Khajabhai /108
- **Career Opportunities for B.A./M.A. English** /Thorat Avishkar Devram /109
- **Biography of R. K. Narayan** /Bhose Neelakshi Somendra /111
- **First Step**/ Hule Amit Pandharinath /112
- **Rural Life and Urban life**/Bokad Pradip Shankar/113
- **My Favourite Place**/Maskare Priya/114
- **A Tale of Two Cities : By Charles Dickens**/ Gawade Poonam Sandeep /115
- **Titanic**/Bokad Pradip Shankar/117
- **Dashain : Festival of Nepal**/Indore Divya/118
- **Book Review of "Wings of Fire : An Autobiography of Abdul Kalam"**/Pooja Wavhal/119
- **Artificial Intelligence: Transforming the Future**/Sadhana Kewale/121
- **Yuval Noah Harari and Book**/Farin Shaikh/124
- **Flower Power**/Avishkar Thorat/128
- **The Impact of Social Media on Modern Communication**/Manish Bhalerao/129






# Commerce And Recent World

**Sanskruti Gode**

**FYBCOM (English)**

Today's world is characterized by a constantly changing and evolving landscape where commerce plays a vital role in shaping the global econimy, society and culture. The term "commerce" encompasses a wide range of activities related to the exchange of goods and services, as well as the complex network of financial transactions that drive economic growth and development. The significance of commerce in the contemporary world is multifaceted and extends far beyond the traditional nations of buying and selling. It permeates every aspect of our daily lives, influencing not only the way we conduct business but also shaping societies, connecting nations, and driving technological advancements. As we developing into the exploration of the significance of commerce in today's world, several key aspects come to the forefront.

Firtly, commerce serves as the engine of global economic growth. In an era of interconnected markets, the exchange of goods and services on a global scale has become more seamless than ever. International trade has not only facilitated the flow of products across borders, and technologies. The intricate web of supply chains and global markets underscores the interdependence of nationa, making commerce a driving force behind economic prosperity.

secondly, the advent of 3-commerce and digital technologies has revolutionized the way business is conducted. Online platforms and digital transsactions have broken down traditional barriers, providing businesses unprecedented opportunities to reach a global audience. The ease of accessibility and the speed of transactions have transformed consumer behaviour in an era of convenience and efficiency.

Moreover, commerce plays a crucial role in shaping social and cultural landscapes. the products we consume, the branda we choose

and the trends we follow are all influenced by the dynamice of commerce. Bisinesses not only respond to societal needs but also contribute to the formation of cultural identities. The impact of commerce extends beyond economic metrics, influencing the way people live, work and interact with one another. Exploring the significance of commerce in today's world reveals a complex and interconnected system that goes beyond simple transactions commerce is a force that drives economic development, fosters global connections, and shapes the way we live. understanding the multifaceted nature of commerce is essential for navigating the challenges and opportunities in and ever-evolving global landscape.

●●




## Digital Marketing An Important Concept

Have you ever wondered how technology is shaping our future? In a world where technology innovation unfolds of an unprecendented speed, it is more important than ever to understand these change. To make our future interesting & bright technology is providing different oppurtunities & one of the important opputunities is Digital MarkeTing. You all may have heard about the word marketing. Marketing is nothing but connecting with audience in the right place & at the right time.

**Traditional Marketing V/S Digital Marketing**

Do you Know? There are two types of marketing Traditional Marketing & Digital Marketing. Traditional Marketing is nothing but use of tangible items such as business cards. Prints ads in news paper or magazines & posters commercials on TV & radio Billboards & brochures where as Digital Marketing is use of intangible items such as websites, social media mentions. youtube videos & banner ads. Digital Marketing is similar to traditional advertising but digital marketing is done using digital devices such as tablet smarthphone, laptop, computer, etc.

**Pros & Cons of Digital Marketing**

**Pros :**

1) Gets Instant feedback.
2) Cost - Effectiveness
3) No Limitation of geographical area
4) Cost Saving
5) Improves Market Analysis

**Cons :**

1) Missing Human Touch
2) No Face to face interaction
3) High Competition
4) Time Consuming
5) Takes Time to understand work

The purpose of the above article was to make teenagers understand the importanca of digital Marketing, Difference between Traditional and Digital Marketing and the most important pros (Advantage Merits) & Cons (Disadvantages Demerits) of Digital Marketing.

**Pokharkar Siddhi**

F. Y. B Com, English

●●






# A Book Review of Rama Mehta's "Inside the Haveli"

**Ragini Shete**

M.A. I (English)

There are several Indian novels who have touched the aspect and revealed the truth that how Indian women are treated by the male society. They present feminist philosophy with authentic nature with reference to literary works. The struggle and quest for self identity of an Indian woman is mostly presented by the most of the woman writers. There are many novels which deal with the subject matter in relation to feminism. Rama Mehta's "Inside the Haveli, Geeta Hari's "Thousand faces of Night. Nayantara Sehgal's "Rich like us are some of the novels which deal with the theme of feminism and the current status of woman in the Indian society. Feminism in the Indian context is a by product of the Western liberalism in general and feminist thought in particular In literary terms feminism is a search for identity and a quest for the definition of the self In critical practice, it puts down emphatically the plight of women characters at the crucial level.

The term feminism throws light upon the most important aspect of literary movement as a theory for the analysis of the literary texts written by women writers in particular. Feminism does not merely talk about the equality and the rights of woman but it is mostly about the respect and understanding from the male dominated society. The main cause for the struggle of woman is for her sell identity and injustice in regard with superior attitude shown by men in all spheres. French theorist Helen Cixous, in her essay" The Laugh of Medusa" clearly mentions this "It is impossible to define a feminine practice of writing, and this is an impossibility which will remain, for this practice can never be theorized. enclosed. coded... it will always surpass the discourse that regulates the phallocentric (male-dominated) system, it does and will take place in arcas other than those subordinated to philosophico-theoritical domination. It will be conceived by subjects who

are breakers of automatism, by peripheral figures that no authority can ever subjugate" This piece of narration clearly states that it is very difficult to analyse feminist theory.

The feminist theories focus social deprivations on the part of woman such as poor education or well paid jobs, or psychological oppressions based on the female body the facts that bearing and rearing children is largely 'woman's work, that woman are physically weaker than men and can be subjected to violence cultural oppression in which women are devalued into cultural objects rather than being valued and being able to value themselves as a cultural subjeets and psychological oppression where women are denied masculine status, and often come to believe in their own inferiority because they lack masculine bodies and minds. A feminist practice of literary theory might be one of the tools by which discovery and transformation can come about. Reading thinking. criticizing, writing, are all forms of action that can underpin oppressions: they might also be made to serve the undoing of oppressions. Feminism is aligned therefore with the theories that account for many different kinds of inequalities in society on the part of woman psyche. Feminist literary theory began by looking at the images of women in literary texts By and large luminism can be declined as cultural, economic and political movements that are focused towards establishing legal protection and complete equality for the women.

Feminism has been widely aptly handled in the number of literary works such as poetry and fiction in India. In Indian writing feminism has been focused as a modest attempt for evaluating the real social scenario in regard with Indian women. The main concern of these feminist writers is to show contemporary woman though emancipated, struggling for her own identity in this male dominated society, where she tries free herself from the shackles of mate dominated society in general. Today's contemporary novelists are writing with the sense that this literary movement will have subsequem changes in the society and there will be better tomorrow for the new women in India.

Rama Mehta's novel inside the haveli deals with the same aspect of feminism, where we find a female protagonist struggles for her own identity Rama Mehta has aptly stated Geeta's quest for her own rights. Rama Mehta, well known social scientist and celebrated writer in Indian English literature. Being a social scientist she observed unequal status of women, social pretensions on the part of male dominated society. Social mores in Hindu orthodox families and injustice at all levels with women and by this she penned her teelings which reveal severe criticism of the so called "Patriarchal Society Her novel 'Inside the haveli" brings forth the plight of Indian women, in orthodoxies which are to be seen in so called educated Rajgharanas: This novel got Sahitya Academy award in the year 1979, which deals with the feminine attitude of female psyche and the struggle for self identity in the male dominated society.

The novel deals with the female protagonist, Geeta, who is educated and brought up in Bombay. She comes from a family with modern values and lived in an open society. Being bom and brought up in free atmosphere, she is a girl of modern outlook and thinking she falls in love with physics teacher, who happens to be from rich family, we may say the scion of Rajput Princely family from Udaipur. Ajay's father has progressive views, so he gives consent for their marriage and thus Geeta marries to Ajay Singh. On the other part, Geeta's mother

is a bit worried about the purdah system which is observed in Ajay's house which is Jeevan Niwas and popularly known as haveli Geeta's mother more or less is worried about how Geeta would manage in the household. When Geeta comes to the haveli, she finds that the haveli life is full of orthodoxies where traditions and culture matters lot and on the other hand various old customs are also followed. Geeta find the whole atmosphere very constricted. She is not used to cover her face in front of any one and being brought up in the free atmosphere she is unable to understand the concept of having different mansions for men and women. She failed to grasp how women could be so subservient to men and how their life revolved around making men comfortable in the haveli further her modern outlook and thinking find no care takers in the haveli. She is no accustomed to haveli mannerism and therefore is subject to taunts and criticism from elderly women and senior female maids in the haveli. There is no one who can understand her feelings and she does not find anyone whom she can have her faith and trust. In this condition Geeta feels like mouse trapped in the cage and feels more suffocated. constricted in the Haveli.

The novel deals with the feminist aspect of one's identity and struggle for rights which to be snatched out of rigorous struggle Journey of Geeta begins with the struggle and also ends with struggle. Her cognition of traditions like purdah system, gender separation and other customs in Haveli, which have severe effect on her psychology. Though moderate on her part but she has her identity as a modern educated woman, which is later on crushed by the male dominated society Being a woman she has to sacrifice her life for the betterment of the family. ultimately it is seen that all her efforts for self quest and self identity are in vain. Geeta has to surrender herself to this patriarchal society. Later we find that Tradition becomes a core part her personality.

Geeta though, moderate enough to fight against the ill causes of the society, but she has more or less feminine feelings which do not permit her to go against the family and this feminine feelings is reflected throughout the novel. Finally to sum up this quest for self identity is much talked in the Indian novelists like Geeta Hari. Nayantara Sahgal. Rama Mehta and many others.

••











## K.G.F. : 2 A Film Review

**Shaikh Najiya Khajabhai**

T. Y. B. A.

1. **FilmName** : KGF-Chapter 2.
2. **Written And Directed By** : Prashanth Neel.
3. **Producer :** Vijar kiragandur
4. **Music :** Ravi basru
5. **Runtime :** 2 hrs.48 minutes
6. **Star Cast :** Yash, Sanjay Dutt, Raveena Tandon srinidhi shetty and prakash Raj.
7. **IMDB :** 8.4/10
8. **About :** KGF. Chapter 2 is an Indian Kannada language action packed film. As the title suggests, its second instalment while KGF: Chapter 1 is the first film. Until Pathan by Shah Rukh overtook it, it was highest grossing Indian film.
The book contemplates the ethical and philosophical questions surrounding biotechnology, artificial intelligence, and the potential for human enhancement. Harari urges readers to consider what it means to be human in a world where technology might allow us to redefine ourselves.

**Themes and Questions**

Uncertainty and Complexity: Harari underscores the complexities of modern life and the uncertainties that come with rapid change, urging readers to embrace critical thinking and open-mindedness.

**Human Values and Identity:** The book challenges readers to reflect on what constitutes a meaningful life in the face of technological advancement and societal upheaval.

**Collective Action**: Harari stresses the importance of collective action to address global challenges, emphasizing that many issues cannot be solved by individuals or nations acting alone.

**Misinformation and Trust**: He discusses the rise of misinformation and the erosion of trust in institutions, highlighting the need for media literacy and critical engagement with information.

"21 Lessons for the 21st Century" serves as a guide to navigating the complexities of contemporary life, encouraging readers to think critically about the world around them and consider the implications of their choices and beliefs. Harari's engaging style and profound insights make it a compelling read for anyone interested in understanding the challenges and opportunities of our time.

Harari's work often combines insights from various fields, including history, philosophy, and science, and he is known for his thought-provoking ideas about the future of technology, society, and humanity. His ability to distill complex ideas into accessible narratives has made him a prominent voice in contemporary discussions about culture and society.










**FLOWER POWER**

Bread feeds the body
Instead, but flowers feed the soul
If we could see the
Miracle of a single flower clearly,
Our whole life would change
Look at trees Look at this birds
Look at the clouds,
Look at the stars, and if
You have eyes
You will be able to see that the whole
Existence is joyful Look at the flowers
For no reason
It is simply unbelievable How
Happy So flowers are
Each flower is a
Soul blossoming out
To nature

**- Avishkar Thorat**
B.A. English



# The Impact of Social Media on Modern Communication

**Manish Bhalerao**

**B. A. English**

**Introduction**

Social media has transformed the way we communicate, revolutionizing the speed, scope, and style of interactions across the globe. Platforms such as Facebook, Twitter, Instagram, WhatsApp, and LinkedIn have changed the landscape of communication by enabling real-time connectivity, fostering global communities, and influencing social norms. This article explores how social media has impacted modern communication, including the positive and negative effects, and its implications for personal, professional, and societal relationships.

**1. Speed and Accessibility of Communication**

One of the most significant impacts of social media is the increased speed and accessibility of communication. Platforms like WhatsApp and Facebook Messenger allow people to send messages, images, and videos instantly, no matter where they are in the world. This ease of access has made communication faster than ever before, eliminating barriers like geographical distance and time zones.

- **Global Connectivity** : Social media enables real-time communication across continents, fostering a sense of global community and bringing people from different cultures together. This is particularly valuable for maintaining long-distance relationships and collaborating across international borders.
- **Instant News and Updates** : Social media also allows for the rapid dissemination of information, making it easier to stay informed about current events and trends. Twitter, for example, has become a hub for breaking news, with users often getting updates faster than through traditional media outlets.

**2. Democratization of Communication**

Social media has democratized communication by giving everyone a platform to share their voice. Before the rise of social media, mass communication was largely controlled

by media companies and institutions. Today, individuals can create content, share opinions, and influence public discourse without relying on traditional media.

- **User-Generated Content** : Platforms like YouTube and Instagram have empowered people to become content creators, leading to the rise of influencers, bloggers, and vloggers. This shift has enabled ordinary people to build large followings and influence opinions on a global scale.
- **Public Debate and Activism** : Social media platforms have become essential tools for social and political movements. They allow individuals to organize protests, spread awareness, and mobilize support for causes. Movements like #BlackLivesMatter and #MeToo gained momentum through social media, highlighting the power of collective voices.

**3. Changes in Personal Communication Styles**

Social media has altered the way people communicate on a personal level, introducing new forms of interaction such as likes, shares, retweets, and direct messages (DMs). While these tools enhance engagement, they also have unique effects on communication styles.

- **Abbreviated Communication :** The use of short forms, emojis, and memes has become commonplace on social media, leading to more casual and concise communication. Platforms like Twitter, with its character limit, encourage brevity and creativity in language use.
- **Non-Verbal Cues :** Social media communication often lacks non-verbal cues such as facial expressions and tone of voice, which are vital in face-to-face interactions. Emojis and GIFs have emerged as substitutes, helping users convey emotions more effectively in text-based communication.
- **Overexposure and Constant Connectivity** : Social media enables people to stay connected 24/7, leading to overexposure. While this level of connectivity can foster close relationships, it can also lead to stress or "communication fatigue" from the constant flow of messages and updates.

**4. Impact on Professional Communication**

Social media has also changed the dynamics of professional communication, blurring the lines between personal and professional identities. Platforms like LinkedIn are tailored for networking, but many professionals also use Facebook, Twitter, and Instagram for branding and business purposes.

- **Networking and Job Searching** : Social media has made it easier for professionals to network and find job opportunities. LinkedIn, for example, is a powerful tool for building professional connections, finding mentors, and exploring career opportunities.
- **Personal Branding** : Professionals now use social media to establish and maintain personal brands. Platforms like Twitter and Instagram allow individuals to showcase expertise in their fields, sharing insights, achievements, and projects with a global audience.
- **Challenges of Digital Etiquette :** As more professionals use social media for work-related communication, navigating the etiquette of online interactions has become increasingly important. What may seem appropriate on a casual platform like Instagram may not align with professional standards, leading to potential miscommunications.

**5. Social Media and the Spread of Misinformation**

While social media enables rapid information sharing, it also plays a significant role in the spread of misinformation and fake news. The viral nature of social media posts means that unverified or misleading information can reach millions of users within minutes, often leading to

confusion or harm.

- **Echo Chambers** : Social media algorithms tend to show users content that aligns with their existing beliefs and interests. This can create "echo chambers," where users are exposed to a narrow range of perspectives, reinforcing existing biases.
- **Combating Misinformation** : In response to the growing concern over misinformation, platforms like Facebook and Twitter have implemented fact-checking mechanisms and labeling of false information. However, the challenge of curbing the spread of fake news remains significant.

**6. The Psychological Impact of Social Media Communication**

The constant exposure to social media can have profound psychological effects, both positive and negative. On one hand, social media can foster a sense of belonging and provide emotional support through online communities. On the other hand, it can contribute to issues such as anxiety, depression, and the fear of missing out (FOMO).

- **Positive Effects** : For many users, social media serves as a platform for self-expression, creativity, and social interaction. It can help individuals find like-minded communities and gain emotional support during challenging times.
- **Negative Effects** : The pressure to maintain a "perfect" online persona can lead to comparison and feelings of inadequacy. Studies have shown that excessive social media use can contribute to anxiety, depression, and a decline in overall well-being.

**Conclusion** : Social media has undeniably transformed modern communication, creating new opportunities for connectivity, self-expression, and global interaction. However, it has also introduced challenges such as misinformation, communication fatigue, and changes in how people perceive themselves and others. As we continue to navigate this digital landscape, it is crucial to balance the benefits of social media with an awareness of its potential downsides. By using these platforms responsibly and thoughtfully, we can harness their power to foster positive connections and meaningful communication in the digital age.

**Advantages of Social Media**

**1. Global Connectivity**

- **Benefit** : Social media platforms like Facebook, Instagram, Twitter, and WhatsApp allow people to stay connected with friends, family, and colleagues across the world. These platforms have broken down geographical barriers, enabling real-time communication with anyone, anywhere.
- **Example** : Platforms enable global connections, helping long-distance relationships thrive and fostering international friendships.

**2. Instant Information and News**

- **Benefit** : Social media provides immediate access to information, news, and events. Users can stay updated on global issues, trends, and breaking news, often more quickly than through traditional media.
- **Example** : Twitter has become a hub for breaking news, where journalists and eyewitnesses share live updates on important events.

**3. Marketing and Business Growth**

- **Benefit** : For businesses, social media offers a cost-effective way to reach global audiences, engage with customers, and promote products or services. It is essential for brand visibility, customer engagement, and lead generation.
- **Example** : Small businesses can use Instagram and Facebook ads to target specific audiences, increasing their customer base and sales.

**4. Educational Resources and Learning**

- **Benefit** : Social media platforms like YouTube, LinkedIn, and Twitter serve as educational

hubs. Users can access free tutorials, webinars, and online communities that foster learning and knowledge sharing.

- **Example** : Platforms like LinkedIn Learning offer courses on various subjects, while YouTube is full of instructional videos, from academic content to technical skills.

**5. Entertainment and Inspiration**

- Benefit: Social media serves as a source of entertainment and inspiration, with platforms like TikTok, Instagram, and YouTube offering endless creative content. Users can explore videos, memes, music, and art created by people across the globe.
- Example: TikTok trends, challenges, and creative content offer hours of entertainment, while Instagram is filled with photography, art, and motivational posts.

**6. Advocacy and Social Movements**

- **Benefit** : Social media is a powerful tool for activism and raising awareness about social, environmental, and political issues. Movements like #BlackLivesMatter and #MeToo have gained global momentum through social media.
- **Example** : Activists and organizations use Twitter and Facebook to mobilize support, organize protests, and raise funds for causes.

**Disadvantages of Social Media**

**1. Spread of Misinformation**

- **Issue :** One of the major challenges of social media is the spread of misinformation and fake news. Since information can be shared instantly, unverified or false content can go viral, leading to confusion or panic.
- **Example :** During major global events or crises, misinformation spreads quickly, making it difficult for users to distinguish between reliable and unreliable sources.

**2. Privacy and Security Concerns**

- **Issue :** With so much personal information shared online, users are vulnerable to privacy breaches, identity theft, and data exploitation. Hackers and cybercriminals often target social media accounts.
- **Example :** Facebook and other platforms have faced criticism for data privacy issues, including the misuse of user data for advertising purposes without proper consent.

**3. Mental Health Issues**

- **Issue :** Excessive use of social media has been linked to mental health problems such as anxiety, depression, and loneliness. The pressure to maintain a "perfect" online persona and the fear of missing out (FOMO) can affect self-esteem and well-being.
- **Example :** Platforms like Instagram often promote unrealistic beauty standards, leading to feelings of inadequacy or negative body image in users.

**4. Addiction and Time Wastage**

- **Issue :** Social media can be addictive, leading users to spend excessive amounts of time scrolling through feeds, watching videos, or engaging in online debates. This can reduce productivity and distract from real-life responsibilities.
- **Example :** Many people experience reduced focus at work or in school because they spend too much time on platforms like TikTok, Facebook, or YouTube.

**5. Cyberbullying and Harassment**

- **Issue :** Social media exposes users, especially young people, to cyberbullying and harassment. The anonymity provided by platforms often emboldens negative behavior, including trolling, shaming, or threatening others online.
- **Example :** Platforms like Twitter and Instagram have been criticized for not doing enough to combat harassment and hate speech, despite implementing reporting tools.

●●

# सेवापूर्ती समारंभ






प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. गणेश ठाकूर व प्रा. डॉ. जे. जे. जाधव, श्री. सौ. प्रा. विलास फसाले यांचा सत्कार करताना

विद्यार्थी व कुटूंबियांकडून फसाले यांचे स्वागत







श्रीमती नकुबाई बागल ग्रंथालय परिचर यांचा सेवापूर्ती समारंभ







प्रयोगशाळा साहाय्यक सुनिल घोडेकर यांचा सेवापूर्ती समारंभ

# माजी विद्यार्थी सहविचार सभा



माजी विद्यार्थी मेळावा प्रसंगी ज्युनियर कॉलेज स्टाफ



जनरल बॉडी सदस्य उदय पाटील मनोगत व्यक्त करताना




प्रास्ताविक करताना कैलास जगदाळे



माजी विद्यार्थी संघातर्फे ट्रॅक्टर प्रदान करताना माजी विद्यार्थी



पाहुण्यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. के. जी. कानडे



माजी विद्यार्थी दिलखुलास मनोगत

## नवीन शैक्षणिक धोरण २०२० विद्यापीठस्तरीय दोन दिवसीय कार्यशाळा दि. २ ते ३ मार्च २०२३



कर्मवीर प्रतिमेला अभिवादन डॉ. प्रमोद पाब्रेकर, डॉ. असीम औटी



मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. प्रमोद पाब्रेकर ज्येष्ठ सल्लागार 'रुसा'



डॉ. प्रमोद पाब्रेकर यांचे स्वागत




प्राचार्य डॉ. के. जी. कानडे बोलताना



उपस्थित प्राध्यापक वर्ग

## रसायनशास्त्र विभाग आयोजित राष्ट्रीय चर्चासत्र 'Emerging Trends In Science & Technology'



कर्मवीर प्रतिमेसोबत मान्यवर



प्रास्ताविक करताना प्राचार्य



सिमेटचे शास्त्रज्ञ सुधीर अरबूज यांचे स्वागत



चर्चासत्रास नोंदणी करून विद्यार्थ्यांचे स्वागत करताना

**शास्त्रज्ञ हवलदार, सिनेट, पुणे बोलताना**



## राष्ट्रीय छात्र सेना विविध छायाचित्रे



लेफ्टनंट आर. पी. मुठे यांच्या समवेत छात्र



राष्ट्रीय छात्र सेना समूह छायाचित्र



२६ जानेवारी रोजी संचलन करताना छात्र



कारगील विजय दिवसानिमित्त वृक्षारोपण



२६ जानेवारी रोजी संचलन करणारे विशेष छात्र




कारगिल विजय दिवस व्याख्यान प्रसंगी उपस्थित छात्र

# अण्णासाहेब आवटे वक्तृत्व स्पर्धा



डॉ. पुरुषोत्तम काळे मार्गदर्शन करताना




पुणे जिल्हा रस्ता सुरक्षा समिती सदस्य अशोक बाजारे बोलताना




अण्णासाहेब आवटे यांचे वारसदार अजय आवटे बोलताना




डॉ. पुरुषोत्तम काळे मार्गदर्शन करताना

पारितोषिक विजेता संघ



## मराठी विभाग विविध उपक्रम



इनर व्हील क्लबच्या सहकार्याने मराठी विभाग आयोजित कविसंमेलनात कवी प्रकाश होळकर




आविष्कार स्पर्धेत सहभागी मराठी विभागाचे विद्यार्थी



मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कविसंमेलनात कविता सादर करताना कवी विद्यार्थिनी




मराठी भाषा संवर्धन पंधरवडा कविसंमेलनात कविता सादर करताना कवी शकील जाफरी



मराठी भाषा गौरव दिन कुसुमाग्रजांच्या प्रतिमेस अभिवादन करताना प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी वर्ग

## प्राचार्य डॉ. के. जी. कानडे यांचा सेवापूर्ती समारंभ



मा. दिलीपरावजी वळसे पाटील विचार मांडताना



सेवापूर्ती समारंभात बोलताना प्रा. मंगल पाटील



सेवापूर्ती समारंभात उपस्थित मान्यवर

## ग्रंथालय विभाग उपक्रम



वाचन प्रेरणा दिन



रयत इंग्लिश मीडियम शाळेची ग्रंथालय भेट



शालेय विद्यार्थी पुस्तके हाताळताना

## जिमखाना विजयी खेळाडू



विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय खेळाडू विद्यार्थी स्वराज गायकवाड



क्रिकेट स्पर्धेचे उद्‌घाटन प्रसंगी प्राचार्य आणि इतर मान्यवर



कबड्डी स्पर्धेत राष्ट्रीय खेळाडू विद्यार्थिनी निकिता पडवळ




विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय खेळाडू स्वराज गायकवाड रोड सायकलिंग स्पर्धेत सुवर्णपदक

जिमखाना विषयक वृत्तपत्रातील एक बातमी

**प्रभात**

# आवटे कॉलेजला कबड्डीमध्ये सुवर्ण पदक

मंचर, दि.३१ (प्रतिनिधी) - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित कबड्डी स्पर्धेत मुलींच्या गटात मंचर (ता. आबेगाव) येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयाच्या संघाने प्रथम पारितोषिक पटकावले, अशी माहिती प्राचार्य नानासाहेब गायकवाड यांनी दिली.



**मंचर (ता. आंबेगाव) : येथील अण्णासाहेब आवटे महाविद्यालयाला कबड्डीमध्ये सुवर्ण पदक मिळाल्याने पुणे येथे सन्मान करण्यात आला.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सलग चार दिवस चाललेल्या स्पर्धेचे परितोषिक वितरण पार पडले. अर्जुन पुरस्कार प्राप्त शकुंतला खटावकर व कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी याच्या हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले. संघाची कर्णधार निकिता पडवळ हिच्या आक्रमक चढायामुळे मंचर महाविद्यालयाने पुण्यातील नामांकित एस. पी. कॉलेज, जेधे कॉलेज व श्री सिद्धीविनायक कॉलेज यांचा पराभव केला. यामुळे तिला स्पर्धेतील अष्टपैलू खेळाडू पुरस्काराने गौरविण्यात आले.

महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील, सर्व सदस्य व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांनी मुलींच्या संघाचे अभिनंदन केले. या संघाला प्रा. डॉ. सुनील पानसरे व प्रा. तुकाराम साळुंखे यांनी मार्गदर्शन केले.

PuneDistrict, 01 Apr 2024, Page:006
https://epaper.dainikprabhat.com

## २६ जानेवारी (प्रजास्ताक दिन)



प्राचार्यांचे आगमन



ध्वजास सलामी देताना मान्यवर



मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड



संचलन करताना छात्र सैनिक



राष्ट्रगीत सादर करणारे गायक/कलाकार



उपस्थित विद्यार्थी वर्ग

# अहवाल विभाग



**Management is about persuading people to do things they do not want to do, while leadership is about inspiring people to do things they never thought they could.**

- Steve Jobs

# अनुक्रमणिका

१. कला व सांस्कृतिक विभाग अहवाल । १४५
२. विद्यार्थी विकास मंडळ । १४६
३. विद्यार्थी विकास मंडळ व निर्भय कन्या अभियान एकदिवसीय कार्यशाळा । १४७
४. जिमखाना समिती व शारीरिक शिक्षण विभाग अहवाल । १४७
५. राष्ट्रीय छात्र सेना विभाग (एन. सी. सी.) । १४८
६. स्पर्धा परीक्षा केंद्र समिती अहवाल । १४९
७. राष्ट्रीय सेवा योजना । १५०
८. स्टाफ वेल्फेअर । १५१
९. Karmaveer Vidya Prabodhini | 152
१०. Food Processing and Quality Management | 152
११. मराठी विभाग अहवाल । १५३
१२. राज्यशास्त्र विभाग । १५४
१३. अर्थशास्त्र विभाग अहवाल । १५५
१४. Department of English | 156
१५. इतिहास विभाग । १५७
१६. Department of Commerce | 157
१७. Department of Electronic Science | 158
१८. Department of Chemistry | 159
१९. Department of Library | 160
२०. Department of Physics | 161
२१. Department of Zoology | 162
२२. मार्च/एप्रिल २०२१-२०२२ मध्ये झालेल्या परीक्षेत गुणानक्रमे प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांची यादी । १६५
२३. पारितोषिक विजेते विद्यार्थी सन २०२३-२०२४ । १६६
२४. रयत सेवक । १६९






# अहवाल विभाग
# २०२३-२०२४

**१. कला व सांस्कृतिक विभाग अहवाल**

महाविद्यालयातील कला व सांस्कृतिक विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले, तसेच विविध स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी विजेतेपद मिळविले त्याची तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे–

**१. दिनांक :** ५ सप्टेंबर २०२३
**कार्यक्रमाचे/स्पर्धेचे नाव :** सांस्कृतिक विभाग व १९९३ चे माजी विदयार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक गौरव दिन समारंभ.
**ठिकाण :** सांस्कृतिक विभाग व १९९३ चे माजी विदयार्थी यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक गौरव दिन समारंभ
**सहभागी विध्यार्थी/ शिक्षक :** ११०

**२. दिनांक :** १८ सप्टेंबर २०२३ ते २२ सप्टेंबर २०२३
**कार्यक्रमाचे/स्पर्धेचे नाव :** कर्मवीर जयंती सप्ताह अंतर्गत चित्रकला, निबंध, वक्तृत्व रांगोळी भितीपत्रिका स्पर्धा
**ठिकाण :** कर्मवीर सभागृह, अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर
**सहभागी विध्यार्थी/ शिक्षक :** १५२

**३. दिनांक :** २५ सप्टेंबर २०२३
**कार्यक्रमाचे/स्पर्धेचे नाव :** स्वरतरंग विद्यापीठ स्तरीय युवा महोत्सव : समूह गायन व्दितीय क्रमांक
**ठिकाण :** टीकाराम जगन्नाथ कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खडकी
**सहभागी विध्यार्थी/ शिक्षक :** १२

**४. दिनांक :** २९ नोव्हेंबर २०२३
**कार्यक्रमाचे/स्पर्धेचे नाव :** राष्ट्रीय मुल्यांकन समिती भेटी अंतर्गत विविध गुण दर्शन कार्यक्रम
**ठिकाण :** महाविद्यालय प्रांगण
**सहभागी विध्यार्थी/ शिक्षक :** ११५

५. **दिनांक :** १४ डिसेंबर २०२३
**कार्यक्रमाचे/स्पर्धेचे नाव :** मा. श्री शरद रावजी पवार साहेब १४ अभिष्टचिंतन सोहळ्या अंतर्गत निबंध व वक्तृत्व स्पर्धा
**ठिकाण :** कर्मवीर सभागृह, अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर

**सहभागी विध्यार्थी/ शिक्षक :** १३९

६. **दिनांक :** १४ फेब्रुवारी २०२४ – १७ फेब्रुवारी २०२४

**कार्यक्रमाचे/स्पर्धेचे नाव :** भीमाशंकर करंडक स्पर्धा २०२४

१. वकृत्व स्पर्धा: द्वितीय क्रमांक (वरिष्ठ विभाग)

२. एकांकिका स्पर्धा: द्वितीय क्रमांक (वरिष्ठ विभाग)

३. एक पात्री स्पर्धा

४. वैयक्तिक नृत्य

५. समूह नृत्यः महाअंतिम फेरी मध्ये सहभाग (वरिष्ठ विभाग)

६. सर्वोत्कृष्ट अभिनेता सहाय्यक

७. सर्वोत्कृष्ट शिस्तप्रिय कॉलेज

**ठिकाण :** नालंदा मनिपुर मंचर

**सहभागी विध्यार्थी/ शिक्षक :** १४२

७. **दिनांक :** १७ फेब्रुवारी २०२४

**कार्यक्रमाचे/स्पर्धेचे नाव :** श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती सप्ताह उपक्रम : शिव व्याख्यान व्याख्याते डॉ. पुरुषोत्तम काळे

**ठिकाण :** कर्मवीर सभागृह, अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर

**सहभागी विध्यार्थी/ शिक्षक :** कर्मवीर सभागृह, अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर

८. **दिनांक :** २४ जानेवारी २०२४

**कार्यक्रमाचे/स्पर्धेचे नाव :** रयत शिक्षण संस्था सातारा, कर्मवीर विद्या प्रबोधिनी, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील राज्यस्तरीय महाविद्यालयीन वकृत्व स्पर्धा वर्ष ३६ वे

**ठिकाण :** SGM, कराड,

**सहभागी विध्यार्थी/ शिक्षक :** ०२

९. **दिनांक :** १४ फेब्रुवारी २०२४– १७ फेब्रुवारी २०२४

**कार्यक्रमाचे/स्पर्धेचे नाव :** स्वयंसिध्दा युवती संमेलन, बारामती २०२४ वर्ष अकरावे

**ठिकाण :** शारदाबाई पवार महिला आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज बारामती

**१०. दिनांक :** १० एप्रिल २०२४

**कार्यक्रमाचे/स्पर्धेचे नाव :** रयत माऊली लक्ष्मीबाई भाऊराव पाटील पुण्यतिथी निमित्त रयत माऊलींचे जीवन चरित्र : व्याख्यात

**ठिकाण :** कर्मवीर सभागृह, अण्णासाहेब आवटे महाविद्यालय मंचर

**सहभागी विध्यार्थी/ शिक्षक :** १०

**डॉ. बी. पी. गार्डी**

●●

**२. विद्यार्थी विकास मंडळ**

**१. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना**

आमच्या महाविद्यालयात सन १९९८ या वर्षापासून पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शन व सहकार्याने विद्यार्थी विकास मंडळामार्फत डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबविण्यात येते. सदर योजनेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून ९०:१० (विद्यापीठाकडून ९०% व महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्थाकडून १०%) या टक्केवारीनुसार अनुदान दिल्या जाते. डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' या तत्त्वानुसार आमच्या महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी जे विद्यार्थी गरीब, गरजू, हुशार व होतकरू आहेत अशा विद्यार्थ्यांना या योजनेत प्रवेश दिला जातो.

चालू शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये आमच्या कमवा व शिका ही योजना राबविली आहे. महाविद्यालयातील कार्यकारी समिती मार्फत ६८ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये ७ मुले व ६१ मुली यांची निवड करण्यात आली. सदर विद्यार्थ्यांना विविध विभागात रोखे विभाग, विद्यापीठ विभाग, कार्यालय, ग्रंथालय, व शेती विभागात काम देण्यात आले. या योजने अंतर्गत शेती, वनीकरण, बागेतील गवत काढणे, झाडांना आळी करणे, झाडांना पाणी देणे व झाडांचे संरक्षण करणे, वृक्ष लागवड करणे तसेच ग्रंथालयात पुस्तकाची देवघेव करणे, पुस्तकांचे संस्कारन करणे, माहिती भरणे, ग्रंथालय परिसराची स्वच्छता करणे व कार्यालयीन कामकाजात मदत करणे इत्यादी प्रकारची कामे नियमानुसार देण्यात आली. या योजनेमुळे योजनेत

सहभागी झालेल्यांना परीक्षा फी भरण्यासाठी तसेच इतर जीवनावश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी आर्थिक मदत होत आहे.

●●

**३. विद्यार्थी विकास मंडळ व निर्भय कन्या अभियान एकदिवसीय कार्यशाळा**

अण्णासाहेब आवटे महाविद्यालयात सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळ, विद्यार्थीनी मंच आणि शारीरिक शिक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात एकदिवसीय निर्भय कन्या अभियान कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांचे हस्ते झाले. या कार्यशाळेचे आयोजन तीन सत्रात करण्यात आले. सकाळी पहिले सत्रात ज्युदो कराटे प्रशिक्षक अमृता रासकर नारायणगाव यांनी विद्यार्थिनींना कौटुंबिक व सामाजिक जीवनात वावरताना स्वसंरक्षण कसे करावे? विद्यार्थिनींनी सुरक्षिततेच्या दृष्टीने निर्माण होणाऱ्या प्रसंगातून स्वतःला कसे सुरक्षित करावे? याबाबत मार्गदर्शन केले. तसेच विद्यार्थिनींना प्रात्यक्षिकाच्या माध्यमातून स्वसंरक्षण कसे करावे याबाबत मार्दर्शन केले. दुसरे सत्रात पुणे येथील सिव्हील व क्रिमिनल डिस्ट्रिक्ट कोर्टचे ॲड. ज्योती खेसे गुंजाळ यांनी विद्यार्थिनींना कायदा व सुरक्षा यावर मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना त्यांनी महिला सबलीकरण, स्त्रीशक्ती, भारतीय संस्कृतीची जोपासना, स्त्रियांचे हक्क व अधिकार, समाज परिवर्तनातील स्त्रीची भूमिका, महिलांविषयक कायद्यांची जाणीव जागृती या विषयावर उपस्थित विद्यार्थिनींना बहुमोल मार्गदर्शन केले. तिसरे सत्रात आंबेगाव तालुक्यातील महिला बचत गटाचे समन्वयक ज्योती गोरडे यांनी विद्यार्थिनींना महिला बचत गटाचे महत्त्व सांगितले. स्वतःचा एखादा लघु उद्योग सुरु करण्यासाठी इच्छुक असणाऱ्या महिलांसाठी महिला बचत गट एक अत्यंत महत्वाची बाब आहे.

बचत गटामुळे राज्यातील पुष्कळ महिलांची सामाजिक तसेच आर्थिक स्थिती उंचावण्यास मदत होते, बचत गटाचे माध्यमातून महिलांच्या जीवनात बदल घडवून येत आहे. महिला बचत गटामुळे महिलांचा आत्मविश्वास वाढण्यास मदत होते त्यामुळे राज्यातील महिला सशक्त व आत्मनिर्भर बनतील.

आपल्या अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालायाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड यांनी आपले भाषणात विद्यार्थिनींचे 'स्व'चा शोध, आत्मजाणीव, सकारात्मक दृष्टिकोन, ताणतणावाचे व्यवस्थापन, वाचन संस्कृती आणि व्यक्तिमत्व विकास, शिष्टाचार, यशस्वी व्यक्तिमत्वातील गुण व दोष, निर्भय व्हा. इत्यादी मुद्द्यांना अनुसरून स्पर्धे च्या जगात वावरताना विद्यार्थिनींनी दृढ आत्मविश्वासाच्या बळावर व्यक्तिमत्व विकास कसा साधावा याबाबत बहुमोल असे मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी डॉ. सुनील पानसरे, प्रा. डॉ. एजाज शेख, प्रा. डॉ. नामदेव आडमुठे, प्रा. डॉ. सखाराम उघडे, प्रा. अफरोज डांगे, प्रा. हेमांगी गवीत, प्रा. विजया खालकर इत्यादी परिश्रम घेतले. तसेच या कार्यशाळेसाठी एकूण १०१ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

●●

**४. जिमखाना समिती व शारीरिक शिक्षण विभाग अहवाल**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये सिनिअर महाविद्यालयाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयातील कबड्डी मुले-मुली, क्रॉस कंट्री मुले-मुली, कुस्ती-मुले, सायकलींग-मुले, बॅडमिंटन- मुली, खो-खो मुलाच्या संघांनी सहभाग नोंदविला. यापैकी कबड्डी मुली संघाने प्रथम क्रमांक, क्रॉस कंट्री मुले संघाने प्रथम क्रमांक, क्रॉस कंट्री मुली संघाने द्वितीय क्रमांक संपादन केला. महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत आंतर महाविद्यालयीन क्रिकेट मुले क्रिडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. कु. पडवळ निकिता हिची महाराजा छत्रसाल विद्यापीठ, छत्तपूर येथे झालेल्या पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली होती. तसेच ठाणे येथे झालेल्या राज्यस्तरीय श्री शिवछत्रपती कबड्डी चषक स्पर्धेत तिने ब्राझ पदक प्राप्त केले. कु. चोपडे हनुमान याची गुरु नानक देव विद्यापीठ, अमृतसर येथे होणाऱ्या आखील भारतीय आंतर विद्यापीठ रोड रेस व

ट्रक स्पर्धेसाठी निवड झाली. तेथे त्याने रोड रेस प्रकारात सुवर्ण पदक प्राप्त केले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अमृत मोहत्सव वर्षा निमित्त निमंत्रित स्पर्धेत मुलीच्या कबड्डी संघाने पुण्यातील नामंकित महाविद्यालयास हरवून सुवर्ण पदक प्राप्त पदक केले. ७ खेळाडूची आंतरविभागीय स्पर्धे साठी निवड झाली होती.

जुनियर महाविद्यालयाने पुणे जिल्हा क्रीडा परिषदेने आयोजित केलेल्या शैक्षणिक वर्ष २०२३-२०१४ मध्ये शालेय क्रीडा स्पर्धा मध्ये महाविद्यालयातील २५० खेळाडूंनी सहभाग नोंदविला. तसेच जिल्हा परिषद वतीने तालुका पातळीवरील मैदानी स्पर्धेचे यशस्वी आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. सदर स्पर्धेसाठी प्रमुख पाहुणे म्हणुन पी.एस. आय तुरे मॅडम उपस्थित होत्या. तसेच विविध क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवून उल्लेखनीय यश संपादन केले. तालुका पातळीवर ७० खेळाडुंनी यश संपादन केले तर जिल्हा पातळीवर ५० खेळाडूंनी यश संपादन केले. विभागीय स्पर्धेसाठी १० खेळाडूची निवड झाली होती तर सार्थक चिखले (१०० व २०० मी धावण), सचि भारद्वाज (३००० मी धावणे व क्रॉस कंट्री), स्नेहा वाघ (खो-खो) याची राज्य पातळीवर स्पर्धेसाठी निवड झाली तर राष्ट्रीय स्पधेसाठी स्वराज गायकवाड याची थाली फेक या क्रिडा प्रकारासाठी निवड झाली होती. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शिक्षकासाठी बॅडमिब्टन क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तर राज्य क्रीडा दिनानिमित्त विद्यार्थ्यांसाठी मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

**प्रा. डॉ. एस. पी. पानसरे**

●●

**५. राष्ट्रीय छात्र सेना विभाग (एन. सी. सी.)**

महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना विभागातील शैक्षणिक वर्ष सन २०२३-२४ मध्ये एकूण १०० छात्र प्रवेशित होते यामध्ये ६७ SD मुले व ३३ SW मुली यांचा सहभाग होता महाविद्यालयातील युनिट मध्ये १०० विदयार्थी प्रवेश क्षमता ३६ महाराष्ट्र बटालियन एन. सी. सी. पुणे कार्यालयाने महाविद्यालयास निर्धारीत केली आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष सन २०२३-२४ मध्ये प्रवेश प्रक्रिया राबविली गेली. व या शैक्षणिक वर्षात महाविविद्यालयातील एन. सी. सी. विभागांतर्गत एन सी सी छात्र यांना नियमित प्रशिक्षण दिले गेले. त्यामध्ये स्वयंशिस्त, ड्रिल रायफल, ट्रेनिंग इत्यादी नियमित कार्यक्रम व 'इ' आणि 'उ' सर्टिफीकेट परिक्षा अभ्यासक्रम अध्ययन अध्यापन वर्षभर करण्यात आले. त्याच बरोबर एन. सी. सी परेड, प्रशिक्षण कार्यक्रमा बरोबर ३६ महाराष्ट्र बटालियन एन. सी. सी. पुणे कार्यालयाच्या आदेशानुसार इतर उपक्रम वर्षभरात राबविण्यात आले. ते खालील प्रमाणे.

१. महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेना विभागांतर्गत दिनांक २१ जून २०२३ रोजी 'आंतरराष्ट्रीय योग दिन' साजरा करण्यात आला या उपक्रम प्रसंगी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. के. जी. कानडे उपास्थित होते. सदर उपक्रमात महाविदयालच्या एन. सी. सी. छात्र यांनी सहभाग नोंदविला.
२. ३६ महाराष्ट्र बटालियन एन. सी. सी. पुणे आयोजित CATC camp मध्ये महाविद्यालयातील द्वितीय, तृतीय वर्षातील २० कॅडेट यांनी दिनांक २५ जून २०२३ ते ०४ जुलै २०२३ या कालावधीत सहभाग नोंदविला.
३. एन. सी. सी. विभाग व रोटरी क्लब मंचर यांच्या माध्यमातून महाविद्यालयात दिनांक २६ जुलै २०२३ रोजी महाविद्यालय शेती विभागात वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रम प्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ गार्डी बी. पी. मा. बाळासाहेब पोखरकर लेफ्टनंट प्रा. मुठे आर. पी. व एन.सी.सी. ६५ छात्र वृक्षरोपण कार्यक्रमप्रंसगी उपस्थित होते.
४. महाविद्यालयातील एन. सी. सी. कॅडेट यांनी दिनांक १५ ऑगस्ट २०२३ रोजी स्वातंत्र्यदिन कार्यक्रमात परेड संचालन करून सहभाग नोंदविला या कार्यक्रमात ८० कॅडेट यांनी सहभाग घेतला.
५. महाविद्यालयातील ०५ एन. सी. सी. कॅडेट Army Attache ent camp औध पुणे येथे विशेष सहभाग

नोंदविला.

६. महाविद्यालयातील एन. सी. सी. विभागअंतर्गत दिनांक २५ सप्टेंबर २०२३ महाविदयालय परिसर स्वच्छ करण्यात आला. या उपक्रमात ५० कॅडेट सहभाग नोंदविला.

७. दिनांक २२ सप्टेंबर २०२३ रोजी पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील जयंती कार्यक्रम व रॅलीत ७९ कॅडेट यांनी सहभाग नोंदविला.

८. महाविद्यालयातील एन. सी. सी. विभागांतर्गत दिनांक २६ जुलै २०२३ रोजी कारगिल विजय दिन साजरा करण्यात आला. या उपक्रमात ५० कॅडेट यांनी सहभाग नोंदविला या कार्यक्रमप्रसंगी शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण करून मानवंदना देण्यात आली व लेफ्टनंट पा. मुठे आर. पी यांनी उपास्थित एन. सी. सी. कॅडेट यांना मार्गदर्शन केले.

९. महाविद्यालयातील एन. सी. सी. विभागातील कॅडेट दिनांक २६ जानेवारी २०२४ रोजी प्रजासत्ताक दिन कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयात पदसंचालन केले.

१०. महाविद्यालयातील एन. सी. सी. विभागातील कॅडेट कुमार आर्यन सैद, कुमारी पूजा शेखरे यांनी राष्ट्रीय कॅम्प EBSE दिनांक -१५ ऑक्टोबर २०२३ ते ३० ऑक्टोबर २०२३ या कालावधीत उत्तरप्रदेश, वाराणाशी येथे सहभाग नोंदविला.

११. महाविद्यालयातील एन. सी. सी. विभागातील कॅडेट कु. आर्यन सैद, ईश्वर डोके, कु. समाधान राक्षे यांची भारतीय सैन्यदलात सन २०२३-२४ मध्ये निवड झाली तर कुमारी, शिंदे ज्ञानेश्वरी हिची महाराष्ट्र विभागात वनरक्षक पदी निवड झाली. या सर्वा छात्रांना लेफ्टनंट प्रा. मुठे आर. पी. यांचे मार्गदर्शन मिळाले. वरील सर्व उपक्रम यशस्वी करण्यासाठी लेफ्टनंट प्रा. मुठे आर. पी. समिती सदस्य, एन. सी सी. विभागातील सिनियर कॅडेट आर्यन सैद, ईश्वर डोके, पूजा शेखरे यांनी विशेष परिश्रम घेतले. प्राचार्य डॉ. के. जी. कानडे, प्रभारी प्राचार्य डॉ. बी. पी. गार्डी, प्राचार्य डॉ. एन एस. गायकवाड यांचे मोलाचे सहकार्य, मार्गदर्शन लाभले. या सर्व कामकाजासाठी महाविद्यालयातील आर. पी. मुठे यांनी कामकाज पाहिले.

**लेफ्टनंट, प्रा. आर. पी. मुठे**
एन. सी. सी. अधिकारी

●●

**६. स्पर्धा परीक्षा केंद्र समिती अहवाल**

अण्णासाहेब आवटे महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा विभागामार्फत राज्यसेवा परीक्षा, बँकिंग परीक्षा, आणि सैन्य व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण संबंधी मार्गदर्शन केले जाते. तसेच विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेविषयी जागृती निर्माण व्हावी यासाठी विविध व्याख्यानाचे आयोजन केले जाते. स्पर्धा परीक्षा विभागामध्ये २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात एकूण ५२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. स्पर्धा परीक्षा विभागामध्ये शासनाकडून जाहीर होणाऱ्या वेगवेगळ्या जाहिराती सूचना फलकावर लावल्या जातात. अण्णासाहेब आवटे महाविद्यालयातील स्पर्धा परीक्षा विभाग अंतर्गत 'तयारी स्पर्धा परीक्षेची' या विषयावर श्री. मनोहर भोळे (संचालक, राजमुद्रा अकॅडमी, पुणे.) यांचे व्याख्यान दि. २३/०८/२०२३ रोजी आयोजित करण्यात आले. सध्या वर्तमान परिस्थितीमध्ये यशाची शिखरे गाठण्यासाठी तसेच या स्पर्धेच्या युगात स्वतःला सिद्ध करून दाखवण्यासाठी स्पर्धा परीक्षा हा एकमेव राजमार्ग असून त्याद्वारे आजच्या तरूणांना वेगवेगळ्या संधी प्राप्त होऊ शकतात. या सर्व संधी मिळवण्यासाठी स्पर्धा परीक्षेची तयारी करणे महत्त्वाचे ठरते असे प्रतिपादन मनोहर भोळे यांनी केले व परीक्षांना कसे सामोरे जावे याविषयीचे अनमोल असे मार्गदर्शन त्यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व १३८ विद्यार्थी उपस्थित होते.

२६/१०/२०२३ रोजी स्पर्धा परीक्षा विभागांतर्गतस्पर्धा परीक्षेचे बदलते स्वरूप आणि आव्हाने' या विषयावर श्री अजित खराडे (मुख्य समन्वयक : द

सिव्हिलिअंस अकाडमी, मुंबई) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व १०६ विद्यार्थी उपस्थित होते. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र समितीचे वर्षभरातील उपक्रम राबविण्यासाठी महाविद्यालयाचे मा. प्राचार्य डॉ. गायकवाड एन.एस. यांचे बहुमोल असे मार्गदर्शन लाभले. तसेच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र समितीतील सर्व सदस्य व महाविद्यालयीन सेवकांचे सहकार्य लाभले.

**प्रा. रविंद्र पारधी**

●●

### ७. राष्ट्रीय सेवा योजना

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांचे अंतर्गत महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे तीन एककांचे ३०० स्वयसेवक कार्यरत आहेत. ३०० स्वयंसेवकांचा सेवेद्वारे व्यक्तिमत्व विकास साधण्यासाठी, सामाजिक जाणिवा जागृत करण्यासाठी तसेच जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्य व गुणवत्ता विकसित करण्यासाठी महाविद्यालयीन प्रचार्यांचे मार्गदर्शनाखाली खालील नियमित कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

१. आंतरराष्ट्रीय योग दिन महाविद्यालय प्रांगणात ओम शांती शाखा मंचरचे साधक यांचे उपस्थितीत २१ जून अंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला.
२. रक्तदान शिबिर महाविद्यालयात अक्टोबर २०२३ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजित करण्यात आले शिबिरात ५० महाविद्यालयीन युवकांनी रक्तदान केले.
३. वृक्ष रोपण २१ जुलै २०२३ रोजी महाविद्यालयत २०० लिंब वृक्षाच्या रोपची लागवड करण्यात आली. तसेच ३१ ऑगस्ट २०२३ रोजी मंचर बचत गट महिलानी वृक्षरोपण केले.
४. एन. एस. एस. ओरीयंटेशन रा. से. यो. नवीन प्रवेश घेतलेल्या स्वयंसेवकांसाठी २२ ऑगस्ट २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेची ध्येय, धोरणे व विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली.
५. राष्ट्रीय खेळ दिन २९ ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयात विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. उदघाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. सदाफळ यांचे शुभ हस्ते सकाळी १०.०० वा. मे. ध्यानचंद (हॉकीचे जादूगार) व खाशाबा जाधव (कुस्ती, ऑलम्पिक सुवर्ण पदक विजेते), यांचे प्रतिमा पूजनाने झाले.
६. विशेष नव मतदार नोंदणी अभियान तहसिलदार कार्यालय घोडेगाव याचे वतीने महाविद्यालयीन सदर अभियान राबविण्यात आले. अभियानात ७२ नव मतदार नोंदणी करण्यात आली.
७. कर्मवीर जयंती सोहळा महाविद्यालयात २२ सप्टेंबर कर्मवीर जयंती सोहळा साजरा करण्यात आला. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे प्रतीमेची मंचर शहरातून पारंपरिक वाद्य वाजवत मिरवणूक काढण्यात आली.
८. स्वच्छ भारत अभियान मा. प्रधानमंत्री यांनी केलेल्या आवाहनानुसार दिनांक ०१ ऑक्टोबर २०२३ स्वच्छताही सेवा कार्यक्रम अंतर्गत सकाळी १०.०० वा. मा. उपप्राचार्य डॉ सदाफळ व्ही, डी. यांनी राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना स्वच्छते बाबत प्रबोधन केले व सर्वांनी १ महाविद्यातलात श्रमदान केले, मंचर नगरपरिषदचे सेवक हाविद्यालयातील श्रमदानात सहभागी झाले होते.
९. मेरी माटी मेरा देश 'सेल्फी विध माटी' या उपक्रमातंर्गत ०७ ऑक्टोबर रोजी १०७२ स्वयंसेवकांनी माती हातात घेऊन सेल्फी घेतली तसेच त्या मातीचे संकलन अमृत कलशात केले.
१०. राष्ट्रीय एकता दिन - महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत ३१ ऑक्टोबर २०२३ राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मृतीस जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले. तसेच इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. महाविद्यालयाचे सन्मानिय प्राचार्य डॉ. बी. पी. गार्डी याचे हस्ते प्रतिमेस पुष्पांजली वाहण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना राष्ट्रीय एकता व पंच प्रण शपथ देण्यात

आली.

११. भारतीय संविधान दिन महाविद्यालयातील दिनांक २६ नोव्हेंबेर २०२३, संविधान दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमास सुरुवात संविधान प्रतीस पुष्पांजली वाहण्यात आली नंतर रासयो कार्यक्रम अधिकारी रमेश गावडे यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले, प्राध्यापक मारुती गुंजाळ यांनी संविधानाची सविस्तर माहिती दिली, भारतीय राज्यघटनेची उद्देशिकाचे वाचन आले, प्राचार्य डॉ. बी. पी. गार्डी यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. रासयो कार्यक्रम डॉ. एस. एस. उघडे यांनी आभार मानले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासयो कार्यक्रम सपना उगले यांनी केले.

१२. मतदार जागृती पदयात्रा महाविद्यालायचे प्राचार्य डॉ. नानासाहेब गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली मंचर शहरातून राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांनी घोषणादेत पदयात्रा काढली.

१३. शिकालीन शश्र प्रात्यक्षिके महाविद्यालयत दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ रोजी शिवजयंतीचे औचित्य साधत शिकालीन शश्रचे प्रात्यक्षिकांनचे आयोजन केले होते. मा. गौरव भालेराव यांचे टीमने काठी, तलवार व दांडपट्टा या हत्यारांचे कसरती महाविद्यालयीन प्रांगणात दाखविल्या.

१४. शिवजयंती सोहळा - महाविद्यालयीन स्वयंसेवकांनी शिवजयंती निमित्त किल्ले शिवनेरी येथून ज्योत पेटून ती वाजत गाजत घोषणा देत महाविद्यालयात आणली तसेच मंचर शहरातून ज्योतीची मिरवणूक काढली.

१५. श्रमदान व महाविद्यालय परिसर स्वच्छता महाविद्यालयात स्वयंसेवकांनी नॅक पिअर टीम येण्यापूर्वी तसेच स्वातंत्र्य दिनपूर्वी परिसर स्वच्छता केली.

१६. वृक्ष संवर्धन : स्वयंसेवक सातत्याने महाविद्यालय परिसरातील वृक्षांची निगा राखतात. महाविद्यालायचा १०८ एकर कॅम्पस हिरवागार ठेवण्यात योगदान देतात.

१७. विशेष श्रम संस्कार शिबिर : महाविद्यालय व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबिर मौजे भराडी, ता. आंबेगाव, जि. पुणे येथे ०३ जानेवारी ते ०९ जानेवारी २०२४ या कालावधीत मा. प्राचार्य नानासाहेब गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली संपन्न झाले. या शिबिरात कालावधीत सकाळचे सत्रात श्रमदानची कामे करण्यात आली करण्यात आली तर दुपारी सत्रात स्वयंसेवकांचा बौद्धिक विकास करण्यासाठी तसेच सामाजिक प्रश्नांची जाणीव निर्माण होण्यासाठी विविध क्षेत्रातील वक्तेची व्याख्याने अयोजित केली होती. सदर शिबिरात १५० स्वयंसेवक सहभागी झाले होते.

●●

### ८. स्टाफ वेल्फेअर

सध्याच्या धकाधकीच्या आणि ताण तणावपूर्ण जीवनात मानवी आयुष्य अनेक आजारांना बळी पडत आहे. त्यामुळे निरोगी जीवनशैली आत्मसात करण्यासाठी नियमित व्यायाम व आयुर्वेदिक उपचार आरोग्यासाठी महत्त्वाचे आहेत. असे प्रतिपादन डॉ. प्रवीण बढे प्रिस्टाईन आयूर इंडिया चरिटी फाउंडेशन, पुणे यांनी केले, ते मंचर येथील रयत शिक्षण संस्थेचे, अण्णासाहेब आवटे महाविद्यालय, मंचर येथे महाविद्यालयातील स्टाफ वेल्फेअर समिती व प्रिस्टाईन आयूर इंडिया चरिटी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ४ सप्टेंबर २०२३ रोजी शिक्षक दिनाच्या निमित्ताने मोफत आरोग्य तपासणी शिबीर कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. डॉ. प्रवीण बढे पुढे म्हणाले आयुर्वेदिक उपचार हे रोगाच्या मुळ कायमस्वरूपी नष्ट करून योग्य ते उपचार आयुर्वेदाच्या माध्यमातून केले जातात. त्यामुळे भारतीय संस्कृतीत आयुर्वेदाला महत्त्वाचे स्थान आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. गार्डी हे होते. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. बी. पी. गार्डी म्हणाले आयुर्वेद हे मानवी जीवनाला नवसंजीवनी देणारी उपचार पद्धती आहे. पूर्वी घरा-घरात अनेक औषधी काढे घेऊन पारंपारिक औषधी वनस्पतींचा वापर आजारपणात केला जात असे. त्यामुळे आयुर्वेदाला फार मोठा इतिहास आहे. असे विचार त्यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. विलास सदाफळ यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार प्रा.

तानसेन रणदिवे यांनी मानले. सदर शिबिरात १०२ शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गानी आरोग्य तपासणी केली.

●●

### ९. Karmaveer Vidya Prabodhini

During academic year 2023-2024 on behalf of Karmaveer Academy of Education, Satara following examinations are announced.

1. Committee member meeting was held on 17-07-2023
2. Notification of commencement of senior college certificate exam on 06-01-2024, 11 am to 1pm of 100 marks. Total No. of students given the fee-27
3. Notice to students and college staff for above exam. For collection Rs.70 as exam fee.
4. Information about the Karmaveer Vidya Prabodhini activity in collage is given to through mail to Karmaveer Academy of Education, Satara.
5. R. T. S exam on 4/2/2024 is completed Number of student 362 are appeared.
6. R. O. exam on 4/2/2024 is conducted. Number of students 250 are appeared.
7. Anandache vastigraha carrier guidance project is implemented. Under this activity Essay writing on Me kon honar is allotted to students.
8. Anandache vustigraha A carrier guidance project is implemented during Dec 2023 to March 2024.
9. Carrier guidance lecture is arranged on 24/1/2024 Guest lecturer Mr. Samiran Argade Pune

**Prof. Kumawat V. S.**

●●

### १०. Food Processing and Quality Management

Our department excellent in research and innovation in food processing sector and create future entrepreneurs to shaping the national economy by encouraging the business. The department attending new level in food processing innovation with support of Management and our Principal. The department uses innovative teaching methods like ICT lectures, demonstration, model presentation, video/audio lecture and many more to achieve specific goals in academic year. The department focuses on student growth by providing practical knowledge related to Industry as well as academic. During the academic year 2023-24 Food Processing & Quality Management students participated in various competitions like Avishkar Competition, Bhimashankar Karandak etc.

**Departmental Activities:**

1. **Student Learning Methods (Class Test, Seminars) :** Conducted Students seminars and Class test for their learning and practice. Outcomes : 1) Students mistakes become valuable experiences. 2) Students Self-Assessment
2. **Celebration of National Nutrition week 2023 :** National Nutrition week was celebrated at Annasaheb Awate College, Manchar organized by Food Processing Quality Management department at Department level on 5th September 2023 To 7th September, 2023 under the theme, Health and Nutrition. Celebration was started with Inauguration of Nutrition week Celebration Theme. Beneficiaries : 10 students
3. **Open Day :** For promotion of transparency in the internal evaluations the department conducted the open day after the end of internal evaluation in each semester.
4. **Experiential Learning Method :** Students performed various practical's with new ideas. They applied their theory knowledge and prepared different products on trial and error basis with their own creativity and ideas. In this activity student acquire actual experience in learning product development.
5. **Career Guidance Lecture :** Conducted lectures on the topic Career Guidance Lecture

in Food Technology Sector on 24th 27th & 31th Jan 2024 was organized by the Department of Food Processing Quality Management at M. G. Junior College, Manchar, Narshinha Vidyalaya and Junior College, Ranjani Annasaheb awate college, Manchar. The lecture was attended by around 172, 25 & 102 participants respectively. There was very enthusiastic participation by the students, which was evident by the number of questions asked. After that questions and interaction the lecture was ended by Vote of Thanks.

6. **Study Tour :** The Department of Food Processing & Quality Management organized a study tour on date 29-01-2024. Students visited Agricultural Exhibition in Manchar. Student visited various stalls of food industries also various take valuable information about Agricultural equipment's.

**Dr. S. S. Ughade**

●●

### ११. मराठी विभाग अहवाल

महाविद्यालयातील मराठी विभाग हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक तसेच वैविध्यपूर्ण कौशल्यविकासासाठी कार्य करीत असतो. सन २०२३-२४ मध्ये विभागाने विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्य विकासासाठी मराठी विभाग 'उन्मेष' भित्तीपत्रकाचे प्रकाशन करते. चालू वर्षी २२ सप्टेंबर रोजी रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील जयंती निमित्त २६ जानेवारी रोकी प्रवाससाक दिनानिमित्त, २० एप्रिल रोजी वार्षिक पारितोषिक वितरण निमित्त विद्यार्थ्यांनी लेखन केलेल्या भित्तीपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले.

विभागातील पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांनी क्षेत्रीय अभ्यास भेट अंतर्गत सनय प्रकाशन, नारायणगाव, पुस्तक मार्केटिंग ई-प्रकाशन संस्था नारायणगाव, येथे भेट देऊन प्रकाशन संस्थांचे कामकाज समजून घेतले. व त्यावर लेखन प्रकल्प विभागात सादर केले. या प्रसंगी सनय प्रकाशनचे श्री शिवाजी शिंदे, वंदना शिंदे व 'ई-प्रकाशन'चे प्रा. डी. मिलिंद कसबे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थ्यांनी 'श्रद्धा प्रिंटींग प्रेस' श्रीरामपूर येथे भेट देऊन प्रिटींग प्रेसचे कामकाज समजून घेतले. व्यावसायाच्या दृष्टीकोनातून मार्गदर्शन घेतले व अहवाल सादर केले. यावेळी श्री. बाळासाहेब बांगर व त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**वाचन प्रेरणा दिन**

महाविद्यालयातील मराठी विभागा अंतर्गत दि. १५ ऑक्टोबर २०२३ रोजी भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस ''वाचन प्रेरणा दिन'' म्हणून साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयातील ग्रंथालयामधील वाचन कक्षात कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील विद्यार्थ्यांमध्ये वाचन व लेखनाची आवड निर्माण व्हावी म्हणून सकाळी ११.०० ते दुपारी ०१.०० या वेळेत वाचनाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी विविध विषयातील ग्रंथाचे वाचन केले. या उपक्रमास महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**मराठी भाषा संवर्धन पंधरवडा**

मराठी विभागांतर्गत ''मराठी भाषा संवर्धन पंधरवडा'' दि. १४ जानेवारी २०२४ ते २८ जानेवारी २०२४ या काळात साजरा करण्यात आला. या कालावधीमध्ये विभागाद्वारे विविध कार्यक्रमांचे आयोजन यशस्वीरीत्या करण्यात आले. यानिमित्ताने महाविद्यालयात पुढील स्पर्धांचे आयोजन केले होते.

१. काव्यलेखन स्पर्धा : सहभागी विद्यार्थी २७
२. प्रश्न मंजुषा : सहभागी विद्यार्थी २१०
३. निबंधलेखन स्पर्धा : सहभागी विद्यार्थी ५९
४. काव्यसंमेलन : सहभागी विद्यार्थी ९२

या स्पर्धेमधून प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन क्रमांक कसाढून विजेत्यांना २७ फेब्रुवारी या 'जागतिक मराठी भाषा दिनी' प्रशस्तीपत्र व मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. दिनांक ३० जानेवारी, २०१४ रोजी मराठी विभाग व मराठी साहित्य परिषद, मंचर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात 'काव्यसंमेलना'चे योजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन निमंत्रित कवी म्हणून श्री.

विठ्ठल महामुनी, श्री. ज्ञानेश्वर धुमाळ, श्री. शकील जाफरी, श्री. रुपा बेंडे, श्री. दत्ताजी पायमोडे आदी कवी उपस्थित होते. या सर्वांनी आपल्या कवितांचे सादरीकरण केले. तसेच याप्रसंगी महाविद्यालयातील काही विद्यार्थ्यांनी स्व-लिखित तर काही विद्यार्थ्यांनी इतरांच्या कवितांचे सादरीकरण केले. या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एस. गायकवाड होते. या काव्यसंमेलनात एकूण १५० विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

**मराठी भाषा गौरव दिन अहवाल**

महाविद्यालयातील मराठी विभागांतर्गत कविवर्य कुसुमाग्रज उर्फ वि. वा. शिरवाडकर यांचा जन्मदिवस ''मराठी भाषा गौरव दिन'' म्हणून दि. फेब्रुवारी २०२४ रोजी महाविद्यालयात साजरा करण्यात आला. याप्रसंगी कविवर्य कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन.एस. गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच मराठी विभागाच्या वतीने कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंती विशेष 'उन्मेष' या भित्तिपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. त्याचबरोबर मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून 'मराठी स्वाक्षरी' उपक्रम राबविण्यात आला. तसेच मराठी विभाग व ग्रंथालय विभागाच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथालयात 'पुस्तक प्रदर्शनाचे' आयोजन करण्यात आले. विभागात एकूण ४ प्राध्यापक असून दोन प्राध्यापक पीएच.डी पदवी प्राप्त असून दोन प्राध्यापकांचे पीएच्.डी. चे काम सुरु आहे. प्रा. गार्डी, प्रा. मुठे यांचे एकुण तीन संशोधन पेपर युजीसी केअर लिस्ट मधील नियतकालिकात प्रकाशित झाले आहेत. विभागाचे दोन सामंजस्य करार (चजण) आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा मंचर, सनय प्रकाशन, नारायणगाव नारायणगाव यांच्याबरोबर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या संयुक्त विद्यमाने काव्यसंमेलन आयोजित केले. तर सनय प्रकाशन येथे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन प्रकाशन कामकाज समजून घेतले.

••

**१२. राज्यशास्त्र विभाग**

**Student Class Room Seminar :** राज्यशास्त्र विभागाने दि. ५ सप्टेंबर २०२३ रोजी Student Class Room Seminar चे आयोजन केले. सदर सेमिनारमध्ये १३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**विशेष नवमतदार नोंदणी मोहीम :** राज्यशास्त्र विभागाने दि. १४ सप्टेंबर २०२३ रोजी विशेष नवमतदार नोंदणी मोहिमेचे आयोजन तहसील कार्यालय, आंबेगाव यांच्या सहकार्याने संपन्न झाले. सदर मोहिमेत ६३ नवमतदार विद्याच्यांनी नोंदणी केली.

